



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय प्रवास
सं. क्र. ६९२





## सौ. मंगला दास्ताने

RFI BK-0025924





संदर्भ मुक्त

७१२
२५९२४
३०।७।८८

15 DEC 1990

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

4 OCT 1989
11 OCT 1989
25 OCT 1989
1 NOV 1989
15 NOV 1989
10 JAN 1990
25 AUG [illegible]

17 JAN 1990
2 [illegible]
5 SEP [illegible]
25 FEB 1990
21 MAR 1990
18 APR 1990
15 SEP 1990
10 NOV 1990
(क्र. पा. पहा)
30 MAY 1992



# बहुरंगी बँकॉक

सौ. मंगला दास्ताने

REFBK-0025924

नवभारत प्रकाशन
रमानिवास, ७०२ बुधवार पेठ,
सकाळ वृत्तपत्र कार्यालयासमोर
पुणे - ४११ ००२

# बहुरंगी बँकॉक

लेखिका
सौ मंगला दास्ताने

आवृत्ती पहिली
२३मार्च, १९८९

© सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

प्रकाशक
श्री प्र न देवळाणकर

नवभारत प्रकाशन
रमा निवास, ७०२, बुधवार पेठ,
सकाळ वृत्तपत्र कार्यालयासमोर,
पुणे - ४११००२

पृष्ठे - १२६

कलापत्रावरील बहुरंगी
हाफटोन छायाचित्रे- ५३

रेखाटने - २१

मुद्रक
संगम प्रेस
१७ बी, कोथरूड
पुणे - ४११ ०३२.

सजावट
श्री सुनील रेडेकर

मूल्य रुपये साठ (६०/-)
परदेशात सहा अमेरिकन डॉलर

# मनोगत

कटाळवाण्या, चाकोरीबद्ध जीवनात बदल करण्यासाठी, नवा उत्साह मिळविण्यासाठी, शिक्षणासाठी अगर व्यक्तिमत्त्व विकासासाठी पर्यटन हे आजच्या काळात एक महत्त्वाचे अंग बनत चालले आहे. पूर्वी परदेशी जायचे म्हणजे पश्चिमच डोळ्यापुढे असे; पण गेल्या तीन दशकात पूर्वेकडील परिस्थिती झपाट्याने बदलली असल्याने, तिकडची आकर्षणे वाढली आहेत; पण या देशांबद्दल फारशी अद्यावत् माहिती सहजासहजी मिळत नाही.

इ.स. १९८४ ते १९८९ या काळात पूर्वेकडील बऱ्याचशा देशात अनेकदा जाऊन महिनोन् महिने राहण्याचा मला योग आला.

परतल्यावर आप्तांच्या व शेजाऱ्या-पाजाऱ्याच्या कुतुहलयुक्त चौकशा सुरू झाल्या त्याची उत्सुकता आणि त्यामुळे आलेला उत्साह यातूनच या पुस्तकाचा जन्म या प्रवासात मला जे दिसले, आवडले ते अविस्मरणीय होते, आनंददायी होते आणि अपूर्वही होते! म्हणून अधिकाधिक लोकांना यात सहभागी करावे, या देशांच्या अपूर्वाईची किंचितशी झलक दाखवावी याकरता हा लेखन - प्रपंच

आजकाल जग जवळ आल्याने पर्यटन आवश्यक व सुलभ झाले आहे थोडीशी चैन म्हणून जरी आपण पर्यटनावर खर्च करीत असलो तरी हे पैसे अगदीच पाण्यात जाऊ नयेत, त्यांचा पुरेपूर मोबदला मिळावा अशी आपली साहजिकच इच्छा असते विदेश पर्यटनाचा खर्च काही थोडाथोडका नसतो आणि हे योगही कपिलाषष्ठीप्रमाणे केव्हातरीच येतात तेव्हा हे पर्यटन योजनापूर्वक व डोळसपणे केले तर त्याचा आनंद द्विगुणित होऊ शकतो व तो चिरकाल टिकतो

विदेशाची सहल पर्यटक स्वतंत्रपणे अगर सहलसंस्थेमार्फत करतात काही लोक घरी आराम-खुर्चीत बसून वाचता वाचताही मनाने सहली करू शकतात असे सर्व प्रकारचे पर्यटक पुढे ठेवून, जास्तीत जास्त चित्रे घालून हे पुस्तक लिहिले आहे

एखादा देश पहाताना तेथील मुक्कामात लोकजीवन, निरनिराळी गावे, प्रेक्षणीय स्थळे आणि खरेदी असे माझे कार्यक्रम एकदमच समिश्रपणे चालले होते परंतु एकसूत्रीपणाच्या दृष्टीने या प्रवासवृत्तात प्रथम त्या देशाचा विमानतळ, शहराचे ओझरते दर्शन, नंतर लोकजीवन, पार्श्वभूमीसाठी थोडासा भूगोल-इतिहास, प्रेक्षणीय स्थळे व शेवटी खरेदी असा क्रम ठेवला आहे

अनेकाचे सक्रीय आशीर्वाद व हातभार या प्रकाशनास लाभले. सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार

२३ मार्च १९८९ सौ मगला दास्ताने

## सांगावेसे वाटते की –

नवलाई नेपाळची हे सौ मगला दास्ताने याचे पुस्तक अनेकाना अतिशय आवडले त्यावर अनेक विद्वान मान्यवराचे उत्तम अभिप्राय आले म्हणून पूर्वेकडील इतर देशावर छोटी छोटी पुस्तके लिहायला आम्ही त्याना उद्युक्त केले अग्नेय आशियातील जवळ जवळ सर्व देशात, गेल्या चार-पाच वर्षांत अनेकदा त्याचे दीर्घकाल वास्तव्य झाले. त्यामुळे तेथील बारीक सारीक गोष्टी त्याना माहित आहेत. पूर्वेची अपूर्वाई या मालिकेतील बहुरगी बँकॉक हे एक पुष्प

या पुस्तकामुळे पर्यटनात आपल्या वेळेचा व डॉलरचा जास्तीत जास्त सदुपयोग होऊन आनद सहस्त्रपटींनी वाढेल याची खात्री आहे. घरी बसून वाचणाऱ्यानाही हे पुस्तक थायलड दर्शन घडवून आणील.

प्रवासवर्णनात स्थळाची अगर प्रसगाची चित्रे आवश्यक असतात. अनेकांना ती बहुमोल वाटत असल्याने याही पुस्तकात पन्नासच्यावर बहुरगी व इतर रेखाटने मिळून एकूण पाऊणशेच्यावर चित्रे घालूनही आजकालच्या मानाने कमी किंमत ठेवली आहे पर्यटक, प्राध्यापक व इतर रसिक वाचक या प्रकाशनाचेही मनापासून स्वागत करतील, अशी आशा आहे

२३ मार्च १९८९

प्र. न देवळाणकर
प्रकाशक

# बहुरंगी बँकॉक

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | पूर्वेचे प्रस्थान ........... | ९ ते १६ |
| २ | बँकॉकमध्ये ......... | १७ ते २० |
| ३. | बहुरंगी लोकजीवन ......... | २१ ते ४३ |
| ४ | सुजलाम् सुफलाम् ........... | ४४ ते ५१ |
| ५ | नेत्रदीपक बुद्धमंदिरे ........... | ५२ ते ६४ |
| ६ | इतर प्रेक्षणीय स्थळे .......... | ७३ ते ८७ |
| ७. | थायलंडमध्ये इतरत्र .......... | ८८ ते १११ |
| ८. | बँकॉकच्या बाजारी ........... | ११२ ते ११५ |
| ९ | गोड आठवणींसह पुढे .......... | ११६ ते ११७ |
| | परिशिष्ट - १. अंदाज पत्रक . ... | ११८ ते १२० |
| | परिशिष्ट - २. उपयुक्त पत्ते ..... | १२१ ते १२४ |
| | परिशिष्ट - ३. बँकॉक शहर नकाशा ... | १२५ ते १२६ |

## बहुरंगी छायाचित्रे



| क्रमांक | नाव | पान |
|---|---|---|
| १ | राजप्रासादातील पाचूची पवित्र बुद्धमूर्ती | मुखपृष्ठ |
| २ | वात पो आवारातील चैत्य | मुखपृष्ठ |
| ३ | थायलंडचे सध्याचे राजे अडुल्यडेज भूमिबाल | मुखपृष्ठ |
| ४ | सौंदर्यशाली अरुण मदीर | मुखपृष्ठ |
| ५ | खास थायी वेषातील नर्तिका | मुखपृष्ठ |
| ६ | राजप्रासादातील मनोरे व राष्ट्रध्वज | ६५ |
| ७ | मिरवणुकीतील भालदार चोपदार | ६५ |
| ८ | रोषणाई राजप्रासादावरची | ६५ |
| ९ | पाचूच्या मंदिराचे प्रवेशद्वार | ६५ |
| १० | राजप्रासादातील प्रांगणात | ६५ |
| ११ | राष्ट्रीय संग्रहालयातील एक नक्षीदार मंडप | ६६ |
| १२ | बेंचामाबोपिट - सगमरवरी बुद्धमदीर | ६६ |
| १३ | राज मिरवणूक - नदीतून | ६६ |
| १४ | भव्य सरस्वती - प्राचीन नगरी | ६६ |
| १५ | हुषार हत्ती | ६६ |
| १६ | वात पो मधील नर्तिका | ६६ |
| १७. | राजाच्या शुभचिंतनाचे चिन्ह | ६७ |
| १८ | लोभस फूल - राग | ६७ |
| १९ | नेत्रदीपक पुरातन मंदीर-हरिपुंचाई | ६७ |
| २० | राजवाड्यावरील चित्रे - शुभ्र हत्ती व राणी सिरिकित | ६७ |
| २१ | गतवैभवाची साक्ष देणारे सुखथायी | ६७ |
| २२ | पाठशाळेत | ६८ |
| २३ | राजहस्ते नांगरणी | ६८ |
| २४ | बुद्धमूर्तींच्या ओळी | ६८ |
| २५ | ओळखा हे काय ते। | ६८ |
| २६ | संगमरवरी मदिरातील बुद्धमूर्ती | ६८ |
| २७ | भिक्षेसाळी | ६८ |

## बहुरंगी छायाचित्रे


| क्रमांक | नाव | पान |
|---|---|---|
| २८ | फी ता खोन उत्सवातील सोंगे | ६८ |
| २९ | नख्या नृत्य | ६८ |
| ३० | संप्रफुम मंदीर | ६९ |
| ३१. | आकर्षक चढण | ६९ |
| ३२ | वात पो - पहुडलेला बुद्ध | ६९ |
| ३३. | भिक्षु धर्माचा स्वीकार | ६९ |
| ३४ | भिक्षुमेळा | ६९ |
| ३५ | बोटीवरचा बाजार | ७० |
| ३६ | फुलांची मिरवणूक | ७० |
| ३७ | ओळखा ही फळे! | ७० |
| ३८ | क्वाय नदीवरील ऐतिहासिक पूल | ७० |
| ३९ | मिरवणूक मेणकलोत्सवाची | ७० |
| ४० | आनंदी आनंदी गडे | ७० |
| ४१. | भव्य बँकॉक स्टेशन | ७१ |
| ४२ | मृत्यूच्या जबड्यात | ७१ |
| ४३ | ऑर्किडच्या उद्यानात | ७१ |
| ४४ | कमलपत्रावर | ७१ |
| ४५ | पोर्नटीप - विश्वसुंदरी, १९८८ | ७१ |
| ४६ | पटायाचा सागरतीर | ७१ |
| ४७ | आम्हीही काही कमी नाही! | ७१ |
| ४८ | सुरम्य थाय - बर्मा सरहद्द | ७२ |
| ४९ | अमाप पैशाचे पीक - अफू | ७२ |
| ५० | चित्रकला छत्र्यावरही | ७२ |
| ५१ | जगप्रसिद्ध सोनेरी त्रिकोणापाशी | ७२ |
| ५२ | रत्नांचे प्रकार | ७२ |
| ५३ | थायी डोंगरी जमाती | ७२ |

# रेखाटने


| क्रमाक | नाव | पान |
|---|---|---|
| १ | प्रवास पूर्वीचा | १३ |
| २ | प्रवास आताचा | १४ |
| ३ | स्वागत नमस्काराने ! | १९ |
| ४ | ऐसपैस तुकतुक | २२ |
| ५. | बुद्धार्पणासाठी | ३१ |
| ६ | दीपदान | ३५ |
| ७ | सयामी जुळे - | ४० |
| ८ | थायलंडमधील मुख्य शहरे | ४५ |
| ९ | लोकशाही स्मारक | ४८ |
| १० | बोधचिन्ह | ४९ |
| ११ | बुद्धमुद्रा | ५३ |
| १२ | मदिरात दिसणारी चित्रे | ५४ |
| १३ | मदिराच्या शिखरांचे प्रकार | ५५ |
| १४ | झोक्याची उत्तुंग कमान | ६१ |
| १५ | मुष्टियुद्ध की लत्तायुद्ध ? | ७५ |
| १६ | बांबू नृत्य | ७६ |
| १७ | खेळ सापाशी | ७८ |
| १८ | सयामी माजर | ९४ |
| १९ | हत्तीकडून मसाज | ९६ |
| २० | नख्या नृत्य | ९७ |
| २१ | बँकॉकमधील मुख्य रस्ते व ठिकाणे | १२६ |

# १ - पूर्वेचे प्रस्थान

प्राथमिक शाळेत असतानाच **भूगोलामुळे** प्रवासाचे कुतुहल माझ्या मनात निर्माण झाले  गावे आणि स्थळे लक्षात रहावीत म्हणून आमचे भूगोलाचे भोमे मास्तर तेथील वैशिष्ट्ये इतकी खुलवून सागत की, लगेच त्या गावी जावेसे वाटे जेजुरीच्या जत्रेचे वर्णन त्यानी एक दिवस खडोबाचा येळकोट करीत सागितले, अन् घरी आल्यावर मी तेथे जाण्यासाठी आईबाबांपाशी हट्टच धरला  मास्तरानी शिकविलेली ठिकाणे आमच्या डोक्यातच नव्हे तर रोमारोमात भिनत असत आणि त्यामुळे ती कधी कधी स्वप्नातही येत  अशा स्वप्नात मी कोल्हापूरच्या अबाबाईला जाऊन आले, पढरीची वारी केली, महाबळेश्वरची थड हवा खाऊन आले, सिंहगड चढून आले आणि मुबईच्या राणीच्या बागेत जाऊन पशुपक्ष्यांशी बोलूनही आले ।

आम्ही सर्व खेड्यातल्या  माझ्या बाकावर शेजारी बसणारी सुमी दोनच दिवस मुबईला जाऊन आली आणि तिथल्या गमती सागताना भलताच भाव खाऊ लागली  त्यावेळी आपण अद्याप पुणे सुद्धा पाहिले नाही म्हणून मला खत वाटू लागली. आपल्या मामाची बदली महाडहून मुबईला झाली तर किती मजा येईल असे

विचार मनात येऊन मी त्याच्या बदलीसाठी रोज सर्व देवांची मनोभावे प्रार्थना करी। त्यापैकी एक तरी पावेल असे वाटे ।

पुढे वरच्या इयत्तेत गेल्यावर भारताबाहेरचा भूगोल सुरू झाला पचखडातील विविधता आणि व्यापकता, तेथील लोकजीवन यांनी मला भारून टाकले न्यू यॉर्क जवळचा स्वातत्र्य देवतेचा पुतळा, लडनचा बकिंगहॅम पॅलेस, पॅरिसचा एफेल टॉवर, आफ्रिकेतील मोकाट सिंह आणि हत्तींचे कळप, चीनची भिंत, इतकेच नव्हे तर चप्पट नाक्या मगोलियन माणसांची चित्रेसुद्धा कित्येक वर्षे मी जतन करुन ठेवली होती। कधी कधी वर्तमानपत्रात परदेशाहून परतलेल्या लोकांचे लेख येत पुन्हा पुन्हा वाचण्यासाठी मी त्याची कात्रणे जपून ठेवी

'दारात दुधाची मोटार बाटल्या ठेवून जाते, वर्तमानपत्रे अगणात येऊन पडतात, तरी सुद्धा अशा गोष्टी कोणी पळवीत नाही मशिनमधून चहा-कॉफी, कोकाकोला अशी गरम अगर थड हवी ती पेये पैसे टाकले की बाहेर येतात' अशी वर्णने वाचून, 'हे खरेच असेल का?', असे वाटत राही. तिकडील सुबत्ततेच्या व सपन्नतेच्या कथा वाचून आश्चर्य वाटे एकेकाळी भारतात सोन्याचा धूर निघत होता. त्यावेळी युरोपात रानटी अवस्थेत हे लोक हिंडत होते तर मग आज हे चित्र एकाएकी कसे उलटे पालटे झाले? पुढे प्रवासवर्णने वाचावयाचे मला वेडच लागले ती वाचताना तेथे जाऊन आल्याचा आनद होई एक दिवस पु. ल. चे पूर्वरगही वाचनात आले 'ती नाना देशाची माणस मलाही बोलावत आहेत' असे स्वप्नात दिसे. 'येईन ह एक दिवस' असे म्हणत मी जागी होत असे. अशा रीतीने पूर्वेचे प्रस्थान लहानपणीच ठेवले गेले आणि सुदैवाने थोडीफार वचनपूर्तीही पुढे झाली.

परदेशात जाण्याची इच्छा आज बऱ्याच भारतीयात असते. परदेश म्हटला की, नाविन्य, मजा, खरेदी आणि अनुभव असे सगळे पुढे येते जवळजवळ १९६० सालापर्यंत परदेश म्हणजे डोळ्यापुढे मुख्यत्वे उभे रहात युरोप व अमेरिका विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी इग्लड-अमेरिकेला जात कोणी शिष्यवृत्त्या मिळवून तर कोणी वाड-वडिलाच्या कमाईवर। काही उच्चभ्रू वैद्यकीय उपचाराला, हवापालटासाठी तर काही व्यापारी उद्योगधद्यासाठी

पण परदेश प्रवास ही त्याकाळची बड्या धेंडाची मक्तेदारी नतर राहिली नाही इ स १९६५ ते ८० या काळात पेट्रोलचे भाव चढू लागले आणि पर्शियन

आखाती देशात पाण्याऐवजी पैशाचा पाऊस पडू लागला या वैराण वाळवटी देशात सर्वांगीण विकास योजना आखल्या गेल्या गरजा वाढल्या भरपूर पगार अन् अनेक सुविधा यामुळे पोटापाण्यासाठी तिकडे जाण्याची एक जबरदस्त लाट भारतात सगळीकडे उसळली। गमत म्हणजे हे जाणारे लोक नुसते सधन अगर उच्च स्तरातील नव्हते, तर उलट, बहुसख्य अगदी कनिष्ट वर्गातीलच आमच्या गावचा आपटे इजिनियर, आणि डोळे डॉक्टर एवढेच नव्हे तर गणू गवडी, सदू सुतार आणि विठू वायरमन हेही दुबईला जाऊन थडकले केरळने तर याचा पुरेपूर फायदा उठवला. सौदी अरेबिया आणि बहरीन, ओमान आणि एमिरेटस्, कुवेत आणि कतार याठिकाणी कर्मचारी म्हणून हजारोंच्या सख्येने केरळी लोक गेले. ज्यांनी देशसुद्धा पाहिला नाही, शिक्षणाचा फारसा गध नाही आणि परदेश तर स्वप्नातही नाही अशा निरक्षर वर्गातील लोकाना विदेशी जाण्याची सुवर्णसधी मिळाली व ते 'फॉरेन रिटर्न्ड' बनले! नुसते पुरुषच नव्हे तर अनेक अडाणी सखुबाई-साळुबाई सुद्धा पोटासाठी आखाती देशांमध्ये गेल्या, सात पिढ्यांची कर्जबाजारी फेडून नायलॉन टेरिलीन साडीत हिंडू फिरू लागल्या आणि वर मान करून जगू लागल्या थोडक्यात १९५० पूर्वी विलायतेला जाऊन आलेल्या व्यक्ती दुर्मिळ दिसत; पण आता गावोगावी नव्हे तर गल्लोगल्ली परदेशी जाऊन आलेले लोक भेटतात.

शिक्षण अगर व्यवसाय या व्यतिरिक्त इतर हेतूनेही लोक आता परदेशी जातात. कला-सस्कृतीची देवघेव अन् क्रीडास्पर्धा या सदराखाली आज अनेक पथके परदेशाची वारी करून येतात. चार-आठ दिवसाच्या सभासमेलनात भाग घेण्याच्या निमित्ताने मौजमजा करण्याची सधीही अनेकाना मिळते. सरकारी, निमसरकारी अधिकारी, महापौर व त्यांच्या आजुबाजूचे पित्ते अशा सधीसाठी टपून बसलेले दिसतात आणखी एक बाहेर जाणारा खास वर्ग म्हणजे राजकारणी, आमदार, खासदार, मत्री लोकाचा आणि नटनट्याचा याना बाहेरच खूप कामे असतात!

पूर्वी आपल्याकडे सर्वसामान्य लोक प्रवास करीत होते लग्न कार्यासाठी, आप्तेष्टांच्या भेटी-गाठीसाठी म्हातारपणी काशीयात्रा हा एक जीवनातला अखेरचा प्रवास समजला जाई पण आता परिस्थिती पालटली आहे बरेच पतिपत्नी दोघेही अर्थार्जन करू लागले आहेत टी व्ही., स्कूटर, फ्रीज आणि फ्लॅट सर्व मिळाले आहे भारतातील प्रेक्षणीय स्थळे या ना त्या कारणांनी पाहिली आहेत अशा लोकांना बाहेरचे जग पहाण्याची उत्सुकता उत्पन्न झाली आहे. शिक्षणासाठी, व्यक्तिमत्व

विकासासाठी अगर हौसेसाठी पर्यटन हा एक नवा प्रघात समाजात रूढ होत आहे. सरकारनेही बाहेर जाणाऱ्याना तीन वर्षातून एकदा ५०० अमेरिकन डॉलर इतके परदेशी चलन देण्याची योजना आखल्याने अनेक लोक त्याचा फायदा घेत आहेत आता कित्येक सहलसस्था देशातच नव्हे तर विदेशातही प्रवास घडवून आणतात जनतेत उत्पन्न झालेल्या पर्यटनाच्या आवडीमुळे सहलसस्था काढणे व चालविणे हा एक किफायतशीर धदा झाला आहे

अशा सहलीत सहभागी होतात बरेचसे मध्यमवर्गीय, स्वतःच्या पैशाने जाणारे हौशी पर्यटक याचा हेतू असतो, बाहेरचे जग पहाणे आणि स्वतःसाठी नाविन्यपूर्ण वस्तूची खरेदी करणे. हे लोक जातात मुख्यतः पूर्वेकडे-अग्नेय आशियाकडे अन् त्यातल्या त्यात करमुक्त असलेल्या सिंगापूर-हाँगकाँगकडे.

जवळ जवळ १९६० पर्यंत पूर्वेकडील देशाबद्दल लोकाना पर्यटनाच्या दृष्टीने खास आकर्षण नव्हते गेल्या दोन दशकात तेथील परिस्थिती बदलली आहे चलन मिळत असल्याने ती राष्ट्रेही विदेशी प्रवाशाना बोलावीत आहेत. त्यामुळे आठवड्यापासून महिन्यापर्यंत तिकडे जाऊन पर्यटक आपले जीवन समृद्ध व अविस्मरणीय करतात वाटेत बँकॉक लागत असल्याने तेथे सहजासहजी मुक्काम करता येतो

पर्यटनाच्या दृष्टीने अग्नेय आशियात मुख्य देश येतात, नेपाळ, बर्मा, थायलड, सिंगापूर, मलेशिया, इडोनेशिया, हाँगकाँग, चीन, कोरिया आणि जपान. एके काळी या भागातील जपान सोडून इतर देश भारतापेक्षा मागासलेले होते. पण आता ते अनेक बाबतीत पुढे गेले आहेत त्यातील गुलामगिरीतील काही राष्ट्रे स्वतत्र झाली आहेत आणि निरनिराळी आकर्षण केद्रे बनली आहेत

पश्चिमेकडील देशाबद्दल व तेथील अनुभवाबद्दल आतापर्यंत अनेकानी लिहिले आहे तेथील उच्च जीवनमान, ऐहिकवृत्ती, आधुनिकता, सामाजिक शिस्त व स्वच्छता, लोकांची उद्योगशीलता, व्यक्तिस्वातत्र्य हे सर्व पाहून भारतीय माणूस तत्काळ अवाक् होतो. आपल्याकडील जीवनाशी तो तुलना करतो, थोडासा भाबावतो व शेवटी त्यातील काय झेपेल ते आत्मसात करण्याचा प्रयत्न करतो

इ.स. १९८४ ते १९८९ या काळात पूर्वेकडील बऱ्याचशा देशात अनेकदा जाऊन महिनोन् महिने राहण्याचा योग मला आला बँकॉक-सिंगापूर कडे, एकदा सहलसस्थेमार्फत गेले, पण नतर त्यातील उणिवा प्रकर्षाने जाणवू लागल्याने पुढील ५-६ सहली स्वतत्रपणे केल्या

पूर्वी आपला देशातर्गत प्रवास म्हणजे सह-कुटुब सह-परिवार पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या लोखडी ट्रका अगर पेट्या, दोरीने बाधलेली सतरजीची वळकटी, खाण्यापिण्यासाठी बरोबर शिदोरी, पितळी फिरकीचा तांब्या, करडी अन् एखाद-दुसरी पिशवी असे डाग त्या काळी असत. जड सामानाच्या पेट्या हमालाच्या डोक्यावर जात



प्रवास पूर्वीचा

नतर निघाल्या सुटकेसेस आणि होल्डॉल. वजनाला हलक्या असल्या तरी या बॅगा जेमतेम ४-५ वर्षे टिकत हँडल तरी तुटे नाहीतर झीप तरी बाद होई.




प्रवास आताचा

बरोबर नेण्याच्या सामानासाठी विमान प्रवासात २० किलो मर्यादा असल्यामुळे परदेशाचे सामान त्या मानाने सुटसुटीत असते अथरुण पाघरुण आणि खाण्यापिण्याचे पदार्थ बरोबर नसतात शिवाय बाहेरून खरेदी करायला थोडीशी सधी मिळावी म्हणून कपडे कमीत कमी घेतले जातात

माझ्या प्रवासात सामान वाहण्यासाठी एक छोटीशी घडीची हातगाडी असते या गाडीमुळे माझ्यासारखी किरकोळ बाईदेखील २५-३० किलो वजनाच्या दोन बॅगा सहज इकडे-तिकडे हलवू शकते! परदेशात अनेक ठिकाणी हमाल नसतात त्यावेळी ही गाडी म्हणजे माझा मोठा आधार

हल्ली पुष्कळशा चाकाच्या सुटकेसेसही मिळतात परतु त्यात एक माणूस एकापेक्षा जास्त बॅगा नेऊ शकत नाही तिची चार चाके सस्थेतील चार लोकाप्रमाणे एक मताने कधीच चालत नाहीत! एक तरी अडून बसतेच। अशा बॅगाचा तोल सांभाळणेही अवघड वाटते शिवाय विमानतळावरील सामान हाताळण्याच्या फेकाफेकीत बऱ्याचदा चाके बाद होऊन जातात. त्यामुळे मला दोन चाकी गाडीच सोयीची वाटते

पूर्वीच्या प्रवासवर्णनात जग प्रवासाला निघालेली बरीचशी युरोपियन माणसे सूट पॅन्ट व टाय घातलेली व पन्नाशी उलटलेली असत असे वाचनात येई माझ्या पन्नाशीतल्या प्रवासात मात्र बरोबरचे बहुसख्य प्रवासी अर्धी चड्डी व गजीफ्रॉकात किंवा टीशर्ट जीनमध्ये व चाळिशीच्या आतील

काहीजण पाठीवर आपले ओझे ठेवून, स्वखर्चाने फिरणारे होते या तरुणाच्या आत्मविश्वासाचे व धडाडीचे कौतुक वाटते अगदी लवकरच्या वयात हे असा प्रवास कसा करू शकतात हे मला न सुटलेले एक कोडे आहे कारण आपल्याकडील तरुणाना विद्याभ्यासाची अगर नोकरीची चिंता, कुटुबाची जबाबदारी अशा अनेक अडचणीमुळे स्वखर्चाने मजेसाठी प्रवास ही कल्पनाच इतक्या लहान वयात करता येत नाही। पण ही मुलेमुली कशी अगदी निश्चित मनाने, मजेत, आनदात सर्व प्रवास करीत होती आणि त्याचे ते प्रफुल्ल, हसरे चेहरे पाहून माझाही उत्साह द्विगुणित होत होता! वृद्धावस्थेत करण्यापेक्षा तारुण्यातील देशाटन हे निर्धोक व सुखावह असते शिवाय आलेल्या अनुभवाचा जीवनात पुढे अनेक दृष्टीने उपयोग व लाभ होतो

अग्नेय आशियातील पहिला देश म्हणजे आपला सख्खा शेजारी नेपाळ हिमालयाच्या कुशीत वसलेला श्रद्धाळू आणि कष्टाळू लोकाचा हा देश मला आवडला परमपवित्र पशुपतिनाथ आणि सर्वोत्तुग सागरमाथा, रम्य सरोवरे आणि असख्य हिमशिखरे, लढवय्ये गोरखे आणि साहसी शेरपे याचा

विश्वातील एकमेव हिंदुराष्ट्र म्हणविणारा व ते अभिमानाने सांगणारा देश सारे जग ज्यासाठी आसुसले आहे, जी आज सर्वांना हवी, ती शांतता आणि सुरक्षितता येथे आहे. निवातता आणि निर्धास्तता येथे नांदत आहे ती नेपाळची नवलाई * मी १९८७ त सांगितली तेव्हा चला आता पुढच्या देशात -



* नवलाई नेपाळची · नवभारत प्रकाशन, पुणे ४११ ००२

# २ - बँकॉकमध्ये

भारतातून पूर्वेच्या प्रवासात लागणारा आतरराष्ट्रीयदृष्ट्या महत्वाचा देश म्हणजे **थायलड** पूर्वी तेथे जाण्यासाठी भारतीयाना परवाना (व्हिसा) लागत नसे; पण आता तो आवश्यक आहे. मुबईत थायी कॉन्सुलेटमधून तो घेतला महाराष्ट्रासारखेच हवामान असल्याने थायलडला जाण्यासाठी खास काही कपडे बरोबर नको होते इतर सर्व तयारी केली. मुख्यत' नित्योपयोगी औषधे बरोबर ठेवली परदेशी जाताना इतर काही राहिले तरी मला त्याची फिकीर नसते माझ्या बटव्यात डॉक्टरच्या बॅगेतील औषधापेक्षाही जास्त औषधे असतात। आतापर्यंत हा बटवा सुदैवाने जसाच्या तसा न उघडताच परत आला आहे. तरीपण मला त्याचे कधी ओझे वाटले नाही उलट सर्व प्रवासात तो माझा मानसिक आधार असतो

मुबईला कॅथे पॅसिफिकचे उड्डाण घेतले विमान कलकत्त्याला तासभर थांबले त्यानतर चार तासांनी सकाळी पाचच्या सुमाराला डॉन मुआँग या बँकॉकच्या विमानतळावर आम्ही दोघे उतरलो. **बँकॉक** ही थायलडची राजधानी राजाराणी असलेली आप्रवास व सामान-तपासणीसाठी ११८ खिडक्या असल्याने गर्दी

असूनही दहा मिनिटात सुटका झाली अत्यंत तत्पर समजल्या जाणाऱ्या अमेरिकेतसुद्धा, न्यू यॉर्कच्या केनेडी विमानतळावर १९८७ च्या जुलैमध्ये मला तब्बल दोन तास रखडावे लागले होते। येथील सोपस्कार उरकल्यावर बॅगा घेऊन बाहेरच्या आवारात आलो घड्याळ दीड तास पुढे केले बँक शोधून चलन बदलले

येथील चलन आहे **बाथ** Baht, पण हा शब्द भाथ, बात, भात असाही उच्चारला जात होता एका अमेरिकन डॉलरला सुमारे २५ बाथ मिळाले आपला एक रुपया म्हणजे थायी दोन बाथ असा साधारण हिशेब होता.

बाथच्या खालचे **नाणे** स्टँग. शभर स्टँग म्हणजे एक बाथ स्टँगची पचवीस व पन्नासची आणि बाथची एक, दोन व पाच अशी नाणी आहेत **नोटा** दहा, वीस, पन्नास, शभर व पाचशे इतक्या बाथच्या असतात नाण्यावर व नोटावर एका बाजूला राजाचे चित्र व दुसऱ्या बाजूला राजमुद्रा असते

विमानतळावरील प्रवासी सहाय्यकेंद्रातून माहितीपत्रके व काही नकाशे गोळा केले येथे निवासस्थान ठरविण्याचीही सोय होती. दोन माणसांच्या खोलीला १०० पासून २५०० बाथपर्यंत दर होते. शभर बाथच्या दोन माणसांच्या खोलीला समाईक स्वच्छतागृह, थड पाणी व घरगुती वातावरण पाचशे बाथच्या आसपास वातानुकुलित खोली, सतत गार/गरम पाणी, फोन, टेलिव्हिजन, सलग्न स्वच्छतागृह व खाली पोहण्याचा तलाव व दोन-चार दुकाने असे वातावरण. मला वाटते की, मुबईतसुद्धा २५० रुपयात मध्यवर्ती ठिकाणी इतक्या सोयीचे निवासस्थान मिळणार नाही यापेक्षा जितका दर जास्त, तितका भपका अधिक! आम्ही लोकशाही स्मारकाजवळचे (Democracy Monument) रॉयल हॉटेल निवडले. निवासासाठी काही नावे शेवटी परिशिष्टात सुचविली आहेत

विमानतळापासून शहर सुमारे ३० किलोमीटर दूर आहे एका सूचना-फलकावर वाहनभाड्यासबधी मार्गदर्शन होते लिमोझिनला ३०० बाथ; पण बाहेर टॅक्सी २०० बाथला मिळते हॉटेलमध्ये पोहोचायला साधारण एक तास लागला गावात येताना झोपडपट्टी दिसली नाही अगर मुबईसारखी सांडपाण्याची दुर्गंधीही आली नाही

आमच्या १९८८ मधील सहलीत विमानतळावरून शहरात जाताना जागोजागी 'या राजाचे राज्य दीर्घकाल राहो,' अशा अर्थाचे थायी भाषेतील मोठमोठे

रगीबेरगी **शुभेच्छा फलक** इमारतींवर झळकताना दिसले. काही फलकावर राजमुद्रा, राजचिन्हे, नाग अशा गोष्टी होत्या (चित्र १७).

हॉटेलच्या स्वागतकक्षात तरुण मुलीच कर्मचारी म्हणून होत्या चुणचुणीत आणि सुहास्यवदना त्या गोड आणि आनदी चेहेऱ्यांनीच बँकॉकबद्दल प्रेम उत्पन्न झाले. आम्हाला पाहिल्याबरोबर त्यानी **'सवादी'** म्हटले सवादी म्हणजे नमस्कार. इग्रजीतील 'हॅलो' साठीसुद्धा तो शब्द वापरतात. पण सवादीत बराचसा आदर अभिप्रेत असतो. त्यांच्या रजिस्टरमध्ये नोंदणी झाल्यानतर त्यांच्याकडून 'खोर्पखून' म्हणजे आभार हा शब्द शिकून घेतला कुठल्याही देशात असे दोन शब्द परवलीचेच समजावेत



**स्वागत नमस्काराने**


थायी लोकात **हस्तादोलनाची** रीत **नाही.** दोन्ही हात जोडून, डोळे मिटून नमस्काराची पद्धत टी व्ही. वर कार्यक्रमाच्या सुरवातीला निवेदक नुसतेच हात जोडत नाहीत तर मानही तुकवतात

पर्यटकाची वर्दळ होती पण शांतपणे झटझट, ओळीने एकेकाचे काम चालले होते अगत्य अगदी आपल्या घरी आलेल्या आमत्रित पाहुण्यासारखे खोली घेतली.

खोली सुविधानी सुसज्ज,सुदर व ऐसपैस होती. कुठलाही कचरा नसलेले गालिचे, परीटघडीच्या चादरींवर आकर्षक रगाची आच्छादने व मोरीमध्ये लहानमोठे डझनभर स्वच्छ टॉवेल होते सामान लावून प्रातःर्विधी उरकून बाहेर हिंडायला जाण्यासाठी आम्ही खाली आलो

स्वागतकक्षातील मुलींकडून हॉटेलचे कार्ड, त्याच्या आजुबाजूच्या परिसराचा नकाशा व थायी भाषेतील बँक, पोष्ट, बाजार असे शब्द त्यांच्याच लिपीत लिहून घेतले एकदा हॉटेलच्या बाहेर पडले की बँकॉकमध्ये भाषेची अडचण चांगलीच येते इतकी की काही वेळेला आपले राहण्याचे ठिकाणही आपल्याला सागता येत नाही अगर लवकर सापडत नाही. हॉटेलचे कार्ड हे अशासाठी आवश्यक असते शिवाय आपल्या हॉटेलजवळचे एखादे मोठे ठिकाण लक्षात ठेवावे

लागते आमच्या रॉयल हॉटेल समोरच सनम लुआँग नावाचे शाही समारभ होणारे प्रचड मैदान आहे येथील व्यासपीठही मदिरच्या आकाराचे आहे त्याचेच नाव हॉटेलची खूण म्हणून आम्ही सागत असू कार्यक्रम नसेल तेव्हा सध्याकाळी अनेक लोक पाय मोकळे करायला तेथे येत बौध्द भिक्षूना अन्नदानही करीत



सनम लुआँग मैदान

बँकॉकमध्ये इग्रजी समजणारे लोक कमीच येथे साहेबाचे राज्य नसल्याने जनसामान्यांना इग्रजी शिकण्याची काय गरज? मोठमोठ्या दुकानावर, इमारतीवर व रस्त्यावर बहुतेक सर्व पाट्या थायी लिपीत साधारण चौकटीच्या वळणाच्या अक्षरांची ही लिपी दिसली महिनो न् महिने मी बँकॉकमध्ये राहिले आहे पण एकही अक्षर शेवटपर्यंत सहजासहजी ओळखता आले नाही. हवाई वाहतुकीमुळे सारे देश आता जवळ येऊ लागले आहेत सोईसाठी आतरराष्ट्रीय भाषेची व लिपीची आता किती आवश्यकता आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली

येथे हॉटेलमध्ये सहसा चोऱ्या होत नाहीत तरी पण विनामूल्य लॉकर्सची सुविधा असते आमची कागदपत्रे व वस्तू त्यात ठेवून निश्चित मनाने आम्ही बाहेर पडलो.

# ३ - बहुरंगी लोकजीवन

**बँकॉक शहर** प्रथम दर्शनीच सुदर वाटले लाबलचक, प्रशस्त आणि स्वच्छ रस्ते, त्यावरून भरधाव जाणाऱ्या विविध तऱ्हेच्या मोटारी, त्याच्या गर्दीतून वाट काढून सुळकन् सटकणारे मोटारसायकलस्वार आणि तुकतुक, पदपथावरून साध्या, सुटसुटीत वेषात जाणारे स्त्री-पुरूष; मालाने शिगोशींग भरलेली दुकाने आणि कोपऱ्या कोपऱ्यावर लहानमोठी उपाहारगृहे - असे बॅकॉकचे समृद्ध दर्शन झाले. मुबईसारखेच हे सायकली नसलेले अवाढव्य शहर, पण बकालपणा मात्र कमी वाटला वाहतूक आपल्यासारखीच डाव्या बाजूने


काही हमरस्त्यावरून एकेका दिशेने सहा-सहा मोटारी एका वेळेला जात होत्या. अनेक रस्ते एकेरी वाहतुकीचे दिसले काही चौक तर इतके मोठे होते की त्यातून फुलाच्या पाकळ्यासारखे निरनिराळ्या दिशेला १५-१६ रस्ते फुटलेले दिसत होते त्यामुळे सरळ जायचे असले तरी किती रस्ते ओलाडायचे हे पट्कन् कळत नसे. आपला मूळ रस्ता कोणता हे विचारून खात्री करून पुढे जावे लागे. काही रस्त्यांना चार ते सहा मीटर रुदीपर्यंतचे पदपथ होते पादचारीही मनमानी न

चालता पदपथावरून जाताना दिसले. रहदारीचे हे प्राथमिक नियम या साध्यासुध्या देशातसुद्धा आपल्यापेक्षा कटाक्षाने पाळले जातात हे पाहून नवल वाटले

शिस्त आणि ऐसपैस रस्ते असले तरी असख्य वाहनामुळे बँकॉकमध्ये सतत ट्रॅफिक जॅम असतो दुपारी चारला पधरा मिनिटात जाणारी बस त्याच मार्गावर सध्याकाळी सहाला दोन तास घेते । यासाठी बँकॉक गिनिज बुकात येईल!

बँकॉकमध्ये हिंडायला सर्वात स्वस्त वाहन म्हणजे **बस** येथे दोन प्रकारच्या बस दिसल्या एक साधी व दुसरी वातानुकुलित. दुसरीला दर थोडा अधिक असला तरी इतर कोणत्याही वाहनापेक्षा ती अतिशय स्वस्तच बसमार्गाचा नकाशा आपच्याजवळ असल्याने पाच-सात बाथमध्ये आम्ही शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सहज जात असू

जवळ नकाशा नसेल तर मात्र सर्वात स्वस्त वाहन म्हणजे **तुकतुक.** या आहेत जपानी देहात्सु कपनीच्या रिक्षा आपल्याकडील रिक्षापेक्षा उच, रुद, प्रशस्त आणि बाजूने उघड्या यात हादरेही कमी बसतात वेगाला तर ही टॅक्सीशी बरोबरी करू शकते ऐसपैस असल्याने तीन-चार माणसे यात बसू शकतात एखादा ७५




ऐसपैस तुकतुक

सेंटीमीटरचा ( ३० इची ) टेलीव्हिजन सुद्धा त्याच्या पेटीसह आत जाऊ शकतो आपल्याकडे अशा गोष्टींना चागलीच पचाईत पडते. तुकतुकलाही मीटर नाही, त्यामुळे कुठेही जायचे असले तरी थायी भाषेत लिहिलेला ठिकाणाचा पत्ता चालकाला दाखवून बोटानी खाणाखुणा करुन आम्ही दर ठरवीत असू जगात ही बोटाची भाषा सर्वात सोपी कुठेही चालू शकते परमेश्वराने दिलेल्या या बोटाचा हाही एक महत्वाचा उपयोग आहे ! तुकतुकवाल्याने सागितलेल्या दरापेक्षा घासाघीस करुन दहा-पधरा बाथ सहज कमी होत चालकाला लिहून दिलेला पत्ता लवकर सापडला नाही व त्यासाठी दोन-चार मैल मागेपुढे करावे लागले तरी एकही तुकतुकवाला कधीही कुरकुरला नाही किवा ठरलेल्या भाड्यापेक्षा अधिक पैसेही कुणी मागितले नाहीत विशेष म्हणजे भाडे दिल्यावर मोठ्या अदबीने ते लवत व निरोप घेत! उर्मट अगर भाडखोर तुकतुकवाला आम्हाला आमच्या एकाही मुक्कामात भेटला नाही। तसेच बँकॉकमध्ये मोडीचीही अडचण कधी आली नाही मोड नाही म्हणून एकानेही कधी जादा पैसे घेतले नाहीत। यदाकदाचित् जर त्याच्याजवळ मोड नसली तर तो दुसरीकडून आणून देई! आपल्याकडे आढळते तशी मोडीच्या निमित्ताने १०-२० पैसे उकळण्याची वृत्ती नव्हती.

भाषा समजत नव्हती रस्ते माहिती नव्हते अशा परिस्थितीतसुद्धा येथील तुकतुकचा प्रवास सुरक्षित वाटला त्याचे चालक अगदी विश्वासार्ह आहेत त्याच्याकडून परदेशी प्रवाशांना दगाफटका झाल्याच्या बातम्या ऐकिवात आल्या नाहीत पट्‌कन् जायला तुकतुक अगदी सोयीचे वाहन. कटकट नाही। तीनही बाजूनी उघडा असल्याने उन्हाळ्यात मात्र गरम झळांचा त्रास होतो

बहुतेक टॅक्सी वातानुकुलित असल्याने महाग असतात मीटर नसल्याने आधी ठिकाण सागून दर ठरवावा लागतो चार-पाच लोक व सामान असेल तरच टॅक्सी सोयीची

शहरातील प्रमुख रस्त्यांना गावाची, ठिकाणाची अगर राजाच्या नबराची नावे आहेत. राम पहिला, राम चौथा, राम सहावा अशी राण्याच्या नावाचा मला एकही रस्ता दिसला नाही। या समानतेच्या युगात हा मोठा अन्याय वाटला। स्त्री-हक्क सरक्षक सरथानी येथे मोर्चा काढायला हरकत नाही।

सुरीवॉग्ज व सिलॉम हे येथील मोठमोठ्या व्यवहाराचे आणि पर्यटकाच्या वर्दळीचे समांतर हमरस्ते प्रचड विविध वस्तू भांडारे, लहान-मोठी वातानुकुलित दुकाने, बँका, व्यापारी कपन्याची कार्यालये, आलिशान निवासस्थाने आणि उपाहारगृहे, मालिशखाने आणि निशागारे - ही सर्व ठिकाणे या भागात एकवटलेली दिसली सिलॉम रोडवर महामरिअम्मा नावाचे एक छोटेसे मदीर आहे तेथे तर थायी लोकाचीच जास्त गर्दी असते

रस्त्यातून फिरताना इतरत्रही २५-३० विविध वस्तू भाडारे आढळली इतक्या सख्येने अशी भाडारे मला मुबई, दिल्लीतही दिसली नाहीत बँकॉकमध्ये सिंगापूर, हॉंगकॉंग, न्यू यॉर्कसारख्या उत्तुग इमारती नाहीत, तसेच भारतासारख्या झोपडपट्ट्याही नाहीत डॉलरचा काळा बाजारही कोठे दिसला नाही लॉटरी तिकीट विक्रेते मात्र असख्य आमच्या रॉयल हॉटेलजवळच एका मोकळ्या जागी दोन चार नव्हे तर ४००-५०० लॉटरी तिकिट-विक्रेते आपली दुकाने मांडून बसले होते! मडईत भाजीविक्याचे जसे ओळीने गाळे असतात तशीच ही दुकाने होती

पर्यटकासाठी असलेल्या ठिकाणाना हटकून इग्रजी पाटी असते यात येतात निवासस्थाने, स्मरण वस्तूची दुकाने, सौना व मसाज केन्द्रे, आणि निशागारे

अनेक ठिकाणी मसाज बरोबर स्नानविधीही असतो. इद्रमार्केटला जाताना एके ठिकाणी पाटी होती, Milk bath, Mineral bath, Herbal bath and Turkish bath available! देवाला जसे पचामृतस्नान किंवा दिवाळीत जसे आपले उटणे, अत्तरे लावून अभ्यगस्नान तसे हे असते किंमती १०० बाथपासून ५०० बाथपर्यंत।

वैद्यकीय उपचारापासून विषयवासनापूर्तीपर्यंतचे सर्व मसाज बँकॉकमध्ये आहेत येथे एक सरकारमान्य मसाजसस्था असून तेथे तीन वर्षांचा अभ्यासक्रम असतो अशा प्रशिक्षित मुलामुलींना नतर मोठ्या इस्पितळात नोकरी मिळते मालिशउपचारासाठी परदेशातूनसुद्धा अनेक रोगी बँकॉकला येतात। पाश्चिमात्य पद्धतीत उपाय नसलेल्या अनेक नसाच्या विकारासाठी पारपारिक मसाज हा सोपा, बिनधोक आणि आवाक्यातला इलाज आहे. आपल्याकडेसुद्धा हातपाय मुरगळणे, लचकणे अगर खादे, पाठ, कबर, गुडघे याच्या दुखण्यावर चोळण्यासारखे उपाय केले जातात इकडे याचे प्रस्थ जास्त आरोग्यासाठीही

नियमितपणे मसाज करुन घेणारे स्त्री-पुरुष येथे दिसले मसाज करण्यासाठी हाताइतकाच पायाचा उपयोग करतात पैसे देऊन शास्त्रोक्त लाथा येथे मिळतात! स्पर्श आणि दाब या दोन गोष्टीमुळे रक्तवाहिन्या आणि मज्जाततू याची सवेदनक्षमता वाढून आरोग्य सुधारते असा यांचा दावा आहे अनेक हॉटेलमध्ये विजेने हलणारे पलग व स्नानगृहात पाण्याच्या फवाऱ्याने मसाज (याला जाकुझी म्हणतात) याची सोय होती याशिवाय ॲक्युप्रेशर आणि ॲक्युपक्चर यासारखे उपचार करणाऱ्या अनेक चिनी डॉक्टराच्या पाट्या येथे दिसल्या. स्वतःचा स्वतः मसाज करून घेता येईल अशी अनेक साधी व विजेची उपकरणे बाजारात दिसली

बाजारातील विक्रेत्यात स्त्रियाचा भरणा बराच आढळला हातगाड्या घेऊनही स्त्रिया भाज्या, फळे, काही तयार अन्नपदार्थ, किरकोळ वस्तू विकत होत्या नुसत्याच सरकारी कार्यालयात नव्हे तर बस कडक्टर म्हणूनही मुली काम करताना पाहिल्या यावरून सामाजिक सुरक्षिततेची कल्पना आली भारतात मोठ्या शहरातील काही भागात दिवसा हिंडणेही धोक्याचे वाटते. पण येथे फिरताना मला तशी धास्ती वाटली नाही

**थायी लोक** दिसायला भारतीय आणि चिनी याच्यामधले रग भारतीयांपेक्षा उजळ आणि नाक चिन्यापेक्षा उठावदार मूळचे थायी लोक अग्नेय चीनमधून आले त्यानतर त्यांच्यात पर्शियन, भारतीय, मलायी अशा शेजारी राष्ट्राचे रक्त मिसळल्याने त्या सर्वांच्या वर्णसकरातून आजची थायी प्रजा निर्माण झाली आहे. मध्यम बाध्याचे, काळ्याभोर केसाचे, मोठ्या कपाळाचे असे हे लोक स्त्रियाच्या चेहऱ्यावर मोहक गोडवा ओसडत असतो. साऱ्याच जणू स्मिता-सुहासिनी! आपल्याकडील स्त्रियाइतकी ओढग्रस्तता त्याच्या चेहेऱ्यावर दिसत नाही खाण्यापिण्याची सुबत्ता आणि तणावरहित जीवन याचा हा परिणाम असावा

आम्ही येथे असतानाच थायी तरुणी पोर्नटीप नरखिरूनकॅनॉक ही १९८८ या वर्षाची **विश्वसुदरी** म्हणून निवडली गेली (चित्र ४५) त्यामुळे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात तिच्या सत्काराची आणि धर्मार्थ कार्यक्रमाची धमाल सुरू झाली देशात दोन महिने ठिकठिकाणी आनदोत्सव साजरा झाला अनाथ आश्रमापासून ते राजाराणी, पतप्रधानापर्यंत सर्वांबरोबर कार्यक्रम झाले ठसठशीत नाक, डोळ्याची, उच, गोड आणि हसतमुख अशी ही मुलगी आहे आतापर्यंत

विश्वसुदरी स्पर्धेत थायलडचा दोनदा क्रमाक लागला आहे

ठिकठिकाणच्या सत्कारात निरनिराळ्या सस्थांतर्फे तिला रत्नखचित दागदागिने, घड्याळे अशा शेकडो वस्तू मिळाल्या बँकॉकच्या पहिल्या सत्कारात मुख्य भेटवस्तू होती 'साओ चिंग चा' (पान ६१ ) या उत्तुग कमानीची प्रतिकृती

स्त्रियाचा रोजचा **पोषाख** म्हणजे पाऊण-गुडघ्याखाली थोडी अशी पातळ विजार व वर सैलसा ब्लाऊज,नाहीतर बुशशर्ट. हा पोषाख मला साधा व सुटसुटीत वाटला कपड्याच्या बाबतीत या युरोपियन स्त्रियाइतक्या चिकित्सक नाहीत आपल्याकडे जसा ब्लाऊजचा रग साडीशी जुळायलाच हवा, तितके रगसगतीचे प्रस्थ याच्यात नाही साधारणपणे फिक्या रगाकडेच सर्वसामान्याचा ओढा सणासुदीच्या दिवशी मात्र कटवर्कचिकनचा ब्लाऊज व भरजरी सारोंग, अन् त्यावर चमचमणारी नक्षी व झळाळणारे रग बहुतेक सगळ्या स्त्रिया बॉबकटमध्ये कपाळामागे दोन तीन सेटी मीटरवर आडवा भाग व पुढचे केस कपाळावर आपल्याकडेही आता अशी कपाळावर बटा आणण्याची फॅशन येऊ लागली आहे हातात अगर कानात काही नाही बरेचसे पुरुष शर्टपँटमध्ये लुगीचे प्रस्थ येथे नाही

थायलडमध्ये आपल्याकडे आहे तशी **आडनावाची पद्धत** प्रचारात नाही वडिलाचे, पतीचे अगर गावाचे नाव आडनाव म्हणून वापरले जाते बऱ्याच वेळेला पहिल्याच नावाने माणूस ओळखला जातो. या देशामधील दुसरी गमत म्हणजे नावापाठीमागे लावण्याचा 'खून' हा शब्द. पुरुष असो, स्त्री असो, लहान असो किंवा मोठा असो, सगळ्यांना तुम्ही 'खून' म्हणून पुकारू शकता। आहे की नाही समता? नावावरून हा पुरुष की स्त्री हे त्यांना चटकन् उमजते पण आपल्याला कोणी सागितले की 'खून तक्षिणला भेटा' म्हणजे तो पुरुष आहे की स्त्री हे अगदी आवर्जून विचारावे लागते।

बँकॉकमध्ये वरवर जरी पाश्चात्य सस्कृतीच्या काही गोष्टी दिसत असल्या तरी ते सर्व फळाच्या सालीप्रमाणे आहे थायी जीवनाचा गाभा धर्माधिष्टित आणि रूढी परपरेप्रमाणे चालणारा आहे जवळजवळ ९०% प्रजा धर्माने बौद्ध. सुरवातीपासून आजतागायत सर्व राजे बौद्धधर्मी असल्याने राजाश्रयाच्या खतपाण्याने

हा धर्म येथे चागलाच रुजला आहे. रोजच्या व्यवहारात या धर्मसस्काराचा प्रभाव दिसून येतो

**बौद्ध हा राष्ट्रीय धर्म** असल्याने या धर्माची तत्त्वे पूर्व प्राथमिक शाळेपासून ते थेट विश्वविद्यालयापर्यंत मोठ्या निष्ठेने व बारकाईने शिकविली जातात प्रत्येक शिक्षणसस्थेत बुद्धाची मूर्ती दिसली राजापासून रकापर्यंत सर्वांना आपल्या धर्माचा अभिमान आहे 'मी बौद्ध आहे', असे सागायला त्याना कमीपणा तर वाटत नाहीच, उलट मोठेपणा वाटतो

येथे सबध देशाकरता एक धर्मगुरू असतो एका विद्वान, धर्मशास्त्र पारगत अशा व्यक्तीची या जागी नेमणूक करण्यात येते. प्रजाच नव्हे तर राजघराणेही या व्यक्तीला परमपूज्य **राष्ट्रगुरू** म्हणून मानते.

आम्ही १९८८ मध्ये तेथे असताना त्याचा अठरावा धर्मगुरू सोमदेज फ्रा अरियावोंगसाकतायन याला नव्वदाव्या वर्षी देवाज्ञा झाली त्यावेळी खुद्द **राजहस्ते** त्याचे **क्रियाकर्मातर** झाले राष्ट्रध्वज अर्ध्यावर ठेवून पधरा दिवस सुतक पाळण्यात आले

इ स पू तीन शतके म्हणजे सम्राट अशोकाच्या काळात दोन **भिक्षू** बँकॉकच्या बाजूला आले आणि त्यानी बँकॉकच्या पश्चिमेला, द्वारावती प्रदेशातील नाखोन पॅथॉमला एक छोटेसे बुद्धमदीर व स्तूप बाधून बौद्धधर्माच्या प्रसारास प्रारभ झाला सुरवातीला अगदी हळूहळू प्रगती होती खरा प्रसार शेकडो वर्षानतर श्रीलकेतील भिक्षूमुळे झाला बौद्ध धर्मात महायान व हीनयान (याचे दुसरे नाव थेरवेद आहे) असे दोन पथ आहेत श्रीलका हीनयान पथी असल्याने याच पथाचा इकडे प्रसार झाला सुखथायीच्या राजकमहिग या राजाने प्रथम हा धर्मपथ स्वीकारून राजाश्रय व उत्तेजन दिले

नेपाळ ही बुद्धाची जन्मभूमी व भारत ही कर्मभूमी असल्याने या दोन्ही देशांबद्दल त्याना आदर आहे भारतात येऊन बुद्धगयेचे व इतरही बौद्धस्थळाचे दर्शन घेण्याची इच्छा प्रत्येक थायीला असते हे लोक धर्माभिमानी असले तरी धर्मवेडे नाहीत त्याच्यात सहिष्णुता आहे

थायी लोकाच्या मनात, हिंदुधर्माबद्दल आदर दिसला राजघराण्याने तर 'राम' हा किताब घेतला आहे! सध्याचा राजा स्वतःला नववा राम म्हणवितो ब्रह्मा, विष्णू, लक्ष्मी, गणपती याही मूर्ती आम्हाला काही ठिकाणी दिसल्या आपण मानीत

असलेले सगळे देव मुआँग बोरान या प्राचीन नगरीत देवाचे साम्राज्य अथवा देवलोक या विभागात मूर्तीरूपाने दिसले

वात म्हणजे मदीर वात पो हे येथील प्रसिद्ध सार्वजनिक बुद्ध मदीर तेथे एकदा एका भिक्षूशी सहज बोलणे झाले. 'धर्म माणसावर सुसस्कार घडवितो, नीतीमत्तेचे रक्षण करतो आणि माणसातील माणुसकी जागृत ठेवतो कायदा सुसस्कार घडवू शकत नाही, फक्त धाक दाखवितो, मग माणूस त्यातून पळवाटा काढतो धर्म व नीती माणसातल्या सद्सद्विवेक बुद्धीला आवाहन करुन, 'समाजाला वाईट ते माझ्या एकट्याच्या फायद्याचे असले तरी ते मी करता कामा नये', अशी शिकवण देऊ शकतात धर्म समाजाचे रक्षण करु शकतो!' हा त्याच्या बोलण्याचा साराश निधर्मी देशातील लोकानी तेथील हे साध्या भिक्षूचे विचार लक्षात घेण्यासारखे वाटले

प्रत्येक थाय इमारतीच्या आवारात बाहेरच्या फाटकाजवळ सिमेंट कॉंक्रीटच्या स्तभावर एक छोटेसे देऊळ असते. त्याला थायी भाषेत म्हणतात **'सप्रफुम'** व इग्रजीत Spirit House. साधारण एक ते दोन मीटर लाबी, रुदी व उची अशा सुदर देव्हाऱ्यात क्षेत्रदेवता असते तिच्यापुढे फुले, फळे ठेवून उदबत्त्या लावल्या जातात त्यामुळे भूत, पिशाच्चबाधा होत नाही व अडचणी, सकटे येत नाहीत अशी श्रद्धा आहे विशेष म्हणजे फाटकाजवळ, उघड्यावर या गोष्टी असूनही कोणी त्याची विटबना अगर मोडतोड करीत नाही सर्व वस्तू जागच्या जागी, सुरक्षित रहातात तसा हा देश श्रीमंत नाही. मध्यमवर्गच अधिक परतु सुसस्कारांचा प्रभाव त्यांच्यावर खूप आहे लोक साधे, श्रद्धाळू, मवाळ आणि सहिष्णू वाटले

ही सप्रफुम मदिरे इतक्या सुबक आणि कलात्मक रीतीने बनविलेली असतात की, त्या सौंदर्यशिल्पाकडे पहात रहावेसे वाटते. त्याचे नीटस आकार, उठावदार रगरूप आणि नाजुक कलाकुसर सर्वच सुखद. कोणत्याही मूर्तीच्या प्रतिष्ठापनेसाठीसुद्धा ही वापरता येतील. मला वाटते, आपल्याकडील कारागिरानी ही पाहिली व त्या धर्तीवर देवघरे, देव्हारे बनविले अगर उद्यानासाठी याचा उपयोग केला तर ते लक्षाधीश होतील (चित्र ३०)

थायलडमध्ये अशी एक रूढी आहे की, राजापासून रकापर्यंत प्रत्येक कुटुबातील पुरुषाला काही दिवस **भिक्षू व्हावे लागते**। चार दिवसापासून काही

वर्षापर्यंत हा काळ असू शकतो. यावेळी हाती भिक्षापात्र घेऊन उदरनिर्वाह करावा लागतो. माझ्या मुक्कामात सात वर्षापासून साठीपर्यंतचे भगवी वस्त्रे परिधान केलेले भिक्षू रस्त्यात दिसले (चित्र २७). अनेक लोक त्याना यथाशक्ती दान देत हे भिक्षू म्हणजे आपल्याकडील भिकाऱ्यासारखे नसतात तसेच लुच्चे लफगेही नसतात. ही बुवाबाजी नाही, तर खरीखुरी बुद्धनिष्ठा असते. या भिक्षू होण्याच्या चालीमुळे स्वभावातला उर्मटपणा व मुजोरी कमी होऊन अगी मवाळपणा व विनम्रता येते यात शका नाही.रस्त्यात भिक्षुणीही दिसतात. त्या पाढऱ्याशुभ्र वेषात असतात शिक्षा झालेला एखादा गुन्हेगार असला तर त्याला भिक्षुधर्म स्वीकारता येत नाही.

भिक्षू सकाळी सात वाजताच भिक्षेसाठी बाहेर पडतात (चित्र २७) त्याना दान देणे हे पुण्यकर्म समजले जाते. दानानतर साठ वर्षाची सधन, सुशिक्षित स्त्री आठ वर्षाच्या साध्या बालभिक्षूला आदराने हात जोडून नमस्कार करते अशी **भावस्पर्शी दृश्ये** येथे पहायला मिळली भिक्षूच्या अनेक धार्मिक सभा व मेळावे मी पाहिले (चित्रे ३३-३४).

अडवाअडवी, दुसऱ्याला निष्कारण त्रास देणे अगर हेलपाटे घालायला लावणे ही वृत्तीसुद्धा येथे दिसली नाही याचे उदाहरण म्हणजे आम्हाला आलेला विमान कपनीचा व पोलीसखात्याचा अनुभव.

त्याचे असे झाले की, बँकॉकला आमचे विमानाचे तिकीट हरवले। येथे आल्यानतर सुमारे पधरा दिवसांनी ही गोष्ट लक्षात आली कुठे पडले असावे याचा विचार करता वाटू लागले की बँकॉक विमानतळावर आल्याबरोबरच, तपासणीच्यावेळी कागदपत्रे काढली, त्यावेळी ते तेथे पडले असावे म्हणून विमानतळावर गेलो 'हरवले - गवसले' खिडकीपाशी चौकशी केली तेथील कर्मचारी जागेवर होता. त्याने त्याच्या याद्या तपासून पाहिल्या पण आमचे तिकीट सापडल्याची त्यात नोंद नव्हती या तिकिटाचा दुसऱ्या कोणाला उपयोग नसल्याने ते विमानतळावर नक्की मिळेल अशी आशा होती, पण ती फोल ठरली

यावेळच्या निरीक्षणात हा विमानतळ खूपच वर्दळीचा वाटला मुबईचा सहार विमानतळ रात्रीच गजबजलेला दिसतो दिवसा त्या मानाने सामसूम असते त्या तुलनेत हा डॉन मुआँग विमानतळ चोवीस तास गजबजलेला असतो येथे बावन्न कपन्याची विमाने ये-जा करतात.कुतुहलाने येणारे व आनदाने खुषीत परतणारे

पर्यटकाचे लोंढे पहाताना आम्ही रंगून गेलो. तेवढ्यात एकाचा पासपोर्ट खाली पडताना दिसला त्याला त्याचे भानही नव्हते. तो जपानी माणूस घाईने पुढे गेला होता लगेच पळत जाऊन त्याला तो दिल्यावर तीनतीनदा कमरेत वाकून कृतज्ञता व्यक्त करू लागला प्रवासात बाकी काही गेले तर एकवेळ चालेल, परंतु पासपोर्ट हरवला तर सगळेच खुटले ! त्याच्या पासपोर्ट पडण्यामुळे आम्ही परत भानावर आलो व आमच्या तिकिटाची पुन्हा चिंता करु लागलो

ज्या विमानकंपनीचे तिकीट होते त्या कॅथे पॅसिफिक कंपनीकडे जायचे ठरविले. विमानतळावरून बँकॉक शहरात जाण्यासाठी एक लोकलसुद्धा आहे पाच बाथमध्ये जाता येते. डॉन मुऑंग हे विमानतळाच्याच नावाचे रेल्वेस्टेशन आहे ते तेथून सुमारे एक किलोमीटर अंतरावर आहे. तेथे पायी जाता येते किंवा तुकतुकही मिळू शकते. म्हणजे सुमारे पंधरा बाथमध्ये माणूस विमानतळावरून बँकॉकमधील मध्यवर्ती असलेल्या ह्युलुफॉंग स्टेशनवर जाऊ शकतो.(चित्र ४१).


कॅथे पॅसिफिकचे कार्यालय सुरीवॉंग्ज रोडवर होते तेथे तिकीट हरवल्याचे सांगून दुसरे मागितले. आमच्याजवळ तिकिटाचा क्रमांक होताच 'आम्ही या सर्व गोष्टींची खात्री करून तिकीट देऊ शकतो, पण पोलिस चौकीवर वर्दी हवी ती दिली का? नसल्यास ती द्या चौकी जवळच आहे. हा चौकीचा पत्ता व जायला नकाशा', असे समजावून सांगून कर्मचाऱ्याने आम्हाला तीन मिनिटात मोकळे केले

आम्ही पोलिस चौकी गाठली. 'माझ्या हद्दीत ही नोंद येत नाही दुसऱ्या चौकीवर जा ,' अशी वा यासारखी टोलवाटोलवीची उर्मट उत्तरे मिळणार आणि दोन-चार तास थांबून पाच-सात हेलपाटे घालावे लागणार या अपेक्षेने आम्ही आत पाऊल ठेवले; पण आश्चर्याचा सुखद धक्काच बसला ! जागेवरच्या अधिकाऱ्याने आम्हाला 'सवादी' म्हटले ! त्याला आमची तिकीट हरवल्याची कथा सांगितली कुठे, केव्हा आणि कसे हरवले असावे यासंबंधी आमचे म्हणणे त्याने शांतपणे ऐकून घेतले नंतर त्याने तो सर्व वृत्तांत स्वतः थायी भाषेत लिहिला त्याची दुसरी प्रत आमच्या हातावर ठेवली !

हा अधिकारी पोलिस खात्यात असून टर्रेबाज नव्हता! अजागळपणाने,

हलगर्जीपणाने तिकीट हरवल्याबद्दल आम्हाला दोष देऊन तोंडसुख घेण्याऐवजी उलट 'अरेरे! होते असे कधी कधी घाईत. काळजी करू नका' असे सहानुभूतीने बोलून त्याने आम्हाला धीर दिला! हा पोलिसखात्याचा अनुभव अपूर्व वाटला!

ती पोलिसवर्दीची प्रत विमान कपनीला दिल्यावर त्यांनीही ताबडतोब दुसरे तिकीट दिले असले काम भारतात देखील इतक्या झटपट झाले असते की नाही याची शकाच आहे



बुद्धार्पणासाठी

भाविक लोक **बुद्धमंदिरात जाताना** एक कमलपुष्प, दोन मेणबत्त्या व तीन उदबत्त्या नेतात फूल फुलदाणीत ठेवतात. मग धूपदीप लावतात, आणि शेवटी मनोभावे वदन करतात या नमस्काराला 'वाय' म्हणतात दान द्रव्यरूपाने अगर वस्तूरूपाने दिले जाते. वस्तूमध्ये कोरड्या शिध्यापासून खाद्यपदार्थापर्यंत आणि तेलतुपापासून साबुसोड्यापर्यंत काहीही असू शकते.

बँकॉकमध्ये **ज्योतिषाचे** प्रस्थही बरेच आहे. भविष्य सागणारे अनेक लोक आम्हाला दिसले नुसते लग्नसमारभच नव्हे तर मोठमोठे प्रवास, गृहप्रवेश हेही शुभदिवस पाहून केले जातात. राज्यघटनेचा स्वीकार देखील मुहूर्त पाहूनच केला गेला!

अनेक लोकाच्या गळ्यात मतरलेला **ताईत** असतो काही लोक गोंदूनही घेतात त्यामुळे सकट निवारण होते अशी समजूत आहे एका अधिकृत थायी वर्तमानपत्रात एक गमतीदार बातमी होती. 'ज्यावेळी सयामी राजदूत फ्रान्सच्या चौदाव्या लुईच्या दरबारी गेला, तेव्हा लुईला राजदूताच्या गळ्यातील ताईत व हातावरील गोंदणे दिसले. 'हे काय आहे', म्हणून लुईने कुतुहलाने चौकशी केली इतकेच नव्हे तर महत्त्व कळल्यावर याची प्रचीती पहाण्याचे ठरविले. दूत पुढे उभा राहिला. लुईने फ्रेंच शिपायाला त्याच्यावर सहा गोळ्या झाडायला सांगितल्या पण आश्चर्य म्हणजे त्याचे सर्व नेम चुकले।

ताईतासाठी एक खास बाजार आहे. तेथे ताब्यापितळेपासून सोन्या-चांदीपर्यंत सर्व धातूचे ताईत दिसले सकट निवारण, स्त्री, धन प्राप्ती, उद्योगधद्यात, विद्याभ्यासात यश अशा गोष्टीसाठी मत्रसिद्धी व वशीकरणाचे वेगवेगळे ताईत येथे मिळतात अनेक लोकाच्या हातात मतरलेला गडाही असतो.

थायलडच्या लोकजीवनाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे अनेक, जगावेगळे

## सार्वजनिक उत्सव आणि मिरवणुकी

जानेवारीत दिसली एक **पक्ष्याची मिरवणूक!** देशात असणाऱ्या सर्व पक्ष्याच्या प्रतिकृती गवत, काड्या, पेंढा याचा उपयोग करून, ते रगवून तयार केले जातात. ही पक्षी शास्त्रज्ञाची कल्पना. त्याची ही मिरवणूक पहायला अनेक स्त्रिया आपल्या मुलाबाळाना घेऊन रस्त्याच्या दोन्ही बाजूला जागा पकडून बसल्या होत्या. मग जसजसे मिरवणुकीतील सजविलेले पक्षी मोटारीवरून येत, तसतसे मुलाचे आवाज येत, 'काऊ आला, चिऊ आली, पोपट आला, मैना आली, गरुड आला, घार आली, मोर आला, लांडोर आली ।' जगात कुठेही जा, लहान मुलांचा उत्साह सारखाच ।

फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सगळीकडे फुलाना बहर आलेला असतो उत्तरेकडील चागमयी या गावात यावेळी **फुलाची मिरवणूक** निघते

रंगीबेरंगी फुलांनी काढलेले पक्षी, प्राणी, गालिचे एवढेच त्यात असते पण खालची मोटार दिसत नसल्याने ही फुलेच फिरायला निघाल्यासारखे वाटते ! (चित्र ३६)

आम्ही बँकॉकमध्ये रहात असताना मार्च महिन्यात थायी लोकांचा एक महत्वाचा धार्मिक सण व पवित्र दिवस आला ते लोक त्याला **माकापूजा** म्हणतात याचा अर्थ महापूजा. असे सांगतात की या दिवशी बुद्धाचे १२५० शिष्य त्यांचे प्रवचन ऐकण्यासाठी जमले होते. त्यावरून 'महाप्रवचन दिन' असेही या दिवसाला म्हणतात अगदी भल्या पहाटेपासून शेजारच्या बुद्धमंदिरात मंत्रघोष घुमू लागले. या दिवशी राष्ट्रीय सुट्टी होती. आमचा मुक्काम मंदिरातच ठेवला दुपारपर्यंत आबालवृद्ध ठेवणीतले खास कपडे घालून भाविकपणे मंदिरात येत होते येथील बुद्ध मूर्ती सुमारे दहा मीटर उंच होती ! या सुवर्ण पत्रांकित मूर्तीवर विजेच्या दिव्यांचे छत्र होते आसपासच्या छोट्या मंदिरातील मूर्तीही सोनेरी चकमक लावून सजविल्या होत्या. मूर्तीपुढे धूप, दीप, उदबत्त्या, कमळे आणि फळे यांचा ढीग तर होताच, पण बर्फीपासून अंड्यांपर्यंत आणि भातापासून भज्यापर्यंत सर्व प्रकारचा नैवेद्य लोक पुढे ठेवीत होते. हात जोडून, डोळे मिटून प्रार्थना करीत होते, प्रदक्षिणा घालीत होते अन्न, वस्त्र, पैसे अशा प्रकारच्या दानाचा खच पडला होता. देवालयाबाहेर तर जत्राच भरली होती. विविध तऱ्हेचे खाद्यपदार्थ, खेळणी, सटरफटर वस्तूंचे विक्रेते तसेच चक्रीपाळणेवाले अशा सर्व लोकांचा धंदा रात्री दहा वाजेपर्यंत जोरात चालला होता

एप्रिल महिन्यातला सर्वात महत्वाचा सण म्हणजे **'सोंक्रान'**. आपला जसा गुढीपाडवा तसा त्यांचा हा नववर्ष दिन. लोक मंदिरात जाऊन मूर्तीच्या अभिषेकाचे पाणी आपल्या अंगावर शिंपडून घेतात पण याला पुढे गमतीचे स्वरूप प्राप्त झाले एकमेकांच्या अंगावर पाण्याचा फवारा मारण्याची चाल सुरू झाली रस्त्यातून जाणाऱ्या येणाऱ्या नुसत्या पादचाऱ्यांच्याच अंगावर नव्हे तर बसमधून जाणाऱ्या उतारूवरही कुठूनही पाण्याची पिचकारी अचूक येऊ शकते ! आम्ही बसने जात असताना कंडक्टर मुलीने खास सूचना दिली, 'कृपा करून आज खिडकी उघडू नका, सोंक्रान आहे !' आपल्या रंगपंचमीसारखी ही **जलपंचमी** खेड्यात तर हा सण अतिशय उत्साहाने साजरा होतो श्रीमंत लोक एकमेकांवर गुलाबपाणी शिंपडतात

एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात पटायाला **पतगोत्सव** असतो निरनिराळ्या आकारांचे आणि रगाचे प्रचड पतग आकाशात भराऱ्या मारताना दिसतात. चुरशीच्या चढाओढी लावण्यात येतात आणि यशस्वी उमेदवाराना पदव्या देण्यात येतात, 'पतगवीर, पतगराव आणि पतगरत्न' !

मे महिन्यात येणारा एक **राष्ट्रीय समारभ** म्हणजे **नागरणी** आणि **भात पेरणी** राजवाड्यासमोरच्या पटागणात, धर्मगुरूच्या उपस्थितीत एका खास बैलजोडीकडून सोन्याचा नागर ओढला जातो मतरलेले बी राजहस्ते पेरले जाते आणि मग सर्व देशात भाताची पेरणी होते (चित्र २३)

हा देश प्रामुख्याने भातशेतीवरच अवलबून असल्याने राजा मोठ्या श्रद्धेने या समारभात भाग घेतो आपल्याकडे वह्या-पुस्तके वाटायलासुद्धा आमदार खासदार जातात पण कृषिप्रधान भारतात चिखलात उतरून भातलावणी करायला कुणी मत्री-महोदय गेल्याचे ऐकिवात नाही

जूनमध्ये लोई प्रातात दानसई गावात अमेरिकन हॅलोविनच्या धर्तीवर एक मिरवणूक निघते तिचे नाव **फी ता खोन** फ्रा थाट सी सॉंग राक या नावाच्या देवतेचे तेथे एक मदीर आहे त्याचे रक्षण भुते करतात अशी समजूत म्हणून भुतासारखे चमत्कारीक, अक्राळ विक्राळ मुखवटे धारण करून माणसे यात मिरवित जातात कोणाचे फुटभर नाक तर कोणाची जमिनीपर्यंत लोंबणारी दाढी, काहीचे हत्तीसारखे कान तर काहींची नगाऱ्याएवढी पोटे । त्यामुळे ही मिरवणुक पहात असताना लहान मुलेच नव्हे तर मोठेही रगून जातात । (चित्र २८)

जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात उबानरत्चथानी या ठिकाणी **मेणबत्ती उत्सव** असतो प्रचड जाडीची, उचीची आणि आकाराची मेणबत्त्याची झाडे बनविली जातात ती रस्त्याने मिरवित नेऊन शेवटी एखाद्या मदिरापाशी नेतात व तेथे त्या लावल्या जातात आपल्याकडे निराजन, पणती याना जे पावित्र्य ते येथे मेणबत्तीला (चित्र ३९)

एक सप्टेंबरला नाखोन पॅथॉम येथे **डुकराची शर्यत** पहायला मिळाली डुकराच्यामागे त्याचे मालकही पळत असतात सीमारेषेजवळ पोहोचलेल्या एका डुकराला, त्याने आणखी वेगाने पळावे म्हणून, शेवटच्या क्षणी मालकाने चाबूक

लगावला तर ते लगेच तेथेच तटले त्याला हा अन्याय वाटला। जाम हलेना तेवढ्यात मागचे दुसऱ्या क्रमाकाचे डुक्कर पुढे जाऊन विजयी झाले।

अशाच **रेड्याच्याही शर्यती** होतात. अनेक महिषस्वार यात हिरिरीने भाग घेतात.

आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात सॅकोन नाखोन या ठिकाणी **मेणाची** अतिशय सुदर **बुद्धमदिरे** तयार करतात व मिरवित नेतात त्यावरील कोरीव काम व कलाकुसर रेखीव आणि डोळ्यात भरण्यासारखी असते देव्हारे बनविणाऱ्यांनी तर ही मिरवणूक जरूर पहावी. नुसते देव्हारे पाहूनच मन प्रसन्न होते गेल्या तीन दशकात आपल्याकडे देवघर, देव्हारा, देवफळी व आता छोटीशी तसबीर अशी उतरती कळा लागली. आता तर दैनिक देवपूजा दुर्मिळच दिसते सणाला नाही तर सकटकाळी मात्र देवाची जरूर आठवण होते.

नोव्हेंबरमधील पौर्णिमेच्या दिवशी **लॉय क्रथॉन** ऊर्फ**दीपदान** नावाचा सण येतो या दिवशी कमळाच्या आकाराचे केळीच्या पानाचे द्रोण करतात व सध्याकाळी त्यात मेणबत्ती लावून नदीत सोडतात यामुळे सकटनिवारण होते अशी श्रद्धा आहे. त्यावेळची शोभा पाहण्यासारखी असते. मुलींच्या चेहऱ्यावरील श्रद्धाभावसुद्धा टिपण्यासारखे असतात । मुळात जग किती सुदर आहे असे वाटते।



**दीपदान - लॉय क्रथॉन सण**

थायलडमध्ये **कमळाच्या फुलाचे महात्म्य** खूप ते फूल बुद्धाला अतिशय प्रिय बुद्धाचे आसनही त्यावर असते कमळ चिखलात उगवते पण वर पवित्र व निर्मळ रहाते त्याप्रमाणे ससारात राहूनही मनुष्याने मोहापासून अलिप्त रहायला शिकले पाहिजे अशा अर्थाची शिकवण कमळाच्या प्रतिकात आहे

सयाम इटरकॉंटिनेंटल हॉटेल जवळ असलेल्या वात पदुम वनाराम बुद्धमदिराच्या आवारात एक पुष्करिणीआहे. त्यात एके काळी कमलपुष्पे असल्याने ते कमलमदीर म्हणूनच ओळखले जाते राजा राम चौथा याने हे मदीर बाधले अनेकदा तो येथे हवा खाण्यासाठी येत असे सध्या मात्र येथे अजिबात कमळे नाहीत

आम्ही जेव्हा हे मदीर पहायला गेलो तेव्हा तुकतुकवाला म्हणाला, ' हे आम्हा वाहनचालकांचे खास मदीर आहे. गाडीला अपघात होऊ नये म्हणून आम्ही सर्वजण याच बुद्धमदिरात प्रार्थना करतो !' जुने स्थान म्हणून याला महत्व

बँकॉकमध्ये दुसरेही एक फूल सर्वत्र दिसले त्याचे थायी नाव 'राग' पण या रागाचा अर्थ प्रेम आहे । बाजारात याचे छोटे छोटे हार मिळतात (चित्र १८)

वरील मिरवणुकीशिवाय आणखीही काही धार्मिक सणाच्या दिवशी बुद्धाच्या मिरवणुकी निघतात या सर्व उत्सवात मुलामुलींची समूह नृत्ये असतातच त्यामुळे 'आनदी आनदी गडे । इकडे तिकडे चोहिकडे ।' असे वातावरण सर्व वर्षभर कायम दिसते सर्व समारभ व कार्यक्रम परमेश्वर चरणी अर्पिलेले असतात

आपल्याकडे जसे राजकीय पुढाऱ्याचे सत्कार अगर वाढदिवस उठसुठ करतात तसे पेव इकडे फुटलेले दिसत नाही वाढदिवस येथे फक्त राजाराणीचे.

बँकॉकमध्ये **फळाचीही रेलचेल** आहे आणि त्याच्या किमती अतिशय कमी सर्व फळे मला अत्यत स्वस्त वाटली आबे, सत्री, मोसबी, केळी, पेरू पीच, पेअर, पपई, पर्सिमन, फणस, कलिगड, खरबूज, चिक्कू सफरचद, स्ट्रॉबेरी सर्व काही बाजारात केळाच्या येथे तीस जाती आहेत अशी फळविक्या बाईने माझ्या ज्ञानात भर घातली पण याशिवाय मला नवीन दिसलेली फळे म्हणजे राबुटाग, टुक्कू आणि डुरियन डुरियनला तर फळाचा राजा समजतात आब्यापेक्षाही वरचा नबर त्याला आहे. मी मुद्दाम ही सर्व नवीन दिसणारी फळे विकत घेतली राबुटाग व टुक्कू मधुर वाटली पण फळांच्या राजाने घोर निराशा केली। त्याच्या अत्यत उग्र वासामुळे

त्याचा एक तासाचा सहवाससुद्धा असह्य झाला। त्यामुळे ते आमच्या खोली स्वच्छ राखणाऱ्या बाईला देऊन टाकले (चित्र ३७)

प्रत्येक फळाच्या मोसमात त्याची जगी प्रदर्शने भरतात **फळाच्या मिरवणुकी** निघतात. भरघोस उत्पन्न घेणाऱ्यांना पारितोषिके व खास किताब दिले जातात केळी व लामयाय या दोन फळाची प्रदर्शने आम्ही पाहिली

बाजारात कापून ठेवलेली फळेही मिळतात फोडीला काडी लावून अगदी तोंडात टाकायला योग्य अशी आपल्याला मिळतात प्लॅस्टिक पिशव्यात भरून ठेवलेली असल्याने अस्वच्छ वाटत नाहीत त्यामुळे आम्ही अक्षरश· फलाहारावरच रहायचे पसत केले! या सदर्भात एक नवल म्हणजे बाजारात माशा दिसल्या नाहीत। पण माजरे मात्र भरपूर। प्रत्येक उपाहारगृहापाशी दोन चार तरी दिसायचीच पोटभर मिळत असल्याने ती सुस्त पडलेली असायची

बाजारात अनेक खाद्यपदार्थ दिसले कैरी, गाजर, काकडी, आले आणि ऑलिव्ह याची लोणची, तादळाचा गोड शिरा, तीळ अगर खोबरे लावलेले लाडू किंवा वड्या, आंबोळ्या, भाजलेले मासे आणि कोंबडी. बौद्धधर्मी असले तरी थायी लोक मासाहारी आहेत अन्नाच्या फिरत्या हातगाड्याही बाजारात दिसल्या हे विक्रेते रस्तोरस्ती हिंडतात, पण विशेष म्हणजे या फिरत्या गाड्याबरोबर स्त्री विक्रेते होते आपल्याकडे स्त्रिया डोक्यावर पाटी घेऊन हिंडतात, पण हातगाडीबरोबर सहसा नसतात कावडीतूनही तयार अन्नपदार्थ नेतात.

सध्याकाळच्या वेळेला कावडीवाले तर चक्क रस्त्यात पदपथावर चटया अथरतात व आपल्या गिऱ्हाईकांना ऐसपैस बसवून जेवायला वाढतात

बँकॉकमध्ये खाण्यापिण्याची इतक्या तऱ्हेची लहानमोठी उपाहारगृहे आहेत की, कोणालाही परवडेल अशा दरात पोटभर ताजे अन्न सहजासहजी मिळू शकते भात, नूडल्स, मास व मासे हे त्याचे मुख्य अन्न हे लोक तिखट भरपूर खातात निम्मे बँकॉक तर हातगाडीवाल्याकडेच मोकळ्यावर जेवत असावे।

दुसरे जाणवले म्हणजे सिंगापूर - हॉगकॉगमध्ये मॅकडोनॉल्ड, बर्जरकिंग, केंटुकी फ्राईड चिकन यासारखी 'फास्ट फूड' ची दुकाने कोपऱ्या - कोपऱ्यावर दिसतात, परतु बँकॉकमध्ये ती अगदीच दुर्मिळ.

वस्तूच्या अगर खाद्यपदार्थांच्या किंमती आपल्याकडील किंमतीच्या मानाने कशा काय आहेत याबद्दल आम्हाला कुतुहल असे प्रत्यक्ष खरेदीत आम्हाला रस नसे तेव्हा अनेकदा फक्त किंमती विचारून पुढे जात असू. असे पुढे गेल्यावर कुठल्याही तऱ्हेची विक्रेत्याची बडबड कानी आली नाही इतकेच नव्हे तर त्याच्या चर्येवरूनही नाराजी दिसली नाही परतताना आम्ही मुद्दाम त्याच्याकडे पहात असू. आमच्या नजरेला स्मितहास्यानेच उत्तर येई आपल्याकडे किंमत विचारून वस्तू न घेता पुढे गेले की काही विक्रेते मनात अगर उघड आपला कसा उद्धार करतात ते सागायला नकोच

रस्त्यावर इडली, डोसा, वडा-साबार, भेळ, पाणीपुरी, सामोसे अगर पावभाजी असे आपले पदार्थ कोठे दिसले नाहीत बोटावर मोजण्याइतक्या भारतीय उपाहारगृहातच ते मिळतात ती आहेत सरदारजी अगर दाक्षिणात्य लोकानी चालविलेली थायी रुचकर पदार्थांनी भारतीय पदार्थांची उणीव मला तरी भासू दिली नाही वास्तविक आपण जेव्हा दुसऱ्या देशात जातो तेव्हा तेथील खाद्यपदार्थांचा आणि फळफळावळीचा आस्वाद घ्यायला हवा.

थानन (रस्ता) फहुरातला काटकोनात असलेला **थानन चक्रपेट** हा भारतातच आहोत असे वाटणारा खास रस्ता या रस्त्यावर सामोसे तळणारे सरदारजी दिसतील अनेक लहान लहान-अगदी स्वस्त-भारतीयानी चालविलेली गेस्ट हौसेस आणि उपाहारगृहे या रस्त्यावर आहेत डालरोटीपासून लाडू गुलाबजामपर्यंत सर्व पदार्थ येथे आपल्या चवीचे मिळू शकतात तृप्तीचा ढेकर दिल्यानतर बाहेर तबकात डब्या माडून बसलेल्या पानपट्टीवाल्याकडून मसाला पानाने या सर्वावर रगही चढविता येतो।

एकाने इद्रमार्केटजवळ दिल्ली दरबार हॉटेल आहे अशा माहिती दिल्याने एक दिवस त्या बाजूला गेलो दोन तीन गल्ल्या बोळ ओलांडले रस्त्यात कचऱ्याबरोबर वहाणारे साडपाणी, दुर्गंधी हे ही होते हॉटेलच्या मालकानी नजीकचा परिसर व वातावरणही भारतीयच करुन ठेवले होते।

पुष्कळदा दिल्ली पॅलेस, ताजमहाल, सितार, काश्मीर अशी हॉटेलची नावे परदेशात दिसतात ही भारतीय असतील या समजुतीने आपण जातो, पण अनेकदा ती पाकिस्तानी लोकांनीही चालविलेली असतात

पोष्टात अगर बँकेत जाण्याचा मला बऱ्याचदा प्रसग आला येथील कर्मचारीही नेहमी 'सवादी' करून मग एकेकाची कामे करीत. वातावरण कसे खेळकर वाटे बाचाबाची, आरडाओरड कधी कानी आली नाही

थायलडमध्ये जवळ जवळ ९० % साक्षरता आहे लहानपणी चार वर्षाचे शिक्षण सक्तीचे आहे. प्राथमिक शिक्षण मोफत असल्याने खालच्या थरातल्या मुलानाही ते घेता येते देशात अनेक प्रात असले तरी सर्वत्र अभ्यासक्रम एक देशातील सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांचा गणवेषसुद्धा सारखाच शिवाय आपल्या इतके धर्मात जातीभेद नाहीत. त्यामुळे **समाज एकसधी** वाटतो


लोकात **वाचनाची आवड** बरीच वाटली. थायी भाषेतील दैनिकाची किंमत पाच बाथ आहे. इग्रजीत 'बँकॉक पोस्ट' आणि 'दी नेशन' अशी दोन दैनिके दिसली त्याची किंमत प्रत्येकी दहा बाथ आपल्याकडील वर्तमानपत्रापेक्षा तशी ती महाग पण त्यात सविस्तर सर्वांगीण वृत्ताची भरपूर आणि रगीत पाने असतात थायी भाषेत साप्ताहिके व मासिकेही बरीच दिसली।

आपल्याकडे कधी कधी वर्तमानपत्रात **सयामी जुळे** जन्मल्याचे वाचनात येई हा काय प्रकार आहे याबद्दल जिज्ञासा होती. इकडे आल्यावर त्याचा शहानिशा लावलाच पाहिजे असे ठरविले सुदैवाने आमच्याच हॉटेलमध्ये उतरलेल्या दोन थायी डॉक्टराकडूनच सयामी जुळ्याचा मनोरजक इतिहास समजला

बँकॉकपासून ६० किलो मीटरवर मेक्लॉंग नावाच्या खेड्यात एक थायी कोळी दापत्य रहात असे. नवरा मूळचा चिनी बायकोचे नाव नार्क सुमारे ५'-७" म्हणजे सुमारे १६८ सेंटिमीटर उच अशी ही धिप्पाड बाई होती पहिल्या चार मुलानतर ११ मे १८११ रोजी तिला बोटीवरच एक जुळे झाले दोघेही मुलगेच जन्मल्यानतर लगेच लक्षात आले की, ही दोन मुले छातीशी १५ सेंटिमीटर लाब व २० सेंटिमीटर परिघ अशा स्नायूने एकमेकाला जोडली गेली आहेत। बाकी त्याचे सर्व अवयव स्वतत्र होते. मुलाची नावे ठेवली गेली, डाव्या बाजूचा जून व उजव्या बाजूचा इन

याच्या जन्मानतर लाकामध्ये हा कुतुहलाचा विषय होता त्याना पहायला ही ऽऽऽ गर्दी लोटे। हळू हळू मुले मोठी होऊ लागली आईने त्याना कसे वाढवले असेल व ती कशी वाढली असतील हे नवलच आहे दोघाचे स्वभावही भिन्न होते एक शात, समजुतदार तर दुसरा गरम डोक्याचा, भाडखोर.

त्यावेळी राम दुसरा राज्य करीत होता त्यालाही औत्सुक्य. त्याने खास निमत्रण पाठवून या मुलाना बोलावून घेतले व राजवाड्यातील सर्व मडळींनी ही मुले पाहिली



**सयामी जुळे लहानपणी आणि मोठी झाल्यावर**

शारीरिक व्यग होते तरी लहानपणी त्यांनी अडी, मासे विकण्यापासून अनेक व्यवसाय केले ते घोड्यावरही बसू शकत मोठे झाल्यावर त्यानी व्यापार आणि शेती सुरू केली. पुढे ते अमेरिकेला गेले व तेथेच स्थायिक झाले ते सधन शेतकऱ्यात गणले जाऊ लागले तिकडेच त्याची लग्ने होऊन त्याना एकवीस मुलेही झाली।

वैद्यकीय शास्त्र त्या काळात पुढे गेले नसल्याने हे दोघे जन्मभर तसेच जुळे राहिले शेवटी एकाच्या मृत्यूनतर तासातच दुसराही गेला.

या जुळ्याच्या प्रकारावरूनच अशा प्रकारच्या जन्मतःच छातीशी जोडलेल्या मुलाना सयामी जुळे म्हणण्याचा प्रघात पडला

बँकॉकमध्ये रस्त्याने जाताना-पन्नाशीतील एक माणूस टक लावून आमच्याकडे पहात होता तो भारतीय वाटल्याने आम्ही त्याला 'नमस्ते' म्हटले. लगेच आपुलकीच्या भावनेने बोलायला सुरवात केली.

याचे नाव **पारसनाथ यादव** मूळचा उत्तर प्रदेशातील गोरखपूरचा वडिलाबरोबर पचवीसाव्या वर्षी इकडे आला तिकडे शिक्षण फक्त दोन इयत्ता इकडे थायी लिहिता वाचता येत नाही तो दोन ठिकाणी सहा सहा तासाची रखवालदाराची नोकरी करीत होता मासिक प्राप्ती सुमारे ९००० बाथ असे त्याने सांगितले 'मी सुखी आहे भारतात माझ्यासारख्याला एवढे काय मिळले असते?' घरी या म्हणून त्याने आग्रह धरला म्हणून दुसऱ्या दिवशीची सध्याकाळ त्याच्या घरी काढली

घरी बायको व चार मुले होती घर साधेच लाकडी, एकमजली व जुनाट होते. घरी टी व्ही. रेडिओ होता, दोन मोटार सायकली व दोन सायकली होत्या

मुख्य म्हणजे घरात वीस जर्सी गायी होत्या घरची माणसे दुधाचा व्यवसाय साभाळीत होती आम्ही गेलो तेव्हा थोरला मुलगा ब्रिजभूषण खुराक म्हणून खास शिजविलेला भात गायींना घालत होता. मी मुद्दाम तादूळही पाहिले आपल्याकडे माणसाना मिळत नाही असा तादूळ थायलडमध्ये जनावराना मुक्तहस्ताने रोज घातला जातो !

घरातील सर्वांनी ओळख नसतानाही अगत्याने स्वागत केले गवळ्याचेच घर त्यामुळे दहीदुधाचे खास जेवण दिले इतकेच नव्हे तर येथेच रहायला या म्हणून अत्याग्रह केला यादवच्या घराच्या आसपास इतरही अनेक भारतीय होते आणि बरेचसे गवळ्याचाच धदा करीत होते. 'तुमच्या पाहुण्याना आमच्याही घरी घेऊन या', म्हणून आमत्रणे त्याच्या निरपेक्ष प्रेमाने आम्ही गहिवरलो

या उलट दुसराही अनुभव आला काही काम नव्हते तरी भारतीय दूतावासाच्या कार्यालयात केवळ माणसे कशी आहेत हे पहायला आम्ही दोघे गेलो होतो सचिवाशी अर्धा तास इकडचे तिकडचे थायलडसबधी बोलत होतो

सरकारी खर्चाने देता येणे शक्य असतानासुद्धा त्याने 'चहा घेता का' असे विचारलेही नाही आम्ही गेलो तेव्हा तो फोनवर कोणाशीतरी बोलत होता, 'माझा लिकर कोटा काल का आला नाही?' दोन्ही अनुभव कायमचे लक्षात राहिले

लोकशाही स्मारकाजवळ **सत्यसाई प्रतिष्ठान** आहे भारतीय लोक एकत्र जमून तेथे भजन-पूजनाचा कार्यक्रम करतात

त्याच्याच शेजारी **सास्कृतिक आश्रमाची** पाटी पाहिली व आत शिरले तेथे छोटेसे ग्रथालय आहे श्री तालुकदार नावाचे बगाली कुटुब त्याची व्यवस्था पाहते हे दोघे पतिपत्नी योग शिक्षणाचे वर्ग चालवितात आजकाल लोकाना योगाचे महत्त्व पटू लागले आहे यात प्राप्तीही चागली होते स्वत हे शिक्षण व्यवस्थित घेतले तर परदेशात हिंदी आणि योग शिकविणे हे व्यवसाय प्रत्येक भारतीयाला सहजासहजी करता येतील

थायी लोकाना हिंदी शिकविणारे उत्तर प्रदेशातील दोन शिक्षकही तेथे भेटले. टी व्ही वर चाललेल्या रामानद सागर यांच्या रामायणाचे थायी भाषेत भाषांतर करण्यासही ते मदत करीत होते.

बँकॉकमधील एक खास विशेष म्हणजे थायी लोकाच्या जीवनात जितकी धर्मपरायणता दिसते, तितकीच **पर्यटकासाठी रंगेलता** दुसऱ्या महायुद्धानतर अमेरिकन सैनिकाचे तळ दीर्घकाळ राहिल्याने बॅकॉक शहर झपाट्याने चगीभगी होऊ लागले सास्कृतिक प्रदूषण होऊन, पैशाच्या मोहाने हे शहर सैनिकाचे **विलासनगर** बनले वास्तविक थायी लोक स्वतच्या जीवनात रगेल आणि विलासी नाहीत

**ब्रिटीश व अमेरिकन** लोकाच्या **वृत्तीत** मला एक महत्त्वाचा फरक जाणवला ब्रिटीशांनी अनेक देशात वसाहती केल्या, शेकडो वर्षे राज्य केले पण त्यातील कोणतीच ठिकाणे 'नाईट लाईफ' करिता खास प्रसिद्ध नाहीत! पण अमेरिकन सैनिकाचे तळ जेथे जेथे काही वर्षे अल्पकाळ जरी राहिले तरी तेथे निशाजीवन हा त्या राष्ट्राचा एक प्रमुख उद्योग-धदाच त्यानी बनवून ती ठिकाणे जगप्रसिद्ध केली।

सैनिकांसाठी विलासगृहे आणि त्याचे प्रकार इतके वाढले की, इतर पर्यटकही चारी दिशानी येऊ लागले वाढत्या पर्यटकाच्या सख्येबरोबर परत आणखी मोहमयी ठिकाणे असे हे चक्र फिरत राहिले जपान अगर युरोप-अमेरिकेतील देशाच्या मानाने येथे चैनबाजी स्वस्त आहे त्यामुळे देशाचे आकारमान पहाता थायलडमध्ये परदेशी पर्यटकाचा लोंढा अफाट आहे युरोपियन आणि अमेरिकन

अरब आणि ऑस्ट्रेलियन, चिनी आणि जपानी, सर्व देशाच्या पर्यटकाचे तांडेच्या तांडे येथे बारा महिने येत असतात

पर्यटक म्हणजे चार दिवस पालट म्हणून मौजमजा करण्यासाठी आलेले लोक तेव्हा सध्याकाळी खाण्यापिण्यापासून नाचरगावर पैसे उधळणारच आणि कुठल्यातरी निशागारात जाऊन रिक्त खिशाने परतणारच

सध्याकाळच्या वेळी पर्यटकाच्या दृष्टीने बँकॉक ही एक अजब, धुद दुनिया होते. सिलॉम आणि सुरीवाँग्ज या रस्त्याना जोडणाऱ्या पॅटपाँग पथावर अनेक निशागारे आहेत मद्यपान, कॅबेरे, डिस्को नृत्ये असे कार्यक्रम तेथे मध्यरात्रीपर्यंत चालू असतात. लडन, पॅरीस, न्यू यॉर्क किवा सॅन् फ्रॅन्सिस्को याच्या बरोबरीचे हे मोहमयी, उन्मादक शहर बनते. जाहिरात देऊन सोबत सगत देणे अगर पुरविणे हा राजमान्य धदा आहे त्यामुळे सध्याकाळी अशाच गोष्टींवर लक्ष्य केंद्रित करणाऱ्या पर्यटकाना बँकॉक म्हणजे स्वैराचारी नगर वाटल्यास नवल नाही रात्र सरते आणि पहाटेपासून हे चित्र बदलू लागते.

हे शहर स्वच्छदी भासत असले तरी रस्त्यावर अगर बागेत, बसमध्ये अगर रेल्वेत अशा सार्वजनिक ठिकाणी मात्र कोणी सभ्यता सोडून वागत नाही पाश्चात्य देशात सार्वजनिक ठिकाणी जशी कामांधता दिसते तशी येथे दिसत नाही


असे आहे बँकॉकचे विविध रगानी नटलेले लोकजीवन



# ४ - सुजलाम् सुफलाम्

**थायलडची थोडक्यात ओळख** करून द्यायची झाली तर ५१३,००० चौरस किलोमीटर क्षेत्राचा म्हणजे महाराष्ट्राच्या साधारण दीडपट असा हा देश आकार वरती एखाद्या गोलसर ढगासारखा पण खाली तेवढीच लाबलचक शेपटी असलेला याची **सरहद्द** पश्चिमेला बर्माशी, उत्तरेला व पूर्वेला लाओस व कँपुचिया याच्याशी व दक्षिणेला शेपटी मलेशियाशी भिडली आहे. पूर्वेची मेकाँग नदी ही थायलड आणि लाओस या दोन राष्ट्राची सीमारेषा शेपटीच्या पूर्वेच्या समुद्राला म्हणतात थायलडचे आखात

बर्मा, लाओस आणि थायलड या तीन देशाच्या सरहद्दी भिडलेल्या भागाला **सोनेरी त्रिकोण** म्हणतात कारण अफाट पैसे देणाऱ्या मादक अफूची लागवड व व्यापार येथे चालतो अफूला '**काळे सोने**' म्हणतात. या भागात करेन, माँग, मीन, आखा, लाहू आणि लिखू अशा वन्य जमाती रहातात त्यांचा उदरनिर्वाह अफूवरच




थायलंडमधील मुख्य शहरे

थायलडच्या उत्तरेचा भाग डोंगराळ असून विविध प्रकारच्या वृक्षानी समृद्ध आहे देशाचा जवळजवळ १/३ भाग जगलाखाली येतो. भारतात हे प्रमाण १०% वर आता आले आहे थायलडमधून लाकूड मोठ्या प्रमाणावर निर्यात होते ओडक्याच्या वहातुकीसाठी येथील हत्ती प्रसिद्ध आहेत

भारतापेक्षा या देशाचे **पाऊसपाणी** उत्तम म्हणता येईल येथील वार्षिक पावसाचे मान सरासरी १००० ते ३००० मिलीमीटर आहे जुलै ते आक्टोबर हे पावसाचे महिने. त्यामुळे पावसावर खरीप पिके उत्तम येतात सुमारे २० % जमिनीला पाटाचे पाणी मिळते. भाताची दोन पिके घेतली जातात

देशाचा बाकीचा भाग मुख्यत: शेतीप्रधान मध्य भागातून उत्तर-दक्षिण अशी बँकॉकपर्यंत दुथडी वहाते सुमारे तीनशे किलोमीटर लाबीची **मे नाम छाओ फ्राया** ही नदी या देशाची गगाच शेती, पाणी पुरवठा व वहातूक या सर्वांनाच उपयुक्त मोसमी हवामानाचा उष्ण कटिबधातील ६ ते २० अक्षाशातील हा देश. त्यामुळे बारा महिने सर्व तऱ्हेची पिके होतात भात, मका, कापूस, ज्यूट, ऊस, रबर, तबाखू व आरारूट ही त्यातील मुख्य यांची निर्यातही होते अन्नधान्याच्या बाबतीत हा देश **स्वयपूर्ण** असल्याने एकूण प्रजा खाऊनपिऊन सुखी आहे

देशाचा जवळजवळ सर्व व्यापार बँकॉक बदरातून चालतो बँकॉक बदराचा पसारा अफाट आहे. शेती मालाखेरीज बाहेर जाणारा माल म्हणजे तयार कपडे बाकी सर्व गोष्टी आयात म्हटल्या तरी चालतील. बाजारात बहुतेक सर्व माल जपानी बदरातील निम्मे धक्के जपानी बोटीनी अडविलेले असतात।

**इतिहासाबद्दल** बोलायचे म्हणजे हाही एक **प्राचीन काल** असलेला देश आहे ईशान्य दिशेला **उडन थानी** जवळ बॅन चिंग या खेड्यात सापडलेल्या अवशेषावरून इसवी सनापूर्वी ३६०० या काळात तेथे मानव वस्ती होती असे सिद्ध झाले आहे इ स पू ३०० मधील भारतीय लोकाचाही उल्लेख सापडला आहे सम्राट अशोकाचे दोन भिक्षूही धर्मप्रसारार्थ या देशात आले होते त्यामुळे हिंदू व बौद्ध या दोन्ही धर्मांचा व चालीरीतींचा प्रभाव लोकाच्या जीवनावर पडला व तो आजतागायतही टिकून आहे सस्कृत आणि पाली या भाषा येथे प्रचारात होत्या. आजच्या थायी लोकाचे पूर्वज अग्नेय चीनच्या यूनान भागातून आले प्रथम त्यानी चांगमयी या उत्तरेकडील भागात वस्ती केली नतर त्याची हळुहळू लहान लहान राज्ये स्थापन झाली

तेराव्या शतकात **सुखथायीचे** एक मोठे राज्य उदयास आले सुखथायी याचा अर्थ सुखाची सुप्रभात आणि नावाप्रमाणेच ते सुराज्य होते. अनेक विद्या व कला या कालात वाढल्या त्यानतर पुढील ४०० वर्षात सतराव्या शतकापर्यंत चांगमयी, अयुथया, थानबरी या राजधान्यात अनेक घराण्याचे उदयास्त झाले त्यावेळी हा देश या राजधान्याच्या नावावरून ओळखला जाई त्या काळात त्यावेळी शेजारच्या बर्माच्या अनेक स्वाऱ्या या देशावर झाल्या पुढे सोळाव्या शतकात अनेक युरोपियन व्यापारासाठी म्हणून येथे आले ते या देशाला **सियाम** (सयाम) म्हणू लागले आणि म्हणून हेच नाव प्रचारात आले पुढे १९ व्या शतकात इतरांनी ठेवलेल्या या नावाला राजमान्यता मिळाली खुद्द थायी 'सयाम'च उच्चार करतात

इ स १७८२ मध्ये **चाओ फ्या चक्री** हा सेनापती होता. धडाडीचा दुसरा कोणी न दिसल्याने त्याला राज्यपद देण्यात आले तेव्हापासून आतापर्यंत याच घराण्याचे राज्य या देशावर चालू आहे या राजाने '**राम**' हा किताब घेतला त्यामुळे आता थायलडचे राजे राम पहिला, राम दुसरा असे ओळखले जातात तेव्हा थायलडमध्ये खरोखरीच '**रामराज्य**' आहे

सतराव्या शतकात राम पहिला या राजाने छाओ फ्राया नदीच्या एका किनाऱ्यावरील थानबुरी येथील आपली राजधानी, पूर्वेच्या तिच्या दुसऱ्या तीरावर बँकॉकला हलवली त्यावेळी बँकॉक हे छोटेसे मच्छिमारीचे साधे खेडे होते पण राजधानी झाल्याबरोबर त्याची झपाट्याने भरभराट सुरू झाली प्रथम त्याला रत्नकोशी म्हणजे रत्नाचे आगर हे नाव होते पण नतर क्रुग थेप म्हणजे देवदूताचे नगर हे विशेषणही देण्यात आले मुबईला मराठी लोक सोडून आज इतर जसे बॉम्बे या नावाने ओळखतात, तसेच क्रुग थेप हे खरे थायी नाव आपण ओळखतो बँकॉक या नावावरून. याशिवाय 'अजिंक्य देशाची राजधानी', 'परमेश्वराने जिथे पुनर्जन्म घेतला आहे', अशा अर्थाची थायी भाषेतील अनेक विशेषणेही या शहराला लावली गेली


उच्चाकाच्या **गिनीज ग्रंथात** गावाचे सर्वात लाबलचक नाव म्हणून बँकॉकचा उल्लेख आहे बँकॉक हे सक्षिप्त नाव आहे. पूर्ण थायी नाव इतके लाबलचक आहे की, या शहराच्या द्विशतकसावत्सरिक सोहळ्याच्या वेळी लिहिलेले नाव न पहाता टेलिव्हिजनवर ते बिनचुक सागणारी एकच थायी व्यक्ती त्याना मिळाली।

बँकॉक शहर अगदी समुद्रालगत दोन ते दहा मीटर उंचीवर आहे. त्यामुळे सर्वत्र खाली पाणी. आणखी विशेष म्हणजे हे शहर खचत चालले आहे। पुढील दोन शतकात याचे व्हेनिस होऊ शकते असे भूगर्भशास्त्रज्ञाचे भाकीत आहे।

नदीतीरावर राजधानी असल्याने दरबारी समारभाच्या अनेक **मिरवणुकी** छाओ फ्राया नदीतून निघतात । (चित्र १३) नदीतून मिरवणूक हे नाविन्य वाटले त्यामुळे रोजच्या रहदारीला अडथळा कमी येतो हे तर खरेच; पण मुख्य म्हणजे या मिरवणुकी अतिशय सुदर, रम्य व वैभवशाली वाटतात सथ वाहत्या प्रवाहामुळे वातावरणातील प्रसन्नता अतिशय वाढते.

इ. स. १९३९ मध्ये देशात क्रांती झाली राजा राहिला पण लोकशाही कारभार सुरू झाला देशाचे सयाम हे नाव बदलून थायलड करण्यात आले. 'थाय' शब्दाचा अर्थ स्वतत्र. आजुबाजूचे बरेच देश पारतत्र्यात जखडले गेले पण हा देश युरोपियन वसाहतवाल्याच्या मगरमिठीत कधीच सापडलेला नाही !

येथील राजा थोडाफार ब्रिटनसारखा The king reigns but not rules अशी सध्या येथील सत्ता आहे. लोकनियुक्त मत्रिमडळामार्फत सर्व राज्यकारभार चालतो इ. स. १९३९ च्या क्रातीची आठवण म्हणून शहराच्या एका मध्यवर्ती चौकात भव्य लोकशाही स्मारक (Democracy Monument) बाधण्यात आले त्याचे स्थापत्य आगळे वेगळे आणि सुंदर आहे



लोकशाही स्मारक

सध्याचा राजा **अडुल्यडेज भूमिबाल** (अतुल्यतेज भूमिपाल या सस्कृत शब्दाचा अपभ्रंश) हा इ स १९४६ साली गादीवर आला चक्री घराण्यातील हा नववा राजा. राणीचे नाव आहे **सिरिकित** हेही श्रीकीर्तीचे अपभ्रंशित रूप चित्रलद राजवाड्यात राहणारा पण नेहमी जनतेत वावरणारा हा राजा अतिशय लोकप्रिय आहे अमेरिकेत जन्मलेला हा राजा राज्यारोहणानतर काही काळ भिक्षू होऊन मठातही राहिला होता। वृत्तीने हा इतका धार्मिक आहे की, याच्या प्रत्येक राष्ट्रीय कार्यक्रमाची सुरवात बुध्दपूजेने व गुरूवदनाने होते। हा कामकरी राजा कवी, सगीतकार आणि चित्रकारही आहे दिसायला अगदी साधा, एखाद्या शिक्षकासारखा।

डिसेंबर १९८७ मध्ये या राजाच्या वयाला साठ वर्षे पूर्ण होत असल्याने हे सर्व वर्ष पर्यटन वर्ष म्हणून साजरे करण्यात येत होते त्यानिमित्त एक खास **बोधचिन्ह** काढण्यात आले होते. त्यावर बुद्धमदिराची टोकदार शिखरे, नदीतील नावा अशी देशाची खास प्रतिके होती. या पर्यटनवर्षानिमित्त ठिकठिकाणी अनेक समारभ व सोहळे आयोजित करण्यात आले होते खास मिरवणुकी निघत होत्या मिरवणुकीत पुढे लाल पोषाखातील राजछत्रधारी शिपाई दिसत (चित्र ७). रोषणाईची तर सर्वत्र धमाल उडाली होती !

पर्यटनवर्षानिमित्त नेहमीचे हॉटेलचे दर कमी करण्यात आले होते तसेच स्थानिक सहलींचे दरही १९८६ पेक्षा १९८७ मध्ये कमी होते

पर्यटनवर्षाचे बोधचिन्ह

राणी सिरिकित ही एकेकाळी फ्रान्समध्ये असलेल्या थायी राजदूताची कन्या हिचा विवाह इ स. १९५० मध्ये राजा अडुल्यडेज भूमिबाल याच्याशी झाला. पतीबरोबर हीसुद्धा अनेक सार्वजनिक कार्यात उत्साहाने भाग घेते ता १२ ऑगस्ट, १९८८ रोजी हिचा ५६ वा वाढदिवस सर्व थायलडभर धुमधडाक्याने

साजरा होताना आम्ही पाहिला (चित्र २०). या राजदापत्याला एक मुलगा व तीन मुली आहेत

१९८४ ते १९८९ या काळात दरवर्षी आम्हाला बँकॉकमध्ये महिनामहिना राहण्याचा योग आला पण एकदाही मोर्चा पहायला मिळाला नाही अगर वर्तमानपत्रात कुठे वाचायलाही मिळाला नाही देशात सत्तास्पर्धा आहे पण सामान्य जनात असतोषाचे वातावरण नाही भारताला मोर्च्यांचा देश तर थायलडला **मिरवणुकींचा देश** म्हणता येईल।

सियामविषयी माहिती देणारा, सयामबाहेर गाजलेला चित्रपट म्हणजे, **'दि किंग अँण्ड आय'** मुगकुट राजाच्या मुलांना शिकविण्यासाठी अँना नावाची एक अमेरिकन शिक्षिका ठेवली होती तिच्या कारकिर्दीतील घटनावर आधारित हा चित्रपट आहे या चित्रपटात थायलडचा राजा अडाणी व भोगळ दाखविला आहे व अँनाने अनेक सुधारणा घडवून आणून शिस्त लावली व देश प्रगतीपथावर आणला असे यात दर्शविले आहे. त्यामुळे या चित्रपटाला येथे बदी आहे

'माझ्यामुळे इकडचे जग सुधारले' असे पूर्वेकडे काम करणाऱ्या प्रत्येक पाश्चात्याला नेहमीच वाटत असते । लडनच्या वास्तव्यात भारताविषयीही अनेक ब्रिटिशांच्या तोंडी अशी घमेंडीची भाषा मी ऐकली आहे

तारतम्याने विचार करून असे चित्रपट पाहिल्यास देशाची ओळख चागली होऊ शकते

थायलडचा **राष्ट्रध्वज** लाल, पाढरा, निळा, पांढरा व लाल अशा पाच आडव्या पट्ट्यांचा तिरगी आहे (चित्र ६)

आज सुमारे साडेपाच कोटी लोकसख्येचा हा देश जुन्या बौद्ध परपरा टिकवून नव्या सुधारणा आत्मसात करणारा विकसनशील देश आहे सुमारे ९०% लोक बौद्ध, ५% मुसलमान व बाकीचे इतर धर्मीय आहेत

सुमारे ७५% जनता शेतीवरच अवलबून आहे. आबादीआबाद नसली तरी भारतापेक्षा या देशाची परिस्थिती बरी आहे. याचे दरडोई सरासरी वार्षिक **उत्पन्न भारतीय माणसाच्या तिप्पट** म्हणजे सुमारे ७५० अमेरिकन डॉलर आहे । आर्थिक विषमताही येथे कमी आहे

रोजच्या लोकजीवनात स्थैर्य व सुरक्षितता आहे दंगली, जाळपोळ, मारामाऱ्या असे आपल्याकडे नित्याचे झालेले प्रकार येथे नाहीत सार्वजनिक नीतीधर्माची जाणीवही जास्त दिसली वीज बंद आहे, इंधन नाही अगर प्यायला पाणी नाही, तेल मिळत नाही असे कुठेही ऐकिवात आले नाही येथील टेलिफोन काम करतात। बारीक सारीक भुरट्या चोऱ्या आणि पाकिटमारी यांचे प्रमाण आपल्यापेक्षा खूपच कमी भिकारी आम्हाला तर कुठे आढळले नाहीत. भारताच्या मानाने येथील सर्व वस्तूंच्या किंमतीही मला कमी वाटल्या हॉटेलमधील निवास, खाद्यपेये, कपडेलत्ते, भांडीकुंडी, गृहोपयोगी उपकरणे या सर्वांच्या किंमती भारतातील किंमतीपेक्षा कमी आहेत त्यामुळे सामान्य माणसाचे जीवन कमी तणावाचे वाटले

अशा गोष्टीमुळे बँकॉकचे जीवन बहारीचे वाटले! पर्यटनाला सर्व दृष्टीने बहुरंगी असा हा देश मला दिसला!



# ५ - नेत्रदीपक बुद्धमंदिरे


बँकॉकमध्ये अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत बुद्धमंदिरे हा त्यातील पहिला महत्वाचा गट त्या गटातील पहिल्या क्रमाकाचे ठिकाण म्हणजे भव्य जुना राजवाडा व त्यातील राजदैवत - नेत्रदीपक पाचूची बुद्धमूर्ती (मुखपृष्ठ २) त्या खालोखाल येतात पहुडलेला बुद्ध, सुवर्ण बुद्ध, सगमरवरी बुद्ध, सुथाट, साकेत, ब्रह्मन् आणि अरुण ही मदिरे

एखाद्या पर्यटनसस्थेमार्फत गेले की वरील यादीतील फक्त पहुडलेला व सुवर्णबुद्ध एवढीच मदिरे तुम्हाला पहायला मिळतात बाकीची वैशिष्ट्यपूर्ण स्थळे दाखविण्याची टाळली जातात त्यामुळे हजारो रुपये खर्च करून बँकॉकची निम्मी नवलाईसुद्धा तुमच्या वाट्याला येत नाही। स्वतत्रपणे गेले तरच हे शक्य आहे

आताच म्हटल्याप्रमाणे थायलडमध्ये खास पहाण्यासारखी असतील तर येथील उत्तुग आणि प्रचड बुद्धमदिरे। प्रत्येक मदीर म्हणजे आत विशाल आवार, एकात एक गेलेली टोकदार सोनेरी छप्परे आणि कलाकुसरीचे मनोहर प्रदर्शन। केवळ

पाच-पचवीस नाहीत तर सुमारे तीनशे पन्नास मदिरे बँकॉकमध्ये आहेत! या शिवाय उत्सव सण प्रसगी काही ठिकाणी उघड्यावर तीन ते पाच मजल्याइतके उच बुद्धपुतळे उभारले जातात! गल्लोगल्ली आपण सार्वजनिक गणपती बसवतो तसाच हा प्रकार अनेक ठिकाणी हा उत्सव धुमधडाक्याने साजरा होताना पाहिला. फक्त आपण वाजवतो तसे फिल्मी सगीत मात्र नव्हते।

बौद्धधर्माला शेकडो वर्षे राजाश्रय असल्याने बरीचशी मदिरे आणि मूर्ती सुस्थितीत राहिल्या आहेत. विष्णूच्या या नवव्या अवताराला, नेपाळ-भारताच्या बुद्धाला बाहेर इतके पूज्य मानले जाते हे पाहून मी भारावून थक्क झाले! अनेक बुद्धमदिरात विष्णू, गरुड, गणपती याचीही चित्रे कोरलेली दिसली



## बुद्धमूर्तींच्या काही मुद्रा

भूमिस्पर्श, अभय, वितर्क, समाधी अशा वेगवेगळ्या मुद्रेत बुद्धमूर्ती दिसतात.

मदिराच्या भिंतीवर बुद्ध चरित्राशिवाय गरुड, नाग, अप्सरा, यक्ष आणि किन्नर याचीही चित्रे दिसली.

मदिराला सुदर छप्पर असते बहुस्तरीय हे या छपराचे वैशिष्ट्य शिवाय वरती कडेला पक्षाच्या उच मानेसारखे, सुमारे ६० ते १०० सेंटी मीटर लाबीचे लाकडाचे सोनेरी तुकडे असतात त्याना चोफे म्हणतात चोफा हे प्रत्येक मदिराचे आवश्यक अग घरानासुद्धा चोफे असतात त्यामुळे भुताखेताचे निवारण होऊन घराचे सरक्षण होते अशी समजूत

चैत्य किंवा स्तूप भरीव असून त्याला कळस असतो त्यात बुद्धाचे काही अवशेष ठेवलेले असतात काही वेळेला स्तुपाच्या दर्शनी भागावर लहान मोठ्या बुद्धमूर्ती कोरलेल्या असतात


नेपाळमध्ये स्तुपाच्या मनोऱ्यावर चारी बाजूला जसे सर्वसाक्षी डोळे चितारतात तशी पद्धत इकडे कोठेच नाही

येथे **शिखराचेही** अनेक **प्रकार** आहेत  टोकाला अगठ्यासारखे व त्यावर बरेच कोरीव काम असलेल्या उच शिखराला **प्राग** म्हणतात  चौथऱ्यावरील चौकोनी, निमुळत्या होत जाणाऱ्या शिखराला **थाट** म्हणतात  यावरही नक्षीकाम असते  **मुगकुट** प्रकारात चोफ्याची छपरे व मध्यभागी घटाकृती, निमुळते उचच उच सुईसारखे टोकाचे शिखर असते  मुकुटावरून हे नाव पडले



**अप्सरा गरुड यक्ष किन्नर**

**बुद्धमदिरात दिसणारी चित्रे**



**मदिराच्या शिखराचे प्रकार**

प्रेक्षणीयतेत पहिल्या क्रमाकाचे स्थळ म्हणजे भव्य अन् वैभवशाली **राजवाडा** इ स १७८३ मध्ये राम पहिला या राजाने तो बांधला त्यावेळी राज्यकारभाराची सर्व कार्यालये आत होती आता फक्त एकच मत्रालय आत आहे सुमारे दोन लाख चौरस मीटर क्षेत्राच्या या विस्तीर्ण आवारात महामॉंटियान, चक्रीप्रासाद आणि डुसिट महाप्रासाद असे तीन विभाग होते या राजवाड्यात राजनिवास तर असेच, पण त्याशिवाय राज्याभिषेकापासून सर्व दरबारी समारभ येथे होत असत शिवाय परदेशी पाहुण्याच्या स्वागत निवासासाठी अनेक सजविलेले महालही आत होते

मी प्रथम पहायला गेले तेव्हा अनेक महालाच्या दाराशी दिसणाऱ्या सिंहाच्या जोड्या, सुवर्णवखनि मढविलेले खाब व नक्षीकाम केलेल्या भिंती यांनी माझी नजर खिळवून टाकली। यातील प्रत्येक महाल प्रशस्त असून कलात्मकतेने श्रृगारलेला दिसला राजाची अनेक प्रकारची रत्नजडित सिहासनेही येथे होती अमरेंद्र महालात राजा लोकाना भेटायला बोलावीत असे येथील राजाच्या डोक्यावर नऊ टप्प्यांचे पाढरेशुभ्र वस्त्र लावलेले छत्र असते डुसिट महालात मोत्याचे काम केलेल्या सिंहासनावर हे छत्र दिसले तसेच परिसरात अनेक कलात्मक सभामडप व प्रागणे होती आजही या सर्व गोष्टी तेथे आहेत

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे याच जुन्या राजवाड्यात अजूनही थायलडमध्ये सर्वात पवित्र मानण्यात येणारे **पाचूच्या बुद्धाचे (वात फ्रा किओ) मदीर** आहे हा ध्यानस्थ बुद्ध एक सधी पाचू या हरितरत्नावर कोरलेला असून सुमारे ६६ सेंटीमीटर उच व माडीजवळ ५० सेंटीमीटर रुद आहे. याला सोन्याची बैठक असून गाभाऱ्यात तो अकरा मीटर उचीवर बसविला आहे. त्यावर नऊ टप्प्याचे छत्र आहे. हे राजदैवतच असल्याने त्याला काय कमी? अनेक रत्नजडित अलकार, सुवर्ण धाग्यानी विणलेली वस्त्रे असा याचा थाट असतो ऋतुमानाप्रमाणे वर्षातून तीनदा त्याचा पोषाख बदलला जातो मदिराच्या दारे-खिडक्याना सोनेरी रग असून भरगच्च जडावकाम केलेले आहे अनेक ठिकाणी भिंतीवर बुद्धचरित्र व रामायण यातील काही प्रसग रेखाटले आहेत. मदिरात सौंदर्य, गांभीर्य आणि मागल्य सर्वच जाणवते शिवाय शातता व निर्मलता असल्याने आपल्या भारतीय मनात भक्तिभाव दाटून आल्याशिवाय रहात नाही

या महान् मदिराचे प्रवेशद्वारसुद्धा नेत्रदीपक आहे सोनेरी जडावकाम आणि सिहमूर्ती ही त्याची वैशिष्ट्ये

या पाचूच्या बुद्धमूर्तीमागे स्थलातराचा **मनोरंजक इतिहास** आहे

इ स १४३४ मध्ये ही पाचूची मूर्ती उत्तरेकडील एका शेतात सापडली त्यानतर सुमारे १०० वर्षे ही चागमयी या राजधानीत होती चागमयीच्या राजाला मुलगा नसल्याने त्याच्या मुलीच्या मुलाला - नातवाला - बोलावण्यात आले चैचेथ नावाचा १५ वर्षाचा हा नातू लाओसच्या राजाचा मुलगा होता पुढे वडील वारल्यानतर चैचेथ चागमयीहून लाओसला परतला, पण जाताना ही पाचूची बुद्धमूर्ती घेऊन गेला त्यामुळे ही मूर्ती २०० वर्षे लाओसमध्येच होती इ स १७६८ मध्ये राजा राम पहिला याने लढाईत ती परत मिळविली

पाचूच्या बुद्धमूर्तीमागे आणखीही एक **मुत्सद्देगिरीचा इतिहास** सागतात

इ स १८६८ ते १९१० या काळात चुलालाँगकॉर्न नावाचा राजा येथे राज्य करीत होता त्याच्या कारकिर्दीत एक फ्रेंच राजदूत त्याच्या दरबारी आला. मोकळेपणाने हास्यविनोदात गप्पा चालल्या होत्या त्यावेळी राजदूत राजाला म्हणाला, 'फ्रेंच सरकारला आपल्याकडून भेट म्हणून एक वस्तू हवी आहे मिळेल का?' कोणती वस्तू असे विचारणे सयामी राजाला शोभणारे नव्हते म्हणून तो म्हणाला, 'दिली' त्यावर दूत म्हणाला, 'तुमचा पाचूचा बुद्ध आम्हाला द्या !' राजापुढे चागलाच पेच पडला क्षणभर विचार करून मग राजा त्याला म्हणाला, 'आम्हालाही तुमच्याकडून एक वस्तू हवी आहे मिळेल का?' राजदूतालाही 'दिली' म्हणणे भाग पडले ते शब्द उच्चारल्याबरोबर राजा शातपणे म्हणाला, 'तुम्हाला आत्ताच दिलेली पाचूची बुद्धमूर्ती तीच आम्हाला परत द्या !' त्यावर फ्रेंच राजदूत खजील झाला अशा तऱ्हेने राजाने मोठ्या युक्तीने वचनपूर्तीतून आपली सुटका करून घेतली व या राष्ट्रीय ठेव्याचेही जतन केले

राजवाड्यातील सर्वच वास्तू सौंदर्यशाली आहेत. जागोजागी असलेले मनोरे पहात रहावेसे वाटतात. जीव ओतून कारागिरानी येथे सजावटीची धमाल उडवली आहे रात्री रोषणाई केलेली असली की राजवाडा म्हणजे स्वप्ननगरीच वाटते

दुरून पाहिला तेव्हा लडनच्या बकिंगहॅम पॅलेसपेक्षाही मला हा राजवाडा सुदर वाटला।

हा सर्व परिसर अर्धा दिवस खर्च करून पहाण्यासारखा आहे बॅंकॉकमध्ये आल्या आल्या सर्वात प्रथम जाऊन पहावे असे हे ठिकाण हे रोज खुलेही असते, पण जवळ जवळ सर्व पर्यटन सस्था हे आपल्या प्रवाशाना दाखविण्याचे टाळतात! कारण असावे याचे ६० बाथ प्रवेशमूल्य। (चित्रे १ ३, ६, ८, ९ व १०).

**वात पो** म्हणजे पहुडलेल्या बुद्धाचे मदीर (Reclining Budha). बॅंकॉकमधील हे सर्वात जुने आणि अफाट पसाऱ्याचे सुमारे २०० वर्षापूर्वी राजा राम पहिला याने आठ हेक्टर क्षेत्रावर हे मदीर बाधले त्यानतरच्या राजानी वेळोवेळी त्यात आणखी भर घातली यातील आडवी बुद्धमूर्ती केवढी असेल? ४६ मीटर लाब व १५ मीटर उच! एवढी प्रचड मूर्ती मी आयुष्यात प्रथमच पहात असल्याने भारावून गेले. सुवर्ण पत्रांनी मढवलेल्या या मूर्तीच्या तळपायावर मोत्याचे (Mother of Pearl) अप्रतिम जडावकाम केले आहे एकशे आठ सुलक्षणे दर्शविलेली ही पदकमले बारकाईने अभ्यासण्यासारखी आहेत पायाची दाही बोटे मात्र जवळ जवळ सारखीच वाटली मदिराचा गाभारा लाब, रुद व उच असला तरी या मूर्तीच्या विशालतेपुढे तो अतिशय थिटाच वाटला (चित्र ३२).

प्रदक्षिणेच्या मार्गावर मदिराच्या प्रत्येक बाजूला सुमारे १५ भव्य बुद्धमूर्ती (चित्र २४). आहेत प्रत्येक मूर्तीच्या चेहेऱ्यावरील भाव वेगवेगळे तरीही गाभीर्य व आनद हा त्याचा स्थायी भाव अनेक भिक्षू प्रदक्षिणा घालताना समोर न पहाता डावीकडे - मूर्तीकडेच पहात हळू हळू पुढे जात होते

वारकऱ्याची दिंडी पहाताना आपल्या मनात जे भाव येतात तसेच भाव या मदिरातील तल्लीन भिक्षू पहाताना माझ्या मनात आले हे मदीर पहाणे म्हणजे एक छोटीशी भावयात्राच आहे.

वात पो मदिराच्या आवारात इतरही अनेक मडप, चैत्य व इमारती ठिकठिकाणी कलात्मकतेने उभारलेल्या आहेत. अनेक ठिकाणी साहित्य, स्थापत्य, ज्योतिष, नीती, सरक्षण आणि वैद्यक अशा अनेक शास्त्रातील सूत्रे सचित्र कोरली आहेत

निमुळती होत जाऊन वर अगदी सुईसारखी लाब व बारीक होणारी येथील चैत्याची शिखरे क्षणोक्षणी आपले लक्ष वेधून घेतात अशी शिखरे जगात इतरत्र कोठेही नाहीत हे थायलडचे खास वैशिष्ट्य आहे (चित्र - मुखपृष्ठ २)

हे मदीर सामान्यजनाच्या सर्वांगीण शिक्षणाचे विद्यापीठ मानले जाते यावरून याचे महात्म्य लक्षात येईल मदिराच्या आवारात एक शाळा, भिक्षूचे मठ, भेटवस्तूची दुकाने, खाद्यपदार्थ विक्रेते, छायाचित्रकार असे सर्व काही होतेच बऱ्याचशा थायी मदिरात शाळाही असतात अशी एकाने माहिती दिली पूर्वी आपल्याकडेही खेडेगावात मारुतीच्या देवळात शाळा भरत. तशीच ही पद्धत

येथील पाठशाळेच्या एका वर्गात आम्ही हळूच डोकावलो विद्यार्थी बौद्ध धर्माच्या शिकवणुकीची सथा घेत होते गुडघे टेकून ते बसले होते (चित्र २२) गडबड नाही, कलकलाट नाही सर्वांचे चित्त अभ्यासाकडे.

आवारातच दोन थायी नर्तिका दिसल्या. त्याच्या भरजरी पोषाखाकडे व उच टोकदार मुकुटाकडे मी पहात राहिले तेवढ्यात दोघींनी मला पकडून 'फोटो, फोटो' म्हटले मी त्याच सुसधीची वाट पहात होते दहा बाथ त्याना दिले हा त्याचा तेथील व्यवसायच होता (चित्र १६)

पुढे दिसला **वैद्यकीय मसाजचा** वर्ग दहा दिवस रोज तीन तास अशा वर्गाला ३००० बाथ शुल्क आहे येथे मसाजही करून घेता येतो ताशी १२० बाथ

हे मदीर धावते पहाता पहातासुद्धा दोन अडीच तास कसे निघून गेले ते समजले नाही. रोज हजारो पर्यटकाची वर्दळ तरीपण स्वच्छ भिकारी नाहीत तसेच हावरे पुजारी नाहीत त्यामुळे वातावरण प्रसन्न वाटले ह मदीर पहायला १० बाथ प्रवेश शुल्क आहे.

दुसरे आश्चर्याने थक्क करणारे स्थळ म्हणजे **वात त्रिमित** बँकॉक शहराच्या मध्यभागी रेल्वेस्टेशनजवळ असलेल्या या मदिरात **साडे पाच टनी निखळ सोन्याची बुद्ध मूर्ती** आहे सुवर्णबुद्ध मदीर (Golden Budha) म्हणूनच हे ओळखले जाते हे मदीर पहायला प्रवेश शुल्क नसल्याने बहुतेक सर्व पर्यटन सस्था हे दाखवितात दाट लोकवस्तीच्या परिसरात आजुबाजूच्या उच इमारतीमुळे हे मदीर चटकन् लक्षातही येत नाही.

याचे खास वैशिष्ट्य म्हणजे जगातील ही सर्वात मौल्यवान धार्मिक मूर्ती आहे

या मदिरामागचा इतिहासही गमतीदार आहे बँकॉक बदराचे बाधकाम चालू असताना पाया खणताना एक प्रचड शिळा आढळली तिचा आकार आसनस्थ बुद्धासारखा भासल्याने ती तशीच उचलून एका मदिरात नेऊन ठेवायचे ठरले त्यासाठी एक मदीर बाधले गेले प्रतिष्ठापनेच्या आधी दोन दिवस मुसळधार पाऊस पडला आणि ही शिळा भिजून चिंब झाली आजुबाजूला चिखलाचा राडा झाला होताच अशा परिस्थितीत ही शिळा जागेवरून उचलताना परत चिखलात आदळली. तेव्हा तिचे काही टवके व थर उडाले आणि त्या ठिकाणी ती चमकू लागली ! हे आश्चर्य पाहून मूर्तीवरचे सिमेंट-मातीचे थर काळजीपूर्वक काढण्यात आले तेव्हा आत निघाली ही शुद्ध सोन्याची तीन मीटर उचीची भरीव मूर्ती ! त्यानतर भव्य समारभ योजून मत्रोच्चाराच्या घोषात या भूमिगत बुद्धाची प्रतिष्ठापना करण्यात आली ही घटना अलीकडची - १९५३ ची मूर्तीच्या मानाने मदीर साधेच वाटले

सतराव्या आणि अठराव्या शतकात सयामवर शेजारच्या बर्माच्या नेहमी स्वाऱ्या होत युद्धकाळात ही सोन्याची मूर्ती पळवली जाईल या भीतीने कुणीतरी योजनाबद्ध रीतीने त्यावर सिमेंट-मातीचा जाड थर लेपून तिला शिळारूप देऊन बँकॉकला दूर नेऊन खड्ड्यात गाडली असावी ! किती हा दूरदर्शीपणा ! त्यावेळी बँकॉक म्हणजे एक नगण्य खेडेगाव होते येथे मूर्ती सुरक्षित राहील असा अदाज होता आणि तसेच झाले ही मूर्ती सुमारे २०० वर्षापूर्वीची अयुथयेच्या मदिरातील असावी असा तज्ज्ञाचा तर्क आहे

हे मदीर माडीवर आहे झळाळणारी भव्य रेखीव मूर्ती, तिच्यासमोरील आरास, श्रद्धेने अर्पिलेली फळे-फुले, लावलेल्या शेकडो उदबत्त्याचा दरवळणारा सुगंध आणि नतमस्तक होणारे थायी लोक हे सर्व पाहून पर्यटक भारावून जातात एका बाजूला शेजारी सिमेट-मातीच्या थराचे तुकडेही ठेवले आहेत

याचवेळी मनात चमकून गेले की आजुबाजूला सैनिक अगर पहारा नसताना ही सुवर्णमूर्ती येथे सुरक्षित कशी राहू शकते ? सार्वजनिक नीतिमत्ता या देशात किती वरच्या दर्जाची आहे हे यावरुन समजेल


**वात बेंचामाबोपिट** हे १९१० साली बाधलेले सगमरवरी बुद्धमदीर बेंचामाबोपीट याचा शब्दशः अर्थ पाचव्या राजाचे मदीर याचा अर्थ परत दिल्लीच्या बिर्ला मदिरासारखा लावायचा पाचव्या राजाने बांधलेले बुद्धाचे मदीर चुलालॉगकॉर्न या चक्री घराण्यातील पाचव्या राजाने हे उभारले

या मदिराची वैशिष्ट्ये म्हणजे विशाल आवार, प्रवेशद्वाराशी दोन प्रचड सगमरवरी सिंह मूर्ती, सगमरवरी भिंती, आत रेखीव मूर्ती, वर गोलाकार टोकदार एकात एक जाणारी छपरे व त्यांची चमकणारी पिवळी कौले (चित्र १२व२६)

आजुबाजूचे वातावरण निवात व प्रसन्न आहे. मदिराच्या भोवताली बुद्धाच्या ५१ पूर्णाकृती मूर्ती असून त्या निरनिराळ्या मुद्रेत आहेत. मदिरातच एक कालवा काढला असून त्यात अनेक कासवे सोडली आहेत आवारात बौद्ध भिक्षूचे मठ आहेत सध्याचा राजा अडुल्यडेज भूमिबाल राज्याभिषेकानतर काही काळ या मठात ध्यानधारणेसाठी येऊन राहिला होता असे सागण्यात आले हे मदीर पहायला १० बाथ प्रवेशमूल्य आहे

सुखथायी या एके काळच्या राजधानीत एका मदिरात एक सुबक बुद्धमूर्ती होती राजा राम पहिला याला ती इतकी आवडली की त्याने ती मूर्ती बँकॉकमध्ये आणली व त्यावर भव्य मदीर उभारले त्याचे नाव **वात सुथाट थेपवरराम** तेथे नक्षीकाम करण्यासाठी खास हत्यारे बनविण्यात आली व १८५० साली बाधकाम पूर्ण झाल्यावर, या नक्षीकामाची प्रतिकृती होऊ नये म्हणून ती लगेच नष्ट करण्यात आली। बँकॉकमधील हे सर्वात उच मदीर याचे इतर विशेष म्हणजे अत्यत कलाकुसरीचे बाधकाम, कलात्मक दरवाजे व खिडक्या, सोनेरी मुलामा दिलेल्या बुद्धमूर्ती, ब्राँझचे घोडे शिवाय अनेक शिलाविहार आणि पॅगोडे

या मदिराजवळच दिसली जगावेगळी अद्वितीय गोष्ट **एक उत्तुंग कमान** पूर्वी त्यावर झोका होता याचे थायी नाव आहे 'साओ चिंग चा' इस्वान या देवतेला सतुष्ट करण्यासाठी झोके घेण्याचा समारभ एके काळी येथे जानेवारी महिन्यात होत असे सुमारे दहा मजले इतक्या उचीच्या या झोक्यावर १८० अशाचे झोके अनेकजण घेऊन दाखवीत



झोक्यासाठी उत्तुंग कमान  साओ चिंग चा

सुथाट मदिराच्या मागच्या बाजूला भारतीयाच्या दृष्टीने दोन आकर्षणे आहेत.

पहिले, सुमारे सहा वर्षापूर्वी रस्त्यातच बांधलेले मखरातले **श्री विष्णु मदीर** मूर्ती शेषावर बसली असून सुदर आणि भव्य आहे

दुसरे स्थळ आहे उत्तर भारतीयानी बाधलेले **देव मदीर** तळमजल्यावर आहे कार्यालय, दुसऱ्या मजल्यावर भव्य रगमच व प्रशस्त प्रेक्षागृह आणि तिसऱ्या मजल्यावर लक्ष्मी नारायण, राधाकृष्ण, शकर, गणपती, मारुती, सिंहवाहिनी दुर्गादेवी व बुद्ध याच्या अतिशय रेखीव आणि सुबक सगमरवरी मूर्ती. आम्ही गेलो ती गोकुळ अष्टमीची सध्याकाळ होती सर्व मदीर फुलाफळानी शृगारले होते, आणि रात्री आठ वाजल्यापासून दोन वाजेपर्यंत कृष्णजन्माचा सोहळा धुमधडाक्याने साजरा होणार होता

बँकॉक शहरातील आणखी दोन खास प्रेक्षणीय ठिकाणे म्हणजे **सुवर्ण टेकडी** व **वात साकेत**

अयुथया या एकेकाळच्या राजधानीत एका उच टेकडीवर एक बुद्धमदीर होते असे मदीर बँकॉकमध्ये असावे असे राजा राम तिसरा याला वाटे पण बॅकॉकमध्ये तर डोंगर नव्हता। म्हणून त्याने चक्क माती आणून एक टेकडी रचली। भुसभुशीत मातीमुळे ही टेकडी फक्त७८ मीटर उचीपर्यंतच गेली या टेकडीवर त्याने बुद्धमदीर बाधून त्याला चार बाजूला चार व मध्ये एक उच सोन्याचे कळस चढवून आपली मनीषा पूर्ण केली येथील बाधकामाच्या वैशिष्ट्यामुळे याला **सुवर्ण टेकडी** (Golden Mount) हे नाव पडले टेकडीवर जाण्यासाठी गोलाकार, ३१८ पायऱ्याचा रस्ता आहे. वरून बँकॉक शहराचे विहगम दृश्य दिसते

याच टेकडीच्या पायथ्याशी ब्रॉझची भव्य बुद्धमूर्ती असलेले मदीर म्हणजे वात साकेत नोव्हेबर महिन्यात या दोन्ही ठिकाणी मोठी जत्रा भरते

आपल्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी चला आता **ब्रह्मन् मंदिरापाशी** बॅकॉकमधील इरावन हॉटेलजवळचे हे देवस्थान जागृत समजले जाते. रस्त्यावरच असलेल्या या छोट्याशा मदिराजवळ नुसत्या स्थानिकच नव्हे तर विदेशी पर्यटकाचीही गर्दी असते मूर्तीसमोर हारांचा खच, अर्पिलेल्या फळांच्या राशी,

भोवताली उदबत्त्याचा घमघमाट व त्याबरोबरच शेजारी चाललेली थायी नर्तकींची भक्तिनृत्ये या सर्व गोष्टीमुळे एक वेगळेच वातावरण येथे निर्माण झालेले दिसले अनेक युरोपियन व अमेरिकनही मूर्तीला हार घालीत होते 'तुमच्यातही अशा श्रध्दा आहेत तर!' असे मी एका चाळीशीतील अमेरिकन जोडप्याला म्हटले एखाद्याच्या देशी गेल्यावर तो पूज्य मानीत असलेल्या अगर त्याला वद्य असलेल्या गोष्टींना आपणही अभिवादन केले तर काय बिघडले ? तुमच्याबरोबर आम्ही खातो, पितो, हिंडतो, तसेच तुमच्या श्रद्धातही सहभागी होतो ' हे त्याचे उत्तर ऐकून मला आश्चर्य वाटले कितीही आधुनिकता येवो शेवटी माणसाला श्रद्धास्थान लागतेच त्यानेच खरी मन शाती मिळते भुकेलेल्याला जसे काहीही चालते तसे खरे अडचणीत आणि सकटात सापडले म्हणजे देव आठवतो व मग कुठलाही देव त्यावेळी चालतो

प्रत्येकाला विस्मित करणारे एक अप्रतिम मदीर म्हणजे छाओ फ्राया नदीच्या पैलतीरावरच्या थानबुरी शहरातील **वात अरुण** (चित्र - मुखपृष्ठ ४) हे पहायला बँकॉकहून फेरी बोटीने पलिकडे जावे लागते. चारी बाजूला चार उत्तुग ८० मीटर (सुमारे पचवीस मजल्याइतके उच) उचीचे मिनार असून त्यावर रगीबेरगी चिनी मातीच्या तुकड्याचे नाजुक नक्षीकाम केले आहे हे मदीर बाधताना तुकडे कमी पडल्याने राजा राम तिसरा याने प्रजेकडे फुटक्या कपबशाची मागणी केली। थोड्याच वेळात त्याचा मोठा ढीग जमा झाला। आणि काम पूर्ण झाले


मिनाराच्या निम्म्या उचीपर्यंत जाण्यासाठी आतून जिने आहेत कलाकुसरीची धमाल उडविलेले हे मदीर पहाताना मी तरी देहभान हरपून गेले। कलात्मकता आणि स्थापत्यशास्त्र या दोन्ही दृष्टीने हे मदीर मला बँकॉकमधील सर्वात सुदर व पहिल्या क्रमांकाचे स्थळ वाटले आता नव्या काळी मदिरे बाधायची असली तर अशी अतुल्य सौदर्यशाली उभारायला हवीत। सूर्योदयाच्या वेळी कोवळ्या किरणामुळे या मदिराची शोभा आणखी खुलते। म्हणूनच याला अरुण मदीर असे नाव पडले। यातील देवदेवता नवसाला पावतात अशी श्रद्धा असल्याने येथे कायम गर्दी असते दोघाची - नवस बोलणाऱ्याची आणि फेडणाऱ्याची। हे पहायला प्रवेशमूल्य नाही तथापि सहलसस्था हे स्थळ दाखवित नाहीत !


अशी ही मदिरे! एकाहून एक सरस। बँकॉकमध्ये शेकडो लहान-मोठी मदिरे आहेत त्यापैकी काही मोजकीच मी पाहिली ती पाहून एक अलौकिक आनद

झाला मूर्तींची भव्यता आणि चेहेऱ्यावरील सात्विकता, आवारातील निर्मळता आणि वातावरणातील प्रसन्नता पाहून मन शांती मिळू शकते यात शंका नाही


बँकॉक बुद्धमय वाटले, भाविक व श्रद्धाळू लोकाचे वाटले, तसेच कलावत-कारागिराचेही नगर वाटले







६ मनोरे व राष्ट्रध्वज



८ रोषणाई राजवाड्यावरची




९ पाचूच्या मंदिराचे प्रवेशद्वार




७ भालदार चोपदार




१० राजवाड्यातील प्रांगणात



११ राष्ट्रीय सग्रहालयातील मडप



१२ बेचामाबोपिट सगमरवरी मदीर



१३ नदीतील राजमिरवणूक




१४ भव्य सरस्वती



१५ हुषार हत्ती




१६ वात पोमधील नर्तिका




१७ राजाचे शुभचिंतन




१८ लोभस फूल --राग




१९ पुरातन मदीर --हरिपुचाई



२० पाढरे हत्ती व राणी सिरिकिट




२१ गतवैभवाची साक्ष देणारे सुखथायी



२२ पाठशाळेत




२३ राजहस्ते नागरणी



२४ बुद्धमूर्तींच्या ओळी



२५ ओळखा हे काय ते !



२६ सगमरवरी मदिरातील बुद्ध



२७ भिक्षेसाठी




२८ फी ता खोन उत्सवातील सोंगे




२९ नख्यानृत्य



३० सप्रफुम मदीर



३१ आकर्षक चढण



३२ वात पो - पहुडलेला बुद्ध



३३ भिक्षुधर्माचा स्वीकार



३४ भिक्षुमेळा



३५ बोटीवरचा बाजार



३८ क्वाय पूल



३६ फुलाची मिरवणूक




३९ मेणकलोत्सव



३७ ओळखा ही फळे।



४० आनदी आनद गडे।



४१ भव्य बँकॉक स्टेशन



४२ मृत्यूच्या जबड्यात



४३ आर्किडच्या उद्यानात



४४ कमलपत्रावर





४५ विश्वसुदरी पोर्नटीप



४६ पटायाचा सागरतीर



४७ आम्हीही काही कमी नाही!



४८ सुरम्य थाय-बर्मा सरहद्द



५१ सोनेरी त्रिकोणापाशी



४९ अमाप पैशाचे पीक --अफू



५२ रत्नांचे प्रकार



५० चित्रकला छत्र्यांवरची



५३ थायी डोंगर जमाती

६

# ६ - इतर प्रेक्षणीय स्थळे

बुद्धमदिरानतर गाजावाजा होणारी बँकॉकमधील **इतर स्थळे** आहेत सुऑन सॅम फ्रान, सर्पोद्यान, तरगता बाजार, विमानमेक राजवाडा, प्राचीन नगरी - मुऑंग बोरान, आठवड्याचा बाजार, सिलॉम ग्रामोद्योग केंद्राचा भोजन व नृत्याचा कार्यक्रम, सुसर उत्पादन केंद्र, राष्ट्रीय सग्रहालय, मॅजिक लँड, थॉमसनचे घर आणि जगप्रसिध्द तम नाक थायी.

सुऑन सॅम फ्रान या थायी शब्दाचा अर्थ आहे **गुलाबोद्यान** (Rose Garden).हे नावाप्रमाणेच गुलाबाच्या नयनरम्य ताटव्यांचे उद्यान बँकॉकपासून सुमारे ३२ किलोमीटर अतरावर थाचीन नदीकाठी असलेल्या या बागेत पिवळे, केशरी, हिरवे, निळे, काळे आणि पाढरे असे अष्टरगी गुलाबाचे गेंद डोलताना पाहून मन प्रसन्न झाले. ठिकठिकाणी थुई थुई नाचणारी कारजी या सौंदर्यात भर टाकत होती

पण मुख्य जाणवली ती तेथील स्वच्छता. सार्वजनिक आणि स्वच्छ असे एकही उद्यान मला आपल्याकडे दिसले नाही खाणेपिणे झाल्यानतर कागद, साली,

फोलपटे, बिया, पिशव्या वगैरे तेथेच टाकून जाण्याची सवय आपल्या लोकात अगोपागी इतकी मुरली आहे की आपण यात काही चुकतोय हेच त्यांना वाटत नाही आणि वाटले तरी, माझ्या चार फोलपटानी काय होतय, अशीच भावना असते थुकण्याची सवय असलेले लोक रस्त्यावर कुठेही पिचकारी टाकतात पण स्वतःच्या घरात मात्र वाटेल तेथे घाण करीत नाहीत। सार्वजनिक स्वच्छतेचे नियम अगर शिस्त हे मी सोडून इतर सर्वांसाठीच असतात अशीच प्रत्येकाची सोयीस्कर समजूत असते।

या उद्यानाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे दाखविण्यात येणारा **सांस्कृतिक कार्यक्रम** परदेशी पाहुण्याना थोडक्या वेळात थायी सस्कृतीची झलक दाखविण्याचा, एक तासाचा हा कार्यक्रम अतिशय स्तुत्य आहे कार्यक्रमाला १६० बाथचे तिकीट आहे तरीपण प्रेक्षागार प्रत्येक खेळाला तुडूब भरते!

बाबूनी बनविलेल्या कौलारू मडपात हा कार्यक्रम असतो आम्ही गेलो तेव्हा गेल्यागेल्या वारा घ्यायला वेळूचे पखे दिले गेले त्यानतर गुलाबपाणी शिंपडलेले थडगार रुमालही ताजेतवाने होण्यासाठी देण्यात आले

कार्यक्रमाची सुरवात थायी वादकाच्या सुरेल सगीताने झाली बरीचशी वाद्ये साधी बाबूचीच होती परदेशी वाद्यांचा तीळमात्र वास त्याना लागलेला नव्हता! ते सगीत ऐकता ऐकता आत आली एक मिरवणूक येथील प्रत्येक पुरुष काही काळ भिक्षू बनतो त्यावेळी वाद्यघोषात निघणाऱ्या मिरवणुकीचे हे प्रात्यक्षिक होते भगवी वस्त्रे परिधान केलेला भिक्षू पुढे व बाकीचे रगीबेरगी वस्त्रे घातलेले त्याच्या मागे

त्यानतर २०-२५ तरुण-तरुणींचे एक साधिक नृत्य झाले सगीताच्या पार्श्वभूमीवर सथपणे सुरू होऊन हळू हळू त्याची गती वाढत गेली मग आठ मुलीनी **नखयांचे नृत्य** सादर केले दाही बोटावर सोनेरी निमुळत्या नख्या चढवून त्याच्या विविध मोहक हालचाली करून त्यानी प्रेक्षकावर मोहिनी घातली (चित्रे २९ व ४०) नुसत्या बोटापेक्षा नख्या घातल्याने एकदम उठावदारपणा येतो

मडपातील कार्यक्रम झाल्यानतर बाहेरच्या हिरवळीवरही काही थायी क्रीडा-नृत्याचे ढगदार प्रकार सादर करण्यात आले नाविन्यपूर्ण वाटणाऱ्या थायी वेषभूषेमुळे व ठेक्यामुळे ते लोकाना इतके आकर्षक वाटले की प्रेक्षकही त्यात

स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले! सर्व नृत्ये वरच्या पातळीवरची होती आपल्या चित्रपटात असते तसे अग प्रदर्शन, कामुकता अगर हिडीसपणा असे प्रकार कोठल्याही नृत्यात नव्हते (चित्र ४०).

त्यानतर दोन तरुणानी **मुष्टीयुद्ध** करून दाखविले ; पण यात नुसत्याच मुष्टी नव्हे तर गुडघे-पायाचाच उपयोग जास्त केला जात होता त्याला मुख्यतः **पदद्वद्वच** म्हणायला हवे! माणसाला गाढवापेक्षाही सुदर दुगाण्या झाडता येतात याची त्यावेळी मला प्रचीती आली शक्तिबरोबर चापल्याचीही या द्वद्वात गरज असते




मुष्टीयुद्ध की लत्तायुद्ध ?

कोंबड्याची झुज लावणे हा खेड्यातील लोकाचा आवडता छद त्याची एक झलक पहावयास मिळाली दोन्ही बाजूचे कोंबडे अटीतटीने लढत होते त्याचे मालक त्याना हातवारे करून प्राणपणाने गर्जून प्रोत्साहन देत होते दोन दोन मिनिटाची फेरी झाली की मध्यतरात त्याना वारा घालून काही रगीत उत्साहवर्धक पेयही पाजीत होते।

त्यानतर ढाल-तलवारी, लाठ्या, काठ्या अशी आयुधे घेऊन मुलींनी द्वद्वे करून दाखवली काठ्यावर काठ्या आपटताना जोरात ठाक् ठाक्, खाट् खाट् आवाज येत. काही कमी जास्त होईल की काय अशी प्रेक्षकांना भीती वाटली इतक्या त्वेषाने

एकमेकींवर तुटून पडून त्यांनी हल्ले केले की, तीन चार मिनिटातच त्या जागेला एकदम रणभूमीचे स्वरूप आले।

नतर पेश करण्यात आला खास थायी नृत्यप्रकार बाबुनृत्य दोन बाबूची दोन टोके दोन हातात धरून तिघे, व त्याच्या समोरच परत तिघे बसले आणि त्यांनी बांबू आत-बाहेर (जवळ-दूर) हलविण्यास सुरवात केली. सगीताचा ठेका सुरू झाला एक जोडी त्यात नाचू लागली बाबू दूर असताना त्यांच्या मधल्या जागेत एक पाय व ते जवळ येण्याच्या वेळी तो पाय बाहेर जमिनीवर - असे करीत त्या नाचू लागल्या नतर आणखी दोन जोड्या त्यांना येऊन मिळाल्या जरा अवधान चुकले की ठोकर बसून साष्टांग नमस्काराचाच सभव ठेक्याची गती हळू हळू वाढू लागली तसतसे उत्स्फूर्तपणे प्रेक्षकही साथ देऊ लागले त्यानी प्रेक्षकाना - 'कोणी येता का?' म्हणून आव्हान दिले पण बराच वेळ कोणीच पुढे येईना 'हूत तुमची' या अर्थाचे हातवारे एक मुलीने सर्व प्रेक्षकांपुढे केल्यावर एक सत्तरीतील गोरी बाई पुढे आली।



बाबुनृत्य - खास थायी प्रकार

ही प्रेक्षकातील स्त्री काय नाचणार म्हणून सर्व इतर प्रेक्षकवर्ग तिच्याकडे कुतुहलाने पाहू लागला पण तिनेही गमत केली दोन बाबू स्वतःच जमिनीवर ठेवून बाकीच्याना 'दूर व्हा' सागून, त्या स्थिर किंवा निश्चल बाबूच्यामध्ये एक पाय आत, दुसरा पाय बाहेर असे करीत नाचायला सुरवात केली तिचा उत्साह पाहून लोकांनीही टाळ्याचा कडकडाट करून तिची वाहवा केली एकूण बाबुनृत्याचा कार्यक्रम कमालीचा रगला

यानतर **थायी लग्न समारभाचे प्रात्यक्षिक** दाखविण्यात आले वर पक्षाचे लोक रुखवत घेऊन वधूच्या घरी आले बरेचसे आपल्यासारखेच, पण लग्न उभ्या उभ्या नाही! चौरगावर दोघाना व्यवस्थित बसवून मत्रोच्चार करीत पडितानी विवाह लावला फुलाच्या अक्षदा उधळल्या गेल्या येथे हार उपरण्यासारखा घातला जातो त्याची दोन टोके जोडलेली नसतात।


यानतर प्रेक्षकाना बाहेर एका तळ्याभोवती जमवून **हत्तीच्या क्रीडा** दाखविण्यात आल्या थायलडचे हत्ती हुषार म्हणून जगप्रसिद्ध आहेत. थायी जनता हत्तीला अतिशय शुभशकुनी मानते मोठमोठे ओडके हलविणे, सोंडेवरुन माहुताला वर उचलणे, कोणी पैसे टाकले की माहुताच्या हातात देणे, पण केळी दिली की स्वतःच गट्टम् करणे असे कार्यक्रम दाखविण्यात आले नतर या सर्वाहूनही रोमाचकारी कार्यक्रम सादर करण्यात आला पाच सहा माणसाना एका शेजारी एक असे दोन फुटाच्या अतराने झोपवण्यात आले मग एका बाजूने एक हत्ती कुणाच्याही अगाला धक्का न लावता, सर्वांना ओलाडून पलीकडे गेला। जरा नजर चुकली किंवा अदाज चुकला तर खाली पहुडलेल्या लोकाची मृत्युशीच गाठ होती। कार्यक्रम चालू असताना प्रेक्षकांचे श्वास रोखले गेले पण हत्तीच्या शहाणपणाचा पुरेपूर विश्वास नव्हे खात्री असल्याने आडवे झालेले लोक निर्धास्त होते। (चित्र १५)

या गुलाबोद्यानात अनेक तऱ्हेचे **कुटिरोद्योगही** पहायला मिळाले रेशीम तयार करणे, ॲल्युमिनीयमच्या भाड्यावर नक्षी काढणे, बाबूच्या सुबक वस्तू बनविणे, मखमलीवर निरनिराळे रगीत देखावे चितारणे अशा गोष्टी येथे चालल्या होत्या. सर्व वस्तू आकर्षक आणि डोळ्यात भरणाऱ्या असल्याने पर्यटक खुषीने त्या खरेदी करीत होते

येथेच पुढे एका ठिकाणी मला फुलांनी भरलेली तबके दिसली पण जवळ जाऊन पाहते तर ती फुले नसून फळभाज्याना कलात्मक आकार देऊन सॅलड कसे

ठेवावे याचे प्रात्यक्षिक दोन तरुणी देत होत्या. गाजर, मुळा, काकडी, कांदा, रताळी, बटाटे, टोमॅटो, खरबूज, पपई अशा गोष्टी त्यात होत्या सॅलडची एवढी कलात्मक रचना मला अद्याप कुठेही पहायला मिळाली नाही (चित्र २५)।

गुलाबोद्यानातील त्या कार्यक्रमात आपल्याला बहुरगी बँकॉकचे बहारीचे दर्शन होते महाराष्ट्रात, मराठी लोकजीवनाचे दर्शन परदेशी लोकाना देणारा व नियमितपणे होणारा सास्कृतिक कार्यक्रम माझ्या कानावर नाही विदेशी पर्यटकाना वास्तविक अशाच गोष्टी पहाण्यात रस असतो. भरपूर परकीय चलन यात मिळू शकते. पण अजून आपल्या पर्यटन विभागातील अधिकाऱ्यांच्या डोक्यात हे कसे आले नाही याचे आश्चर्य वाटते।



खेळ-सापाशी

बँकॉकमध्ये एक **सर्पोद्यानही** आहे विषारी सापाचे खेळ येथे पहायला मिळाले सुरवातीलाच एकाने एका सापाच्या तोडातून काचेच्या तबकडीवर विष काढून दाखविले त्यानतर रिंगणात २-३ साप सोडण्यात आले फुत्कार करीत सळसळणाऱ्या या सापाना पाहून प्रेक्षक दचकलेच, पण तेथील एका कलावताने दोन हाताने दोन सापांना प्रथम पकडून, ते हातात ठेवून तिसरा साप तोंडाने पकडून दाखवला।

तरगता बाजार हे बँकॉकचे खास वैशिष्ट्य बँकॉकपासून सुमारे २५-३० किलोमीटरवर हा बाजार सकाळी लवकर भरत असल्याने सकाळी सहाच्या आत नदीच्या एका धक्क्यावर बोट पकडायला गेलो नदीतून जाताना दोन्ही किनाऱ्याला छोटी छोटी एकदोन मजली घरे, त्यातील लहानशी बुद्धमदिरे, हिरव्यागार वृक्षवेली असे दृश्य असल्याने निसर्गाच्या सहवासातील हा प्रवास फारच आल्हाददायक वाटला. सुखद वाऱ्याने हिंदोळे घेत जाणारी नाव एक तासाने या तरगत्या बाजारापाशी

पोहोचली. एक अजब दुनिया येथे दिसली भाजीपाल्याने भरलेल्या शेकडो बोटी एकमेकीला खेटून उभ्या होत्या विक्रेते आणि ग्राहक दोघेही आपआपल्या बोटीत होते भावाची घासाघीशी आणि मालाची देवघेव भराभर चाललेली होती (चित्र ३५) अनेक स्त्री-पुरुषाच्या डोक्यावर रुद काठाच्या गवती टोप्या होत्या नैसर्गिक परिस्थितीशी माणूस कसे जमवून घेतो हे येथे पहावयास मिळाले

बँकॉकमध्ये आणखी एक पाहण्यासारखा राजवाडा म्हणजे चुलालाँगकॉर्न राजाने १९०१ मध्ये बाधलेला **विमानमेक** सागवानी लाकडाने बाधलेली, खिळा न वापरलेली जगातील ही सर्वात मोठी इमारत म्हणून सागण्यात आले. एका जलाशयात बाधलेल्या या राजवाड्यात चाळीसच्यावर श्रृगारलेले महाल असून चहुबाजूनी त्याना सज्जे असल्याने हा राजवाडा अतिशय रम्य दिसतो येथे ५० बाथ प्रवेशमूल्य आहे. स्थापत्यशास्त्राचा एक अजब नमुना या ठिकाणी पहाता आला

काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यत आणि कच्छ काठेवाडपासून आसाम मिझोरामपर्यंत पसरलेल्या भारतात शेकडो प्रेक्षणीय स्थळे आहेत. एखाद्या पर्यटकाला सर्व भारत पहावयाचा असला तर किती दिवस लागतील? दोन दिवसात त्याची झलक तरी दिसेल का? भारतात नाही पण ही सोय बँकॉकमध्ये आहे. देशातील अनेक ठिकाणच्या सुदर इमारती एका ठिकाणी बाधल्याने थायलडमधील सर्व वैशिष्ट्ये पहाण्याची सधी मिळते **मुआँग बोरान** या स्थळी ! याचा शब्दश: अर्थ प्राचीन नगरी (Ancient City).

बँकॉकपासून ३३ किलोमीटर अतरावर ८० हेक्टर क्षेत्रावर देशाचाच आकार देऊन ही प्राचीन नगरी वसविली आहे जुन्या काळातील ठिकठिकाणचे राजवाडे, मदिरे, नाट्यगृहे अशा ७५ इमारती बाधून थायलडचा इतिहासच डोळ्यापुढे उभा केला आहे अर्धा दिवस खर्च करून पहाण्यासारखे हे ठिकाण आहे जगातील सर्वात मोठे उघड्यावरचे सग्रहालय म्हणून याची प्रसिद्धी आहे.

एका वास्तूत बुद्धाच्या पायाचे ठसे ठेवले होते वर जाण्यासाठी असलेल्या जिन्याचे दोन्ही कठडे नागमोडी व खवले असणाऱ्या ड्रॅगनचे होते । चीनमध्ये हा ड्रॅगन अगदी जळी स्थळी तर थायलडमध्ये अधुनमधून दिसतो. विविध रगातील हे दोन ड्रॅगन फारच उठावदार दिसत होते

मुआँग बोरानमधील दुसरे अविस्मरणीय ठिकाण म्हणजे **देवाचे साम्राज्य** येथे रामपचायतन, शेषशायी विष्णू, शिवपार्वती, गणपती यांचे दर्शन झाले. एका ठिकाणी मोरावरच्या सरस्वतीची एक चार मीटर उचीची भव्य व रेखीव मूर्ती होती रवी, चद्र, मगळ अशा नवग्रहाच्याही मूर्ती मला येथे दिसल्या आपल्याकडे देवाच्या मूर्ती मदिरात असतात पण या देवलोकात ही सर्व मडळी उघड्यावर असल्याने बागेत फिरायला आली आहेत की काय असे वाटते! मोकळ्यावरील या मोठमोठ्या मूर्ती पाहून देवलोकात हिंडून आल्यासारखे भासते। हा आनद अवर्णनीय होता (चित्र १४)

**आठवड्याचा बाजार** हे बँकॉकमधील नुसते खरेदीचे नव्हे तर एक प्रेक्षणीय ठिकाण आहे एका मोठ्या मोकळ्या जागेत शनिवार, रविवार या दोन्ही दिवशी हा बाजार भरतो येथे दिसल्या सर्व प्रकारच्या वस्तू. कापड आणि कपडे, काचेची, अल्युमिनीयमची, स्टेनलेस स्टीलची आणि प्लॅस्टीकची भाडी, किराणा माल, फुले आणि फळे, शोभेच्या वस्तू, गाणारे आणि बोलणारे रगीबेरगी पक्षी आणि त्याचे मनोवेधक पिंजरे, मुलांची खेळणी, घरगुती उपकरणे आणि कुत्र्यामाजराची पिलेसुद्धा । उघड्यावर बाजार असल्याने स्वस्त सर्व वस्तू नीट दिसत असल्याने आपल्याला पाहिजे ती वस्तू घेणे सोपे जाते दुकानातील वस्तूपेक्षा मी उघड्यावरील बाजारातच अनेक वस्तू खरेदी केल्या आहेत खरेदी करताना विविध वस्तू पहाव्या लागतात थोड्याशा हाताळाव्या लागतात. दुकानात निवडीला वाव कमी असतो सर्व तऱ्हेच्या मालाची सतत काढघाल करणे दुकानदाराला शक्य नसते त्याला पचवीस वस्तू काढायला लावल्या व त्यातील एकही आपल्याला मनापासून आवडली नाही म्हणून न घेता तसेच पुढे गेले तर त्याची प्रतिक्रिया काय होते याचा अनुभव अनेकाना आहेच म्हणून मला उघड्यावरचा बाजार फार आवडतो छानपैकी करमणूकही होते

सुट्टीच्या दिवशी अनेक शाळाच्या मोकळ्या जागेचा उपयोग असा बाजार भरवायला करता येईल पदपथ अडवून बसणाऱ्या विक्रेत्याना तिकडे जागा द्यावी जागा मालकाला व विक्रेत्याना उत्पन्न मिळेल व जनतेचीही सोय होईल आपल्याकडे काही ठिकाणी अशा प्रकारचा बाजार फक्त जुन्या वस्तूचा भरतो तो नव्या वस्तूचाही भरविता येईल

**सिलॉम ग्रामोद्योग केंद्र** हे आणखी एक पर्यटकानी पहावे असे स्थळ आहे हस्तकौशल्याच्या नानाविध वस्तूचे हे विक्रीकेंद्र बांबूच्या सुबक शोभिवत वस्तू, रगीबेरगी पोषाखातील बाहुल्या, तारेची चित्रे, हस्तिदती जिनसा अशा तऱ्हेचा येथील माल फारच आकर्षक होता साधी किल्ल्या ठेवण्याची कडीसुद्धा हत्ती, सिह असे सोनेरी धातूचे प्राणी लावून बनवलेली दिसली सापसुसरीपासून पृथ्वीच्या गोलापर्यंत सर्व तऱ्हेच्या वस्तू अडकविलेली अशी अनेक आकर्षक कडी दिसली

या केद्रातर्फे होणारा खास कार्यक्रम म्हणजे सायकाळच्या मेजवानीचा व नृत्याचा या कार्यक्रमाला २५० बाथचे तिकीट होते. जेवणाचा थाट आपल्याकडील लग्नसमारभात असतो तसा एका प्रशस्त दालनात ओळीने चौरग माडले होते चौरगाखाली खोल खड्डा असल्याने आपल्याला पाहिजे असल्यास खाली पाय सोडून अगर माडी घालून बसण्याची सोय होती पचवीस चौरगाची एक, अशा दहा पगती होत्या भोजनगृहात येताना पादत्राणे बाहेर काढून ठेवायला लागली युरोपियन, अमेरिकन लोकाना पादत्राणे काढायची सवय नसते, तरीसुद्धा एक दोघाना विचारल्यावर ते मोकळेपणाने म्हणाले, 'पादत्राणे काढल्यावर आम्हाला अधिक आरामशीर वाटते ' आम्ही मात्र आता सुधारक होऊन मगल कार्यालयात चपला-बूट घालूनच जेवायला बसू लागलो आहोत

वाढपी म्हणून तरुण-तरुणी खास थायी पोषाखात होते तरुणानी रेशमी पितावर नेसले होते तर मुलीनी जरीचा पैठणीवजा सारोंग एक मोठी बशी व त्यात चिनी मातीच्या अनेक वाडग्यामधून खाद्यपदार्थ होते व्यवस्थापक मडळी आपल्याकडील यजमानासारखी प्रत्येकाची जातीने चौकशी करीत होती कुठले, कसे काय अशी अगत्याने विचारपूस करून आग्रहाने वाढत होते वास्तविक हा त्याचा धदा होता पण त्याला धदेवाईकपणाचा वास मात्र नव्हता। भोजनानतर सगीताच्या साथीत नृत्याला सुरवात झाली रामायणातील काही प्रसग सादर करण्यात आले

**थायी नर्तकाच्या** वेषभूषेचे वैशिष्ट्य म्हणजे भरजरी कपडे व डोक्यावरील रत्नजडित मुकुट ते इतके टोकदार आणि लाब असतात की त्याची लाबी चेहऱ्याच्या तिप्पट असते । त्यामुळे नृत्याच्या वेळी डोक्याच्या बारीक सारीक हालचालीसुद्धा एकदम उठून दिसत होत्या (चित्र - मुखपृष्ठ ५)

सर्व पर्यटकाना हा कार्यक्रम मनापासून आवडला. शेवटी , ‘ How nice’, ‘Wonderful’, Fantastic’, ‘ Memorable’, ‘ Majestic’ असे उद्‌गार सर्व बाजूनी कानावर येत होते.

याच वेळी परत जाणवले की, महाराष्ट्रात आपल्या पद्धतीप्रमाणे पगती बसवून विदेशी पर्यटकाना आपली जीवन-सस्कृती का दाखवीत नाहीत ? पचतारांकित हॉटेलमध्ये जेवण्यापेक्षा अशा कार्यक्रमाना ते दोन-अडीचशे रुपये देऊनसुद्धा आनदाने येतील पण भारतात ती खरी सस्कृती पहायला सधी मिळत नाही मोठ्या देशाचा बाहेरचा राष्ट्रप्रमुख आला तर राज्यपाल, पतप्रधान मडळी त्यांच्यासाठी खास कार्यक्रम आयोजित करतात, नाही असे नाही, पण बाकीच्या येणाऱ्या हजारो सामान्य पर्यटकासाठी भारतात सस्कृती दर्शनाची सोय असायला पाहिजे तेवढी नाही

जगात इतरत्र कोठेही पहायला मिळणार नाही असे बँकॉकमधील प्रेक्षणीय स्थळ म्हणजे **सुसर उत्पादन** आणि **सवर्धन केंद्र**. आता बँकॉकमध्ये अशी तीन केंद्रे झाली आहेत आम्ही पाहिले ते सर्वात प्रथम इ स १९५० मध्ये स्थापन झालेले पाकनाम नावाचे केद्र हे बँकॉकपासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर असून सुमारे २०० हेक्टर याचे क्षेत्र आहे पालीच्या पिलापासून म्हणजे सुमारे दहा सेंटीमीटरपासून पाच मीटरपर्यंत लाबीच्या तीस जातीच्या ३१,००० सुसरी येथे होत्या। निरनिराळ्या पाणगाळ्यात वयोगटाप्रमाणे ठेवलेले सुसरींचे थवे पाहून मी थक्क झाले निश्चल दिसणाऱ्या या सुसरी खडकासारख्या पडून होत्या, पण कर्मचारी त्याचे खाद्य - कच्चे मास घेऊन आला तेव्हा फेकल्या क्षणी गट्टम् करीत होत्या पाच मीटर लाब, ११०० किलो वजन अशी जगातील सर्वात मोठी सुसर येथे आहे

वाघ, सिंह, माकडे, अस्वले, मासे, कुत्री, मांजरे इत्यादी प्राण्याना व पोपट, कबुतरे, गरुड या पक्ष्याना माणसाळवून शिकविलेले मी पाहिले होते पण येथे काही सुसरींना शिकवून शहाणे केले आहे ! त्यांच्या दोन शिक्षकांनी अनेक खेळ करून दाखविले. एक खास क्रीडागृह त्यासाठी तयार केले आहे. लहानशा तलावाला चारी बाजूनी कठडे लावून वर पुन्हा दोन मजली गॅलऱ्या केल्या आहेत या खेळाना सुरवात करण्यापूर्वी हे उघडेबब्र शिक्षक पाणरिंगणात उतरले नमस्कार

करून त्यानी देवाचे नाव घेतले व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुसरींना हलवू लागले. सुसर हा मद्दड प्राणी त्यामुळे काम सोपे नव्हते काठीने ढोसल्यावर त्या रागाने बेफाम होऊन उसळून झेप घेत त्यांनी नुसती शेपटी हलवून आपटली की चाबकासारखे फाडफाड आवाज येत होते एका शिक्षकाने ढोसून ढोसून एका सुसरीला उचवट्यावर आणून तिच्या तोंडात काठी कोबली त्याबरोबर काडकन् आवाज होऊन काठीचे दोन तुकडे झाले ! सुसरीचा अक्राळ विक्राळ जबडा आणि कराल दाढा पाहूनच माझ्या अगावर सर्रकन् भीतीचा काटा उभा राहीला ! 'सुसरबाई तुझी पाठ मऊ' असे मनात म्हणून गोजारून त्या रुद्रावताराला शिक्षक शात करी दोन्ही शिक्षकांनी अशा पाच सहा सुसरी इकडे तिकडे हलवून त्यांचे भयानक जबडे सर्वांना दाखविले. त्या नतर एक शिक्षक शेषशायी विष्णूसारखा सुसरशायी झाला दुसऱ्याने एका सुसरीला कडेवर घेतले व तिचा मुका घेतला ! लहान मुलाला जसे आपण या खाद्यावरून त्या खाद्यावर खेळवतो तशा क्रीडा त्याने तिच्याबरोबर करून दाखविल्या. त्यानतर हाताने तिचे तोंड फाकून सर्वांना परत तिचा मृत्यूरूपी जबडा दाखविला'

त्यानतर त्याने दाखविलेल्या करामतीला तर तोडच नाही ! दोन शिक्षकापैकी एका वयोवृद्धाने आकाशाकडे पाहून हात जोडले, ओठ हलवले, प्रेक्षकाकडे एक दृष्टी टाकली आणि सुसरीचा जबडा उघडून त्यात आपले डोके घातले ! काही क्षण आत ठेवून बाहेर काढले मृत्यूशी चाललेला हा भयकर खेळ पहाताना सर्वांचे श्वास रोखले गेले गजबजलेल्या वातावरणात एकदम भीषण शातता पसरली परत एकदा त्याने आपले डोके '**तिच्या जबड्यात**' घालून दाखवले व प्रेक्षकांपुढे मान तुकवली सर्व व्यवस्थित पार पडले म्हणून प्रेक्षकानी सुटकेचा निश्वास टाकला व त्याच्या धैर्याची वाखाणणी म्हणून चारी बाजूनी त्याच्यावर पैशांचा पाऊस पडला ही दृश्ये तर जगात कुठेही सर्कशीतसुद्धा सहजासहजी पहायला मिळणार नाहीत ! (चित्र ४२) असा चित्तथरारक अविस्मरणीय प्रसग पर्यटनात चुकवू नका

सुसरीच्या कातड्याच्या प्रवासी बॅगा, लहानमोठ्या पर्स, पट्टे अशा अनेक वस्तू येथे विक्रीला होत्या

या सुसरपालन केंद्रावर इतरही अनेक प्राणी आहेत. पण खास लक्षात राहिले ते सयामी हत्ती. चार हत्तींच्या एका पथकाने डिस्को सगीताच्या तालावर

आपले अवाढव्य शरीर चापल्याने हलवून नाचून दाखविले या गजनृत्यात ते आपली सोंड इकडून तिकडे वळवीत, गडस्थळ फिरवीत, उरलेले शरीर झुलवीत व 'एक पाय नाचव रे गोविंदा' सारखे पण दोन पाय उचलून ठेका धरत होते। **गजनृत्य** ही दृष्टीसुखाची एक आगळी मेजवानी होती। ते पहाता पहाता जमलेली लहान मुलेही हत्तींचे अनुकरण करून तशीच नाचू लागली!

जगातील **सर्वात लहान प्राणीसुद्धा** थायलडमधीलच किथी थॉंगलॉगजिया नावाच्या स्त्रीने पधरा वर्षापूर्वी हा शोध लावला. म्हणून तिचेच नाव या प्राण्याच्या जातीला दिले गेले. हा प्राणी आहे वटवाघूळ आकार आपल्या हाताच्या अगठ्याच्या निम्मा। क्वायनदीच्या परिसरातील गुहामध्ये या वटवाघळाचे थवे दिसले

मध्यवर्ती असल्याने **राष्ट्रीय सग्रहालय** हे बॅंकॉकमधील सहजासहजी पाहता येण्यासारखे ठिकाण हा एकेकाळचा राजवाडा असल्याने आत अनेक मोठे महाल, मडप व प्रांगणे आहेत मडपाला असलेल्या जाळ्या अत्यत बारीक व अप्रतिम नक्षीकामाच्या आहेत (चित्र ११). प्राचीन कालापासूनच्या शेकडो वस्तू व शिलालेख येथे दिसले मुख्य भरणा होता तेराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंत झालेल्या राजाच्या दैनदिन वापरातील गोष्टींचा हिंदु-बौद्ध देवदेवताच्या मूर्ती, भांडी, वाद्ये, नाणी, शस्त्रास्त्रे, मौल्यवान कपडे आणि दागदागिने अशा वस्तू तेथे आहेत इतकेच नव्हे तर अत्ययात्रेच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या रथापर्यंत सर्व गोष्टी येथे दिसल्या. थायी चालीरीतींची, त्याच्या गतवैभवाची कल्पना येण्याच्या दृष्टीने हे राष्ट्रीय सग्रहालय बघण्यासारखे आहे

सहलसस्था दाखवित असलेले येथील एक ठिकाण म्हणजे **मॅजिक लॅंड** आपल्याकडे जत्रेत जसे चक्री पाळणे, झोपाळे, घसरगुड्या असतात तशा गोष्टी असलेले हे स्थळ आहे तसेच लहान मुलाना खेळण्यासाठी रगीबेरगी चेंडूचे हौद, चालवताना एकमेकीला धडकणाऱ्या मोटारी, तलावात विहारासाठी बोटी वगैरे आहेत या शिवाय खाद्यपेयाची, खेळण्याची दुकाने पण नावाप्रमाणे ही जादुमय नगरी तर नाहीच, पण परदेशात जाऊन, अर्धा दिवस खर्चून पहावे अगर कोणी दाखवावे असे हे ठिकाण मुळीच नाही

गवगवा होणारे दुसरे स्थळ म्हणजे **जिम थॉमसनचे घर** हा अमेरिकन

माणूस धद्याने स्थापत्यविशारद होता दुसऱ्या महायुद्धानतर तो या देशात स्थायिक झाला येथील रेशीम उत्पादनाच्या धद्याला त्याने चालना दिली त्याने निरनिराळ्या ठिकाणची सहा थायी जुनी घरे विकत घेतली. त्यातील दारे खिडक्या वापरून बँकॉकमध्ये एक घर बाधले पडिताकडून ग्रहशांती करून १९५९ मध्ये एका सुमुहूर्तावर गृहप्रवेश केला! बऱ्याचशा थायी घरादारच्या विशेष म्हणजे ती लाकडाची असतात व पाऊसपाण्यापासून सरक्षण करण्यासाठी जमिनीपासून सुमारे दोन मीटर उचीच्या खाबावर बांधतात त्याने सग्रहीत केलेल्या अनेक गोष्टी येथे पहायला मिळाल्या हे घर पहायला ८० बाथ प्रवेशमूल्य आहे. पण आम्हाला या घराबद्दल काही खास वाटले नाही. अनेक अमेरिकन मात्र येत होते; 'How nice', 'How beautiful', म्हणत आईस्क्रिम खाऊन अगर कोकाकोला पिऊन जात होते. आम्हाला मात्र अर्धा दिवस अक्कलखातीच गेल्यासारखे वाटले

**जगातील सर्वात मोठे उपाहारगृह** (रेस्टारट) कोठे असेल ओळखा. दहा सधी तुम्हाला लडन, पॅरिस, रोम, न्यू यॉर्क, लॉस एजलिस, बेजिंग, टोकिओ, हाँगकाँग, सोल, सिगापूर. सर्व चूक. ते आहे थायलडच्या राजधानीत-बँकॉकमध्ये! या उपाहारगृहाचे नाव आहे 'तम नाक थायी' आणि उच्चाक नोंदल्या जाणाऱ्या गिनीज पुस्तकात, 'जगातील सर्वात मोठे उपाहारगृह,' अशी याची १९८८ मध्ये नोंद झाली आहे

चार हेक्टर क्षेत्रावर, एक हजार गाड्या ठेवण्याची सोय असलेल्या या उपाहारगृहात एकशेवीस पाककुशल आचारी आणि एक हजाराच्यावर कर्मचारी आहेत! कुठल्याही सागरी प्राण्यापासून वनस्पतीजन्य पदार्थांपर्यंत आणि सापापासून चतुष्पादापर्यत कुणाचेही मास तुम्हाला मिळू शकते थायी पद्धतीखेरीज चिनी, जपानी व युरोपियन तऱ्हेचे अडीचशे खास खाद्य पदार्थ येथे मिळू शकतात! शिवाय सर्व प्रकारची पेये - शीत आणि उष्ण. एका वेळेला तीन हजार लोक ऐसपैस बसून थाटामाटात जेवू शकतात!

सध्याकाळी सातच्या सुमाराला आम्ही या १३१ **राचादाफिसेक** पथावरील उपाहारगृहात गेलो प्रवेशद्वाराशी प्रचड लाकडी सोंड वर केलेले गजराज स्वागतासाठी सज्ज होते पुढे खास भरजरी थायी वेषातील तरुणी उभ्या होत्या. त्यानी सर्वांनी दोन्ही हात जोडून मान तुकवून नमस्कार केला. त्यातील एक पुढे आली व 'चला तुमचे टेबल दाखविते', असे आम्हाला म्हणाली येणाऱ्या सर्व स्त्री पुरुषांना

लहान-मोठा असा भेदभाव न करता अशी 'व्ही आय पी' ट्रीटमेंट मिळत होती । जाताना सर्वत्र कमालीची स्वच्छता दिसली.

बसल्यानतर दोन मिनिटात गुलाबपाणी शिंपडलेले थडगार रुमाल घेऊन एक सेवक आला आमच्यापुढे खाद्यपदार्थांची यादी ठेवली काय हवे त्याची नोंद करून तो गेला. ती मागणी सगणकावर नोंदली जाऊन पाचच मिनिटात वाफाळलेले गरम गरम पदार्थ आमच्यापुढे आले प्रचड पसाऱ्यामुळे येथील सेवक चालत नाहीत तर ते सदैव **स्केटिंग करीत** येतात। इकडून तिकडे जाताना एकमेकाशी अगर पाहुण्याशी टकरा न देता, तसेच हातातील पदार्थांचा एक थेंब अगर कणही न साडता, वेगाने जाणारे हे सेवक पाहून मी अगदी थक्क झाले!

पण याहीपेक्षा मला आवडले तेथील **रम्य वातावरण** तम नाक थायी याचा अर्थ थायी राजमहाल आणि नावाला शोभेल असेच ते आहे

हे उपाहारगृह एका जलाशयात बाधले आहे असख्य रगीत मासे आत विहरत होते. भोजनगृहे म्हणून एकमेकाशी सलग्न असलेले, वेगवेगळ्या पातळीवरचे मडप आहेत भिंती नसल्याने सर्व उपाहारगृह हा एक प्रचड महाल वाटतो प्रत्येक मडपाची छपरे वेगवेगळ्या थायी पद्धतीची काहीची मदिरासारखीच बहुस्तरीय तर काहींची गोलाकार आपल्याकडे धान्यगुदामाला असतात तशी अनेक तऱ्हेची फुलझाडे व वृक्षवेली ठिकठिकाणी बहरलेली आरास साधीच पण थायी पद्धतीची, डोळ्यात भरणारी देशातल्या निरनिराळ्या भागात जे पोषाख केले जातात तशा रगीबेरगी, भरजरी वेषात एकूणएक सर्व कर्मचारी, आणि त्यांच्या अगत्याची कमाल दिवाळीला आपण लावतो तशा सर्वत्र दिव्यांच्या माळा व रोषणाई 'दोन इसम पाच रुपये, काळी टोपी तीन रुपये, अशा सेवकाच्या आरोळ्या तर नाहीतच पण आसपास दुसऱ्याशी ते बोलत असले तरी त्याचा आवाज ऐकू येत नव्हता येथे कानावर येतात रगीत दिव्याच्या सगतीत उडणाऱ्या कारजाची थुईथुई आणि रगमचावर चाललेल्या शास्त्रीय गाण्याचे स्वर्गीय सूर रात्री तासभर निरनिराळी थायी शास्त्रोक्त नृत्येही सादर केली जातात आपण एका खास शाही भोजन समारभालाच आलो आहोत असे मला वाटले

अशा रम्य वातावरणात दरही तसेच भारी असतील असे वाटत होते पण नाही येथील **किंमती** इतर कुठल्याही उपाहारगृहापेक्षा **कमी** आहेत आणि हे सगळ्यात महत्त्वाचे आणि नवलाचे।

अशा या नाविन्यपूर्ण, जागतिक कीर्तीच्या ठिकाणी प्रत्येक प्रवाशाने कुतुहलाने जायला हवे. आपल्या सहलसस्था येथे कोणालाही आणत नाहीत. कुठल्यातरी गल्लीतल्या दिल्लीदरबार मध्ये नेतात । वास्तविक तेथल्यापेक्षाही येथील दर कमी आहेत

येथे आल्यावर न चुकवावे, इतकेच नव्हे तर पुन्हा पुन्हा जावे असे वाटणारे आहे तम नाक थायी.

'इन्स्टिट्युशनल इन्व्हेस्टर' हे एक आर्थिक घडामोडीसबधी बातम्या देणारे अमेरिकन वृत्तपत्र आहे. त्यांनी **जगातील उत्तम हॉटेल्स** कोणती याची पाहणी केली. त्यात गेली सात वर्षे पहिला क्रम मिळतो आहे बँकॉकच्या **ओरीएटल हॉटेलला** । त्याचा दर आहे रोजी सुमारे १५० अमेरिकन डॉलर

या पहाणीतील महत्त्वाचे **निकष** होते – स्वच्छता, खोली घेताना व सोडताना लागणारा वेळ, सेवेची तत्परता व एकूण वातावरणातील प्रसन्नता. मुबईचे ताजमहाल हॉटेल सर्वात महाग असणाऱ्या जागतिक यादीत बरेच वर येते। याचा दर रोज २१० अमेरिकन डॉलरच्या वर; पण प्रवाशाच्या सेवेच्या दृष्टीने ते पहिल्या दहातही नाही, याचे आश्चर्य वाटले. थायलडसारख्या विकसनशील देशाचाच पहिला नबर लागावा याचे कारण तेथील हसतमुख, विनम्र आणि अगत्यशील पारंपारिक थायी पोषाखातील कर्मचारी भारतात पैसे भरपूर घेतात पण त्या मानाने त्याचा मोबदला देत नाहीत असे इतर देशाच्या अनेक पर्यटकानी सहज बोलताना सागितले!

अशा विविध प्रकारच्या आकर्षणामुळे, स्वस्ताईमुळे आणि विशेषतः लोकाच्या अतिथ्यशीलतेमुळे बँकॉक हे आज पर्यटकांचे आवडते ठिकाण झाले आहे आणखी दोन दिवस राहता आले असते तर किती छान झाले असते अशा गोड हुरहुरीतच पर्यटक बँकॉक सोडतात

# ७ - थायलंडमध्ये इतरत्र

पर्यटनाच्या दृष्टीने थायलडमध्ये **महत्त्वाची गावे** आहेत, चांगमयी, सुखथायी, अयुथया, काचनबुरी, फुकेट आणि विलासनगरी पटाया

**चांगमयी** हे थायलडमधील बँकॉकच्या खालोखालचे क्रमाक दोनचे शहर पण खूपच लहान. आकाराने चाळीसावा हिस्सा. आजची वस्ती आहे फक्त पावणे दोन लाख बँकॉकच्या उत्तरेला सुमारे ७०० किलोमीटर अतरावर, समुद्रसपाटीपासून तीनशे मीटर उचीवर पिगनदी काठी हे आहे इ स १२९६ मध्ये राजा मेंगराय याने हे वसवले त्याच्या राज्याचे नाव होते लाना थायी याचा अर्थ लाख भातखाचरे असलेला प्रदेश हे थायलड मधील पहिले मोठे राज्य नतर सुमारे सव्वा दोनशे वर्षे म्हणजे १५५६ ते १७७५ या कालात या प्रदेशावर बर्माचा अमल होता त्यानतर परत थायी सत्ता सुरू झाली

चागमयी याचा शब्दश' अर्थ नवे नगर. यातील 'चा' चा उच्चार चारातील चा सारखा करायचा. काही लोक चिअँगमयी, तर काही शिअँगमयीसुद्धा करतात **आज चागमयी प्रसिद्ध आहे** – जुन्या मध्ययुगीन सस्कृतीसाठी, मोठमोठ्या

बुद्धमंदिरासाठी; डोंगर, गर्द झाडी, धबधबे आणि गरम पाण्याचे झरे यामुळे निर्माण झालेल्या रम्य निसर्गासाठी; गिरीभ्रमणासाठी, डोंगराळ भागातील वेगवेगळ्या जातीजमातींच्या वैशिष्ट्यपूर्ण राहणीसाठी; अनेक तऱ्हेच्या ग्रामोद्योगासाठी; रात्रीच्या बाजारहाटासाठी; आसपास काम करणाऱ्या जगलातील हत्तींसाठी, आणि सर्वांत उत्तरेला असलेल्या मी साय व चिंगसानजवळच्या सोनेरी त्रिकोणासाठी शिवाय बँकॉकपेक्षा स्वस्त व निवांत यामुळे प्रवाशाचे लोंढे याही बाजूला सतत वहात असतात

इ स. १९२० पर्यंत चांगमयीला जायला साधा रस्ता सुद्धा नव्हता। जगलातून हत्तीवरून अगर बोटीने जावे लागे व त्याला कित्येक आठवडे लागत. या दूरत्वामुळे बाहेरच्या सस्कृतीचा वारा फारसा न लागता स्थानिक चालीरीती टिकून राहिल्या आता चागमयीला विमान, आगगाडी किंवा बसने जाता येते. विमानाने खर्चाचे (माणशी १३०० बाथ) तर आगगाडीने स्वस्त पण दीर्घकालावधीचे (चारशे बाथ, सोळा तास). सर्वांत सोयीची बस टी व्ही., व्हिडिओ अशा सुविधा असलेली वातानुकुलित बस दहा तासात दोनशे बाथमध्ये येथे नेते

मी सकाळी साडेनऊची बस घेतली. रस्ता खरोखरच शेवटपर्यंत सुदर होता खड्डे नाहीत की खाचखळगे नाहीत. बस कपनीतर्फे सर्व प्रवाशाना अधून मधून शीतपेये, अबर चबर खाद्ये आणि अल्पोपहार मिळाला विमानातल्याप्रमाणे खुर्च्या मागे कलत्या करण्याची सोय असल्यामुळे प्रवास सुखाचा झाला दहा तासाचा प्रवास असूनही शीण मुळीच वाटला नाही. सध्याकाळी सातला ठरलेल्या क्षणी बस चागमयीला पोहोचली

सातशे किलोमीटर लाबीच्या रस्त्यात एकही खड्डा लागू नये अगर हिसका बसू नये याचे आश्चर्य वाटले। वाटेत 'काम चालू रस्ता बद' अगर 'दुसरीकडून वळण घ्या,' असे फलक कुठे नव्हते सदा सर्वदा चाललेली आपल्याकडील रस्ता दुरुस्तीची कामे पाहून आणि तरीही तो कधीच समाधानकारक नसतो हे पाहून, रस्ते एक मोसमापेक्षा जास्त काळ टिकणार नाहीत अशी खबरदारी घेऊनच तयार करीत असावेत याची खात्री पटली

देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जात असल्याने देशाचे धावते दर्शनही झाले जाताना सतत मैलोन् मैल पसरलेली भात खाचरे दिसत होती. त्यामुळे या देशात भात खाचरे नसून, **भातखाचरातच हा देश वसला आहे** असे वाटले।

वाटेत लागलेले प्रत्येक लहान मोठे गाव त्याच्या सधनतेची व नगर सुव्यवस्थेची साक्ष देत होते आपल्याकडे जसे सुखसोयींच्या दृष्टीने शहर व खेडे यात महदतर दिसते तशी विषमता कुठेच नव्हती. माझ्या थायलडमधील मुक्कामात रस्त्याच्या कडेला बसलेली मोठी माणसेच काय पण लहान मुलेसुद्धा दिसली नाहीत! उलट अनेक ठिकाणी दुतर्फा सागाचे वृक्ष बहरलेले दिसले

मध्ययुगात वसलेले चागमयी गाव आजच्या मोजमापानेही सुदर वाटले भात खाचरातच जन्मलेले, त्यामुळे शहरालगतच चहुबाजूनी शेती, मधून मधून हिरवीगार झाडी, आखीव नगर रचना, मध्यावरून वळणे घेत वहाणारी पिंगनदी, तिच्यावर ठिकठिकाणी बांधलेले तीन चार पूल आणि स्वच्छ व रुद रस्ते, दोन तीन मजली घरे आणि मधूनच दिसणारी सोनेरी सुईशिखरे असा याचा चेहरा मोहरा. मध्यमवर्गीयाचे गाव त्यामुळे भपका आणि डामडौल कमी सरळ साधेपणा अधिक.

चागमयी पहायला सुरवात मदिरापासूनच केली. या गावात व आसपास तीनशेच्यावर भव्य बुद्धमदिरे आहेत त्यातील नऊच मी पाहिली

**वात चँगमन** - इ स १३०० मध्ये बांधलेले शहरातील सर्वात जुने व मेंगराय राजाचे एकेकाळचे निवासस्थान म्हणून प्रसिद्ध. येथे चौथरा म्हणून बाहेर तोंड असलेले अनेक हत्तींचे दगडी पुतळे असून त्यावर स्तूप उभारल्याने स्थापत्य नाविन्यपूर्ण व आकर्षक वाटले

**वात सुआन दोर्ग** - इसवी सन १३८३ मध्ये बांधलेले. पूर्वीच्या राजाचे बागबगीचे याच्या आसपास असल्याने निसर्गरम्य

**वात जेडी लुआग** - येथे एके काळी होता इ.स १४०१ मध्ये बाधलेला ८६ मीटर उचीचा स्तूप। दिल्लीच्या कुतुबमिनारपेक्षाही उच. आज याची बरीच पडझड झाली आहे

**वात प्रासिंग** - गावाच्या मध्यवस्तीत असल्याने सतत वर्दळीचे मदीर.

**वात जेट योर्ड** - राजा तिलकराजने इ.स १४५५ मध्ये बुद्धगयेच्या महाबोधी मदिराच्या धर्तीवर हे बाधले आहे. याला सात शिखरे आहेत.

**वात कू ताव** - आपल्याकडे बोहल्याजवळ एकमेकावर पाच सुगडी ठेवतात तशा चळतीच्या आकाराचा व प्रत्येकात चारही बाजूनी उभ्या बुद्धमूर्ती

असलेला हा स्तूप चिनी मातीचे रगीत तुकडे वापरून यावर सुदर नक्षीकाम केले आहे

**वात प्रा थाट दॉय सुथेप -** सुमारे एक हजार मीटर उचीच्या टेकडीवरचे स्थानमहात्म्याचे व सर्वात पवित्र मानले जाणारे इ स १३८३ मध्ये बांधलेले हे मदीर आहे. असे सागतात की, या मदिरासाठी जागा शोधण्यासाठी राजा गुणाने एक हत्ती डोगरात मोकळा सोडला हिंडत हिंडत तो या ठिकाणी आला. तेव्हा त्याने सोंड वर करून आनदाने चित्कार केले। जागेला तीन प्रदक्षिणा घातल्या व खाली वाकून पुन्हा उभा राहिला। या लक्षणावरून ही जागा शुभशकुनी असावी असे समजून मदीर बाधण्यासाठी तिची निवड करण्यात आली या मदिराला ३०६ पायऱ्या आहेत दोन्ही बाजूच्या कठड्यावर सात फण्यांचे लाबलचक नाग काढले आहेत (चित्र ३१) ज्याना पायऱ्या चढणे शक्य नाही त्याच्याकरता केबलकार आहे. प्रत्येकी पाच बाथ त्याला तिकीट आहे.

येथून जवळच फुपिंगचा राजवाडा हे प्रेक्षणीय ठिकाण आहे थायलडच्या राजाचा उन्हाळ्यात येथे निवास असतो

**वात प्रा थाट हरिपुचाई -** मूळच्या मॉन राज्यकालीन इ स १०४४ मध्ये बाधलेले हे उत्तर थायलडमधील सर्वात जुने मदीर (चित्र १९)

**वात प्रा थाट टाक पा -** पा साग या गावचे हे बुद्धपद मदीर श्रीलकेहून आणलेले बुद्धाच्या पावलाचे दोन ठसे येथे आहेत याच्याच जवळ डोंगरावर तेथील स्वामींचे मदीर बाधले आहे लुआँग पो वॅन नावाच्या खालच्या परिसरात एका दालनात एक स्वामी आसन घालून ध्यानस्थ बसलेले दिसले नतर मला कळले की, हा त्याचा मेणाचा पुतळा आहे। लडनच्या मादाम तुसातील चित्रापेक्षासुद्धा मला तो सरस व जिवत वाटला आपल्याकडील कारागिरांनी हा जरूर पहावा

ही सर्व मदिरे म्हणजे स्थापत्यकलेची प्रदर्शनेच कारागिरानी जीव ओतून केलेली कौशल्याची कमाल; मदिराच्या बाहेरील भिंतीवर दगडी सिंह जोडी, आत विशाल आवार आणि कमलपुष्पे, मदिराच्या पायऱ्याच्या कठड्यावर नाग, लाल व सोनेरी अशी दुरगी लाकडी नक्षीदार प्रवेशद्वारे व खिडक्या, ऐसपैस गाभारा, चितारलेल्या भिंती, भव्य मूर्ती, वर बहुस्तरी छपरे, त्यावर चकाकणारी कौले, त्याचे मनोवेधक चोफे, सुवर्ण पत्रांकित आकाशाचा वेध घेणारी स्तुपाची सुळकीदार शिखरे, मागल्य आणि पावित्र्य, स्वच्छता आणि शांतता, वावरणारे केशरी

वस्त्रातील आबालवृद्ध भिक्षू आणि कमळ, दोन मेणबत्त्या व तीन उदबत्त्या घेऊन येणारे भाविक असे भारावून टाकणारे, नास्तिकालाही नतमस्तक करायला लावणारे त्याचे स्वरूप, शिवाय प्रत्येक मदिर म्हणजे शिक्षणाचे केन्द्र. तेथे वसतीगृह आणि व्यवस्थापकाचे निवासस्थान येणाऱ्या भाविकासाठी पाण्याची सोय व स्वच्छ स्वच्छतागृहे.

**आजकाल मदिरे हवीत तर अशी.** या धर्तीचे एखादे तरी मदीर पुण्या-मुबईत असावे असे वाटले. रोज हजारो लोक येत असतानासुद्धा सर्व मदिरे आरशासारखी चकचकीत आणि दिवाणखान्यासारखी सुशोभित.

मध्ययुगीन काळात थायलडची राजधानी राहिल्याने चांगमयी अनेक उद्योग धद्याचे - विशेषत ग्रामोद्योगाचे माहेरघर आहे बाबूच्या बांगड्यापासून खुर्च्यटिबलापर्यंत वस्तू बनविणे, बाहुल्या, फुले तयार करणे, सुती व रेशमी कापड व कपडे बनविणे, छत्र्या बनविणे व रगविणे (चित्र ५१), लाकडावर व लाखेवर कोरीवकाम करून शोभेच्या कलात्मक वस्तू बनविणे , ताबे, पितळ, ब्रॉझच्या भाड्यापासून सोन्याचादीचे दागदागिने घडविणे, खनिज दगड आणून त्यातून मौल्यवान रत्नसपत्ती निर्मिणे, कातडी माल तयार करणे असे येथील प्रमुख धदे एका दुकानात तर मला शेळी, मेंढी, गाय, म्हैस, साप, सुसर, माजर, हत्ती अशा सर्व प्राण्यांच्या कातड्याच्या चपला बुटापासून ते कमरपट्टे बॅगापर्यंत वस्तू तयार केलेल्या दिसल्या पर्यटन खात्याने हे सर्व उद्योगधदे दाखविण्याकरिता अर्ध्या दिवसाची खास सहल ठेवली आहे। पर्यटकाना येथे आणणे हा माल खपविण्याचा उत्तम मार्ग.

पण याहून सर्वात **तेजीत चाललेला धंदा** दिसला पर्यटनाचा. आज गावात अनेक सहलसस्था व त्याचे छोटे छोटे प्रतिनिधी आहेत चांगमयीमध्ये ४० ते २४०० बाथपर्यंतची अनेक निवासस्थाने आहेत; जेवणाला १० बाथपासून १००० बाथ घेणारी उपाहारगृहे आहेत, गावात सायकलरिक्षापासून वातानुकुलित बस व टॅक्सी मुबलक आहेत, सायकली, मोटारसायकली आणि मोटारी भाड्याने मिळण्याची सोय आहे दोन दुकाने ओलाडली की फोटोग्राफीचे दुकान अगर स्थानिक भेटवस्तूचे ठिकाण दिसेल, चलन बदलण्यासाठी बँक असेल नाहीतर सहलसस्थेचा फलक दृष्टीस पडेल

सर्व सोयी सहजासहजी उपलब्ध हे गाव केवळ पर्यटकाच्या गरजा पुरविण्यासाठी आहे असे वाटले. बँकॉकपेक्षा हे गाव राहण्यासवरण्याला अतिशय स्वस्त आहे.

येथील अनेक हॉटेले आजूबाजूच्या कलावताना बोलावून त्यांचे नृत्य-सगीताचे कार्यक्रम नियमाने सादर करतात त्यामुळे स्थानिक लोकानाही नवा धदा मिळाला आहे

रम्य व स्वच्छ स्थळ असले की युरोप अमेरिकन आणि जपानी इतकी गर्दी करतात की पाच रुपयाच्या वस्तूवर ते पन्नास रुपये खुषीने खर्च करतात असे मला दिसले. पर्यटन वाढविण्यासाठी खालच्या थरापासून वरच्या पर्यंत सर्वांना परवडतील अशा सुविधा व सुरक्षिततेचे उपाय करावे लागतात हे यातील खरे रहस्य आहे. पर्यटकांना काय हवे, त्याच्या गरजा काय आहेत, त्याना आनद कशात वाटेल हे थायी पर्यटन खात्याने अचूक ओळखले आहे.

भारतात एवढ्या विविध तऱ्हेच्या गोष्टी, स्थळे आणि लोकजीवन पहाण्यासारखे आहे की, मला वाटते नुसते टूरिझम खाते जरी सुसूत्रपणे काम करू लागले तरी भारताला इतके परदेशी चलन मिळेल की दारिद्रय, बेकारी, असतोष जाऊन भरभराट होऊ शकेल।

आपल्याकडे कलावत आहेत, अक्कलवत आहेत, शास्त्रज्ञ आहेत, फक्त योजक नाहीत आणि सघटीत रीत्या काम करण्याची आपली वृत्ती नाही।


या सर्व उद्योग धद्यामुळे चांगमयी सपन्न झाले आहे येथील **लोकाचे दरडोई सरासरी उत्पन्न दरमहा ६००० बाथ**च्यावर आहे

चागमयीमध्ये एक मोठी नृत्यशिक्षण सस्था असून सुमारे ५०० मुले मुली येथे शिकत असतात शहरात नुसती महाविद्यालये नव्हे तर विद्यापीठही आहे वनस्पती उद्यान आणि प्राणी सग्रहालय आहे. देशाचा इतिहास आणि सस्कृती दर्शविणारे राष्ट्रीय सग्रहालय आहे आणि अनेक मद्यालये व निशागारेही आहेत

सध्याकाळी वेळ घालवायला व लोकजीवन पहायला एक आकर्षक स्थळ म्हणजे केवळ **रात्रीच भरणारा बाजार** सध्याकाळी सहा ते रात्री बारापर्यंत असणारा हा बाजार काहीसा उघड्यावर काहीसा बांधीव आच्छादनाखाली भरतो सर्व काही स्वस्त बाजारात घासाघिशीलाही भरपूर वाव आहे येथे वस्तू पहात नुसते हिंडले तरी नाविन्यामुळे बरीच करमणूक होते

येथे एक **मार्जारालय** आहे असे कळल्यावर मी ते पहायला गेले रोज नावाच्या अमेरिकन पती व थायी पत्नी अशा एका दांपत्याने सुमारे १०० मांजरे

बाळगली आहेत खास सयामी माजरे मला येथे पहायला मिळाली. आपल्याकडे जन्मत: जो माजरांचा रग अगर पट्टे असतात ते शेवटपर्यंत कायम रहातात त्याचा फक्त आकार वाढतो शिवाय डोळे हिरवे असतात. सयामी माजराचे वैशिष्ट्य असे की, त्याचे डोळे निळे असतात जन्मत: त्याचा रग पाढराशुभ्र असतो. पण सुमारे तीन महिन्यानतर तो हळू हळू बदलत जाऊन दोन वर्षापर्यंत गर्द तपकिरी किंवा काळसर होतो




मला सर्व वयोगटाची सयामी माजरे येथे पहायला मिळाली हे मोठे काळसर माजर लहानपणी अगदी पाढरे शुभ्र होते असे प्रत्यक्ष पाहूनसुद्धा विश्वास बसत नाही!

चागमयीच्या आजुबाजुला हिरवेगार पहाड आहेत आणि त्यात अनेक गरम पाण्याचे झरे आहेत. आम्ही पोग नाम रॉन या गावचा झरा पहायला गेलो, पाणी इतके कढत होते की लोक त्यात अंडी उकडीत होते आणि चक्क भात-भाज्या शिजवित होते! गमत म्हणजे त्याच्याच शेजारी डोगरातून येणारा थडगार पाण्याचा प्रवाह होता

चागमयीच्या आसमतात **ऑर्किड फुलाचे अनेक बगीचे** आहे राम आणि माऊटन या नावाचे दोन बगीचे आम्ही पाहिले हे बगीचे मोठ्या आच्छादनाखाली असतात मडपामध्ये हजारो कुड्या टागलेल्या होत्या जवळ जवळ सगळ्या रगाची, एकरगी तसेच बहुरगी, फुले येणारी ऑर्किड मी पाहिली. त्याची हिरवी मुळे खाली हवेत लोंबत होती (चित्र ४३) उद्यान शास्त्रातील लोकानी अभ्यासावीत अशी ही ठिकाणे आहेत बगिच्यात आखीव पायवाटा, सर्वत्र स्वच्छता आणि गुणधर्माप्रमाणे वाढविलेले फुलाचे टागते ताटवे पाहून मन हरपून जाते. या

बगिच्यातच तशाच फुलासारखे दिसणारे दागदागिने बनविण्याचा कारखानाही होता कमळे, गुलाब, मोगरा ही फुले हारासाठी व बुद्धाच्या पुजेसाठी वापरली जातात, पण आर्किड फुले इतरत्र फुलदाणीत ठेवतात ऑर्किडला देशातच नव्हे तर जपान व युरोपियन देशातूनही मागणी आहे ही फुले निर्जंतुक करून व्यवस्थित गुडाळून विमानाने रोज निर्यात केली जातात जवळच एक पुष्करिणी होती त्यातील **कमळाची पाने** जवळ जवळ दोन मीटर व्यासाची होती। ती इतकी कडक होती की, एका पानाच्या कडेला एक वर्षाचे मूल बसविले होते, तरी ते पान थोडेसुद्धा न वाकता जसेच्या तसे होते। (चित्र ४४).

केवळ **हत्तीच्या क्रीडा** दाखविण्यासाठी येथे एक तीन तासांची सहल आहे मी सा नावाच्या पधरा किलोमीटरवरील खोऱ्यातील कळप पहायला मी गेले या कळपात लहान मोठे अठ्ठेचाळीस हत्ती होते येथे हत्तीना तिसऱ्या वर्षापासून शिकवायला सुरवात करतात. तीन ते चार वर्षे शिकवावे लागते प्रत्येक हत्तीला त्याची काळजी घेण्यासाठी १८ ते ३० वयोगटातील एकेक माहूत होता


या **हत्तींना काही नावे** आहेत का असे मी विचारल्यावर तो म्हणाला, “हो तर; हा केळी खाऊ तर हा ऊस खाऊ. हा धावऱ्या तो मद;” पलीकडे असलेल्या दोन हत्तींपैकी म्हाताऱ्या हत्तीकडे बोट दाखवून तो म्हणाला, “आम्ही याला कुलपती म्हणतो दुसरा त्याच्या खालचा. दोघे सतत भाडत असतात!”

आपल्याकडे अनाठायी खर्च होणाऱ्या व कमी उपयुक्त गोष्टीला अगर माणसाला ‘पाढरा हत्ती’ म्हणण्याची पद्धत आहे. पण थायलडमध्ये **खरोखरच पाढऱ्या रंगाचे** (Albino) हत्ती आहेत असे ऐकले होते म्हणून मी माहुताला विचारले, ‘तुमच्याकडे पाढरे हत्ती आहेत का? कुठे आहेत? मला ते पहायचे आहेत,’ तो म्हणाला, ‘होय पाढरे हत्ती थायलडमध्ये आहेत, पण असा हत्ती जन्मल्याबरोबर राजाला सुपूर्त करावा लागतो तुम्ही राजाचे खास पाहुणे म्हणून गेलात तर तुम्हाला राजवाड्यात ते पहायला मिळतील ’ राजवाड्यापाशी पाढऱ्या हत्तींचे पुतळे फक्त आम्हाला दिसले (चित्र २०).

या सहलीत हत्तींच्या स्नानाविधीपासून त्याच्याकडून मोठमोठे ओंडके हलविणे, ते व्यवस्थित रचणे इत्यादी कामापर्यंत सर्व गोष्टी दाखविल्या याशिवाय त्यांच्या निरनिराळ्या कवायतीही पहायला मिळाल्या

बँकॉकला गुलाबोद्यानात झोपलेल्या माणसाना ओलाडून जाणारा शहाणा

हत्ती पाहिला होता, पण येथे त्यावरही मात करणारा कार्यक्रम पाहिला आपल्याकडे वृद्ध माणसे लहान मुलाकडून पाठीवर पाय देऊन घेतात तसेच येथे हत्तीकडून पाय व पाठ दाबून घेण्याचा **मसाजचा प्रकार** पाहिला! एक माहूत खाली पालथा पडला. पाठीवर एक चादर घेतली त्याच्या हत्तीने येऊन त्याच्या सर्वांगावर पायाचा दाब अलगदपणे देऊन मालीश केले! मालीश झाल्यावर 'फार छान तरतरी आली,' असे म्हणून तो प्रेक्षकाना म्हणाला, 'तुमच्यापैकी कोणाला मालीश करून घ्यायचे असल्यास पुढे या हे फुकट आहे.' माझ्या आसपासच्या गोऱ्या लोकाच्या बायका आपल्या नवऱ्याना आव्हान स्वीकारावयाचा आग्रह करीत होत्या! तरीपण कोणीही हरीचा लाल पुढे जायला धजला नाही।




हत्तीकडून मसाज

बँकॉकच्या सिलॉम व्हिलेजमध्ये आहे तसा येथेही **खान टोक मेजवानी** नावाचा एक कार्यक्रम पर्यटकांसाठी आहे खान म्हणजे वाडगे व टोक म्हणजे चौरग वाडग्यात भात, सूप, केळ्याची तसेच चिकन व पोर्कची भजी, काकडीच्या फोडी व टोमॅटोचे तिखट लोणचे एवढेच पदार्थ असतात. थायी पद्धतीची मेजवानी व सोबत नृत्यसगीत अशा या दोन तासाच्या कार्यक्रमाचा आनद लुटण्यासाठी दोनशे बाथचे तिकीट काढून रोज हजारो पर्यटक येतात. मोगऱ्याचा हारवाला अक्षरश: प्रत्येकाच्या गळ्यात हार मारून दहा दहा बाथ मिळवीत असतो

बाहेर पादत्राणे काढून ठेवून, गैरसोयीचे असले तरी चक्क मांडी घालून अगर पाय पसरून लोक गालिचावर बसतात आणि चौरंगावरील पदार्थांचा समाचार घेऊन नाविन्यपूर्ण वातावरणाचा अविस्मरणीय अनुभव घेऊन जातात.

माझ्या दृष्टीने या कार्यक्रमात काहीच दम नव्हता. खाद्यपदार्थ यथातथाच होते. रामवग आणि फॉन या नावाची नाजुक हालचालींची नृत्ये होती. मला ती अगदीच थड आणि सथ वाटली ना त्याला गती ना जिवतपणा काही नख्यानृत्येही होती. अशा कार्यक्रमाना 'हाऊसफुल्ल गर्दी' असते आणि जागेचे आरक्षण करूनच जावे लागते।



नृत्यासाठो नख्या

चागमयीहून **सर्वात मनोरजक सहल** आहे चागरायी, मी साय (बर्मा सरहद्द) व चिंग सीन म्हणजे सोनेरी त्रिकोण (Golden Triangle) या स्थळाची सकाळी सहा ते रात्री नऊ अशा सहलीला माणशी ९०० बाथ पडले वातानुकुलित छोटी गाडी होती वाटेत गरम पाण्याचे झरे, लहान मोठी मदिरे व घनदाट झाडीचे हिरवेगार डोंगर दिसले. यात सागाचेच प्रमाण जास्त होते महाराष्ट्रातील उजाड डोंगर पाहण्याची सवय झालेल्या माझ्या डोळ्यांना ही अपूर्व मेजवानी वाटली. रस्ता शेवटपर्यंत सुदर होता दुपारी एकच्या सुमाराला मी साय या थायलड-बर्मा सरहद्दीवरील गावी आम्ही पोहोचलो.

प्रथम उपाहारगृहात क्षुधाशाती केली. शेजारीच सुमारे वीस मीटर रुदीची मी साय नदी वहात होती. पलीकडे बर्मा. नदीवर सुदरसा पूल होता. पुलाच्या दोन्ही बाजूला लोखडी फाटके व पलीकडे पोलिसठाणी होती हिरवी झाडी असल्याने

**सरहद्द उद्यानासारखीच** वाटत होती थायी आणि बर्मी लोक इकडून तिकडे बाजारहाटासाठी मोकळेपणाने ये जा करीत होते बर्मी स्त्रिया रोजची भाजी व किराणा घ्यायला थायलडमध्ये येतात, तर अनेक थायी तिकडे जाऊन रत्नमाणके घेऊन येतात।

लाब केसाच्या, भव्य कपाळाच्या, नितळ कातीच्या पण साध्यासुध्या बर्मी स्त्रिया आणि बॉबकटवाल्या, नकट्या पण फॅशनेबल थायी स्त्रिया लगेच लक्षात येत होत्या. दोन्हीकडील तरुण मुली इकडून तिकडे मोटारसायकलवरूनही हिंडत होत्या अनेक बर्मी विक्रेते पुलावर लाकडी आणि लोखडाच्या वस्तूचा बाजार माडून बसले होते डोंगरी जमातीच्या लहान मुलीही ठेवणीतले कपडे घालून, गळयात दागिने घालून, 'पोज' देऊन पैसे मिळवीत होत्या (चित्र ५४) दोन देशांची सरहद्द म्हटली की, प्रत्येक देशाचे सैनिक सगिनी रोखून गस्त घालत असतील आणि अधून मधून गोळीबाराच्या फेरी झडत असतील असे मला वाटले होते परतु येथील खेळीमेळीचे वातावरण पाहून माझा गोड अपेक्षाभग झाला।

आम्ही सर्व पर्यटकही पुलावरून बर्मा सरहद्दीत शभर मीटरपर्यंत जाऊन बाजार पाहून आलो (चित्र ४८). बर्मा सरक्षक खात्यापैकी एकाला हिंदी येत होते. याना पाहिल्या पाहिल्या तो म्हणाला, 'नमस्ते चाचाजी, इधर कहा घूम रहे हो? हमारा बेर्मा देखा है क्या?' हा ऑगस्ट, १९८८ चा दुसरा आठवडा होता रगूनमध्ये जनक्राती उसळली होती तेवढ्यात बातमी आली, 'सतरा दिवसांच्या अधिकारानतर सीन एल्विन या राष्ट्राध्यक्षाने राजिनामा दिला आहे अजूनही रगूनमध्ये मिलिटरीचे टँक फिरत आहेत, आणि रक्त साडत आहे'. इकडे सरहद्दीवर मात्र जनसामान्यांचे व्यवहार सुरळीत व शांतपणे चाललेले होते

या नतर गेलो चिंग सीन या गावी मेकाँग नदीच्या तीरावर हे वसले आहे. पलीकडे होता लाओस देश. दुथडी वाहणाऱ्या नदीमध्ये अनेक मोटर लॉचवाले पर्यटकाना फिरवून आणण्याचा धदा करीत होते

त्यानतर आम्ही वळलो जवळच असलेल्या दहा किलो मीटर अतरावरील **जगप्रसिद्ध सोनेरी त्रिकोणाकडे** (चित्र ५२). बर्मा, लाओस आणि थायलड या तीनही देशाच्या सरहद्दी येथे भिडल्या आहेत. मध्ये नदी थोडक्या जागेत अमाप पैसे देणाऱ्या अफूची मोठ्या प्रमाणावर येथे लागवड होते व व्यापार चालतो पुरुषभर उचीच्या या झाडाना वर हिरवी बोंडे असतात त्यातील पाढरा चीक म्हणजे मादक

अफू (चित्रे ४९ व ५०) बोंडे पिकल्यानतर जे बी होते ते म्हणजे आपल्या अनरशाना लावतो ती खसखस आता कळले जावईबापूना हेच वाण का द्यायचे असते ते।

युरोप-अमेरिकन पर्यटकाना चागमयीचे आणखी आकर्षण आहे **गिरी भ्रमणाचे** चागमयीचे डोंगर म्हणजे हिमालयाचा २००० मीटर उचीपर्यंतचा पायथा बर्मी तिबेटी जातीच्या आखा, याहू, लाहू, लिखू, मिओ आणि करेन अशा अनेक जमाती येथे रहातात त्याच्या बोली, वेष, चालीरीती आणि श्रद्धास्थाने अभ्यासनीय आहेत. त्याच्या सहवासात दोन दिवस राहण्यासाठी पर्यटक येत असतात चांगमयी गावात शेकडो पदभ्रमण सहल सस्था आहेत

मी एक दिवसाची बसची सहल घेतली. या वर लिहिलेल्या सर्व **डोंगरी जमाती** मला पहायला मिळाल्या. येथील **स्त्रियाची खास वैशिष्ट्ये** आहेत - लहानखुरा बाधा, गौरवर्ण, भव्य कपाळ आणि चेहेऱ्यावरील निरागस भाव सर्वांग झाकणारा पोषाख व त्यावर सोने चादी सोडून इतर धातूचे व मण्याचे गळाभर घातलेले दागिने लहान मुलाच्या रगीबेरगी, गोंडेदार टोप्या फारच सुदर होत्या. पुरुष आपल्या नेपाळी शेरपासारखे. सध्या कुटिरोद्योग हे त्यांचे उदरनिर्वाहाचे एक महत्त्वाचे साधन झाले आहे त्यानी तयार केलेल्या अनेक वस्तू चागमयीच्या बाजारात मिळतात अल्पकष्टात मिळणारी मीठभाकर, नव्हे येथे सूपभातच म्हणायला हवा, कमीतकमी गरजा आणि सतत निसर्गसानिध्य यामुळे याचे जीवन समाधानी आहे.

स्त्री-स्वभाव सगळीकडे सारखाच हुषार, चाणाक्ष, कष्टाळू मागच्या पिढीतल्या चूलमूल साभाळून ससारात रमणाऱ्या तर नव्या पिढीतल्या घराबाहेर पडून अर्थार्जनाच्या मागे लागलेल्या. लहान मुले एकमेकांशी भाडून पुढच्या क्षणी एक होणारी, अभ्यासाचा कटाळा करणारी आणि स्वप्नात रगणारी. पुरुष मवाळ आणि सोशिक, आपले काम बरे अन् आपण बरे या वृत्तीचे एकूण लोक साधे व सरळमार्गी वाटले

चागमयीच्या परिसरात महिनाभर आम्ही होतो नाविन्यपूर्ण अनेक गोष्टी पहायला मिळाल्याने वेळ सत्कारणी लागल्याचा आनद झाला होता

चागमयीहून बँकॉकला परतताना वाटेतील सुखथायी व अयुथया पहाण्याचा बेत केला सुखथायी अतराने साधारण मध्यावर आहे. त्यासाठी रातराणी बस घेतली इकडे आपल्या उलट आहे दिवसाच्या बसपेक्षा रातराणीला कमी तिकीट असते।

# सुखथायी

सुखथायी हे आजच्या थायी संस्कृतीचे उगमस्थान समजले जाते मूळचे थायी लोक मंगोलियातील उलथायी डोंगर प्रदेशातील. तेथून प्रथम ते दक्षिण चीनमध्ये आले. सध्या युनान आणि शिचुआन नावाने ओळखल्या जाणाऱ्या चीनच्या प्रांतात सातव्यापासून तेराव्या शतकापर्यंत नानचौ नावाचे त्यांचे राज्य होते. कुब्लाईखानाच्या काळात त्याला उतरती कळा लागल्याने इसवी सन बाराशेनतर हे लोक आणखी दक्षिणेकडे म्हणजे सध्याच्या उत्तर थायलंडकडे पसरू लागले. सुरवातीला त्याच्या स्थानिक खेमार लोकांशी चकमकी झाल्या. त्यांना जिंकून यानी आपली लहान लहान राज्ये स्थापिली. त्या सर्वांना एकत्र करून **श्री इंद्रजीत फ्रा रुंग** याने उत्तर थायलंडमध्ये एकसंधी मोठे राज्य स्थापन केले. म्हणून हा थायलंडचा पहिला राजा समजला जातो याने इसवी सन १२३८ मध्ये सुखथायी हे शहर वसविले. सुखथायी याचा शब्दशः अर्थ **सुखाची प्रभात.** थायलंडच्या इतिहासाला खरी सुरवात येथून झाली

या रुंग घराण्यातील तिसरा राजा **रामकमहिंग** हा सर्वात कर्तबगार होता. इ. स. १२७८ ते १३१८ असे चाळीस वर्षे याने राज्य केले धर्म, संस्कृती, कला, शास्त्रे या सर्वांना त्याने उदार आश्रय दिला. सध्याची थाय लिपी यानेच सुरू केली यानेच प्रथम बौद्ध धर्मातील थेरवेदी पंथ स्वीकारला व त्याचा प्रसार करण्यासाठी अनेक मंदिरे, विहार, स्तूप बांधले

या घराण्यात एकूण आठ राजे झाले. सुखथायी ही सुमारे एकशेवीस वर्षे राजधानी म्हणून राहिली. याच काळात दक्षिणेला अयुथया येथे दुसरी थायी सत्ता उदयाला येत होती. चौदाव्या शतकात त्यानी सुखथायीचा पराभव करून शहराची इतकी वाताहात केली की ते निर्जन होऊन तेथे जंगले वाढली पुढची पाचशे वर्षे हे ठिकाण नाममात्र होते. आता या विसाव्या शतकात परत नवे सुखथायी जुन्या शहरापासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर वसत आहे पर्यटक पहायला जातात मध्ययुगातील संस्कृतीचे भग्नावशेष!

सुखथायीला विमानाने, आगगाडीने अगर बसने जाता येते. आगगाडीने गेल्यास फितसानुलोक या स्टेशनवर उतरून ६० किलोमीटर बसने जावे लागते. बँकॉकपासून बस मात्र थेट सुखथायीपर्यंत आहे गावात ४० ते २०० बाथपर्यंतची अनेक निवासस्थाने आहेत.

जुन्या सुखथायीत २०० मीटर लांब व तितकीच रुंद अशी तटबंदी असून आत पस्तीस मोठी मंदिरे आहेत वात महातात व वात श्री चम ही त्यातील महत्त्वाची या दुसऱ्या मंदिरातील आसनस्थ बुद्धमूर्ती एवढी प्रचंड आहे की, मूर्तीच्या दोन गुडघ्यातील अंतर सुमारे साडेअकरा मीटर आहे!

सर्व मंदिराची वैशिष्ट्ये म्हणजे सभोवती खंदक, विशाल आवार व गाभारा, भव्य मूर्ती व भिंतीवर चितारलेल्या जातककथा. मोठमोठे स्तंभ व त्यावरील अप्रतिम शिल्प पाहून त्या काळच्या वैभवाची साक्ष पटते.

जुन्या ऐतिहासिक स्थळाचे जतन व जीर्णोद्धार करावयाचा पुरातन खात्याने ठरविल्यामुळे आता पुन्हा या स्थळाला उर्जितावस्था येत आहे. युनेस्कोच्या मदतीने पुनरुज्जीवनाचे काम चालू असताना शिवलिंगासारखे अनेक हिंदुसंस्कृतीचे अवशेष सापडले

बऱ्याचशा हिंदु मंदिराचे बौद्ध मंदिरात रूपांतर झाल्याचेही आढळले.

येथे एक ऐतिहासिक उद्यान करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. नुकताच जुलै, १९८८ मध्ये त्याचा राजहस्ते कोनशिला समारंभ झाला. दिल्लीसारखा येथे रात्री ध्वनिप्रकाशाच्या सहाय्याने जुन्या सुखथायीचे वैभवचित्र उभे करणारा कार्यक्रम सादर करण्यात येतो (चित्र २१).

फितसानुलोक येथेही बरीच मंदिरे आहेत. वात प्रा श्री रत्न महातात हे त्यातील सर्वात नेत्रदीपक मोत्यानी मढविलेले प्रवेशद्वार व प्रचंड मूर्ती हे त्याचे वैशिष्ट्य

इसवी सन १२०० ते १४०० या काळच्या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी देशोदेशीचे इतिहास संशोधक येथे येत असतात

## अयुथया

सुखथायीत तीन दिवस थांबून आम्ही पुढे निघालो अयुथयेला. आपली **अयोध्या इकडे अयुथया** झाली आहे. यावरून प्राचीन काळी भारतीय लोक इकडे आले असावेत यात शंका नाही बँकॉकपासून उत्तरेला सुमारे ७२ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे तिकडून आगगाडी, बस अगर बोट यानी सुमारे सव्वा तासात येथे जाता येते एक वेळचे भाडे आहे फक्त सतरा बाथ

या गावच्या चहुबाजूनी नदी बेटासारखे असल्याने सरक्षणाच्या दृष्टीने मोक्याचे आहे, हे पाहून इ. स. १३५० मध्ये राजा ऊ थाँग याने राजधानीसाठी ही जागा निवडून हे अयुथया शहर वसविले या घराण्याच्या तेहेतीस राजानी पुढील ४१७ वर्षे येथून राज्य केले

त्या काळात अत्यत भरभराटीला आलेले असे हे थायी बौद्ध राज्य झाले उत्तुग मदिरे आणि पॅगोडे, सुदर नगररचना ही याची वैशिष्ट्ये इतकी वैभवशाली आणि सपन्न ही राजधानी होती की, तत्कालीन लडन, पॅरिस, रोम अशा युरोपियन शहरापेक्षाही सर्व दृष्टीने सरस! पण . .

इ. स. १७६७ मध्ये बर्मानि या देशावर स्वारी केली. त्यात अयुथया भुईसपाट झाली; इतकेच नव्हे तर हे थायी राज्य कायमचे नामशेष झाले.

त्यानतर थायी लोक पुन्हा एकत्र झाले त्यानी दक्षिणेला बँकॉकजवळ थानबुरीला नवे राज्य स्थापन केले. आज अयुथयेला लोक जातात ते केवळ भग्नावशेष पहाण्यासाठी!

वात महातातपासून वात अमुक अन् वात तमुक अशी दहा-बारा वाताहात झालेली मदिरे व पॅगोडे पाहिले नुसते लाल विटाचे चौथरे अगर भरीव पडके खाब, अर्धवट कमानी आणि चाळीस-पन्नास मीटर उचीची पण भग्न सुईशिखरे

विहार प्रा मुगकोल बोपित्र हे एकच मदीर आज येथे सुस्थितीत व प्रेक्षणीय आहे. थायलडमधील ब्राँझची सर्वात मोठी बुद्धमूर्ती येथे आहे फू खौ थाँग हा इ स १५८४ साली बर्मी लोकानी बांधलेला ८० मीटर उचीचा (सुमारे वीस मजल्याहून अधिक उच) स्तूप आहे. हाही मला स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने कलात्मक वाटला.

शहरात नदीकिनाऱ्याने एक गोलाकार ऊ थाँग नावाचा हमरस्ता आहे, आणि बऱ्याचशा वास्तू या रस्त्यावर आहेत जुन्या राजवाड्याची आता वस्तू सग्रहालये अगर सरकारी कार्यालये झाली आहेत. एका सग्रहालयाच्या प्रवेशद्वाराशीच मला श्री गणरायाची मूर्ती दिसली.

अयुथया हे जरी गतवैभवाच्या यादीत येत असले तरी आज हे टुमदार गाव म्हणूनही पहाण्यासारखे आहे रहदारीच्या मानाने रुद नि स्वच्छ रस्ते; बद न पडणारे वीज, पाणी आणि टेलिफोन, टी व्ही पासून कॉम्प्युटरपर्यंत सर्व सुखसोयी, सर्व

तऱ्हेच्या आधुनिक उपकरणानी सुसज्ज दुकाने शिवाय सुरक्षितता आम्ही उतरलेल्या ऊ थाँग हॉटेल शेजारीच पधरा-वीस मोठी सराफी दुकाने होती. अनेक तऱ्हेचे सोन्या-मोत्याचे रत्नखचित दागिने काचेच्या कपाटातून चमकत होते. एवढ्याशा लहान गावात ही इतकी दुकाने पाहून मला नवलच वाटले. बँकॉकच्या धावपळीपेक्षा येथील जीवन सथ व स्वस्त असल्याने अनेक लोक येथे राहून बँकॉकला व्यवसायासाठी जातात

आपल्याकडे जसे रिक्षावाले, टॅक्सीवाले, तसे तेथे मोटारसायकलीवाले आहेत. दोघाना घेऊन थोड्या भाड्यात ते पाहिजे तेथे नेऊन आणतात. इतर कुठल्याही वाहनापेक्षा स्वस्त व जलद. अनेक ग्रामीण विभागात अशी सोय आहे.

करमणुकीच्या खास सुविधा येथे जवळजवळ नाहीतच. म्हणून बँकॉकच्या सहलसस्था पर्यटकाना ५०० बाथमध्ये हे ठिकाण एका दिवसात दाखवून रात्री परत आणतात. स्वतत्रपणे बसने गेल्यास माणशी सव्वाशे बाथमध्ये अयुथया व शेजारचे बँग पा इन अशी दोन्ही ठिकाणे पहाता येतात.

## बँग पा इन

अयुथयेपासून बँकॉकच्या दिशेने सुमारे पधरा किलोमीटर अतरावर बँग पा इन नावाचे गाव आहे. येथील **राजवाडा प्रेक्षणीय** आहे हे समजल्यावर बसने तिकडे गेले

बसतळ्यापासून दोन किलोमीटर अतरावर हा राजवाडा आहे. म्हणून एक **सायकलरिक्षा** केली, आणि हिला चालक नसून **चालिका** होती। मी जगभर हिंडले. इतर सर्वत्र रिक्षा चालविणारे पुरुषच होते येथे स्त्री पाहून वेगळे वाटले कारण हे श्रमाचे काम होते. इंजिनची रिक्षा चालविणे वेगळे व सायकल रिक्षा चालविणे वेगळे. चढउताराचा रस्ता असताना व आम्ही दोन माणसे आत असताना या थायी स्त्रीने आम्हाला सहजगत्या तिकडे नेले रिक्षा चालविताना ती एक गाणेही गुणगुणत होती तिचा हा उत्साह पाहून मला आणखीच कौतुक वाटले (चित्र ४७)

इ. स. १६३० ते १६५५ प्रसाद थाँग या अयुथयेच्या राजाने हा राजवाडा बाधला याचे खास वैशिष्ट्य म्हणजे हा ४०० मीटर लांब व १२० मीटर रूद अशा जलाशयात आहे या जलाशयात लहान लहान बेटासारखे उचवटे होते त्यावर इमारती बांधल्या गेल्या.

पुढे बँकॉकला राजधानी हलविल्यामुळे हा १०० वर्षे मोकळाच होता. पण नतर चुलालाँगकॉर्न राजा (राम पाचवा) येथे नियमाने येऊन राहू लागला. त्यावेळी

बँकॉकच्या चिनी व्यापाऱ्यानी या राजवाड्यात शोभेल असा एक चिनी पद्धतीचा प्रासाद या राजाला भेट म्हणून दिला या प्रासादाच्या आराखड्यापासून बाधकामाच्या सर्व सामानापर्यंत आणि आतील फर्निचरपासून भाड्याकुड्यापर्यंत सर्व गोष्टी चीनहून आणल्या गेल्या येथे फक्त जोडणी आणि माडणी. या प्रासादाचे नाव **विहात चामरून**

या प्रासादात शिरल्याबरोबर आपण चीनमध्ये आलो आहोत असे वाटते प्रासादाच्या पायऱ्या, आतील खोल्याची रचना, खाब, छत, दुभाजक पडदे, छपरे व एकूण सर्वांवरचे रगकाम ही खास चिनी असल्यामुळे एकदम डोळ्यात भरतात. श्री, ओम् ही जशी आपल्याकडील शुभाक्षरे तशी चिनी शुभाक्षरे आणि ड्रॅगन्स अनेक ठिकाणी कोरलेले होते. येथील नुसतेच सिंहासन नव्हे तर प्रत्येक खुर्ची आणि टेबल, कपाट आणि पलग, खिडक्या आणि दारे, जाळ्या आणि चौकटी यावर उत्तम कोरीवकाम व मोत्याचे नाजूक जडावकाम. हे इतके सुदर आहे की चिनी लोकाच्या कलात्मकतेची कमाल वाटते।

बँकॉकमध्ये अशी इमारत पर्यटकांना सहजासहजी पहायला मिळत नाही बँकॉकपासून तासाच्या रस्त्यावर असूनसुद्धा आपली कोणतीही सहलसस्था हा बँग पा इनचा राजवाडा पहायला नेत नाही स्थापत्य विशारदानी, अतर्गत सजावट शास्त्रातील लोकानी स्वतत्रपणे येऊन आवर्जून पहावा असा हा राजवाडा आहे याला दहा बाथचे तिकीट आहे

सर्व राजवाड्याचे आवार म्हणजे एक आकर्षक उद्यानच आहे. छोटी छोटी जलाशये, त्यातील रगीत मासे, अधून मधून नक्षीदार कठड्याचे पूल, त्यावर उभारलेली पूर्णाकृती शिल्पे, मध्यवर्ती थाँग राजाचा पूर्णाकृती पुतळा, एक छोटेसे मदीर हे या राजवाड्यातील विशेष. याशिवाय येथे एक वेधशाळा व अनेक निवासस्थाने आहेत

आम्ही ऑगस्टमध्ये भर दुपारी येथे गेलो होतो पण सरोवराच्या सानिध्यात असल्याने सतत वहाणाऱ्या थड झुळुकांमुळे आल्हाददायक वाटत होते शिवाय एका अनोख्या सौदर्याचा आविष्कार पाहून अत्यत समाधान झाले होते

## फुकेट

**फुकेट** हे बँकॉकच्या दक्षिणेला सुमारे ९०० किलोमीटरवरील अंदमान समुद्रातील बेट. आगगाडी नसल्याने येथे बसने जावे लागते याचे वैशिष्ट्य म्हणजे सदोदित हिरव्यागार, रम्य वनश्रीने नटलेले सृष्टीसौंदर्य.

## कांचन बुरी

बँकॉकपासून १३० किलोमीटर अतरावर, **क्वाय नदीच्या** परिसरात **कांचनबुरी** गाव आहे हिरवी गर्द झाडी, अनेक धबधबे, खोल गुहा आणि ऐतिहासिक इमारती यामुळे या स्थळाला महत्व प्राप्त झाले आहे पण सृष्टीसौंदर्याने नटलेल्या या भागाला कारुण्याची किनार आहे.

**जुना इतिहास** म्हणजे या भागात सयाम आणि बर्मा या दोघात अनेक लढाया झाल्या ताजा इतिहास आहे दुसऱ्या महायुद्धाच्या वेळचा जपान्यांनी हा प्रदेश ब्रिटिशाकडून जिंकला होता त्यावेळी दोस्त राष्ट्राच्या सैन्याचे पकडलेले कैदी जपानी अधिकाऱ्यांनी लोहमार्ग बाधण्यासाठी जुपले सुमारे ४१५ किलोमीटर लांब बर्माच्या सरहद्दीपर्यंत जाणारा असा हा लोहमार्ग होता. कैदी जास्तीत जास्त कुचराईने व निष्काळजीपणाने हे काम करीत होते, म्हणून जपान्यांनी त्या सर्वांना चांगलेच धारेवर धरले होते. मारहाण, उपासमार आणि रोगराई यामुळे येथे दहा लाखाच्यावर माणसे मृत्युमुखी पडली।

बँकॉकच्या स्थानिक सहलसंस्थेमार्फत पाचशे बाथचे तिकीट काढून क्वाय नदीचा परिसर पहायला आम्ही सकाळी सात वाजता बसने निघालो

सुमारे पन्नास किलोमीटर अतरावर **नाखोन पॅथॉम** गावी फ्रा पॅथॉम चेदो नावाचा एक प्रचड बुद्ध स्तूप लागला सुमारे दोन हजार वर्षापूर्वी भारतातून दोन बौद्ध भिक्षू येथे आले छोटासा स्तूप उभारून त्यानी या भागात बौद्ध धर्माची मुहूर्तमेढ रोवली. आज या ठिकाणी दोनशे चाळीस मीटर व्यासाचा एकशेवीस मीटर उचीचा भव्य स्तूप आहे. जगातील हा सर्वात उच व मोठा स्तूप. सोनेरी मुलाम्यामुळे दुरूनच त्याचे झळाळणारे शिखर दिसत होते. आपण पेरलेल्या बियांचा एक महावृक्ष फोफावलेला पाहून स्वर्गात या भिक्षूना नक्कीच परमानद झाला असेल!

जाताना ऊस, केळी, मका आणि भात लावलेली शेते दिसत होती. बाबूच्या टोप्या घातलेले स्त्री-पुरुष शेतकरी आपल्यासारखेच राबत होते यात्रिक अवजारे कुठेच दिसली नाहीत

अधुन मधून एक दोन मजली घरे दिसत होती सर्व सुबक व भक्कम वाटली मोडकळीला आलेले घर सर्व प्रवासात दिसले नाही! यावरून सामान्य शेतकरी आपल्यापेक्षा सधन असावा. रस्त्याच्या कडेला प्रातर्विधीसाठी बसलेली मडळी बँकॉकजवळ नव्हे तर प्रवासात इतरत्रही कोठे दिसली नाहीत!

त्यानतर काही अतर गेल्यावर वात **चैचंपूल** नावाचे गाव लागले. इ. स. १९४२-४३ च्या युद्धात जपानी लोकानी दोस्तराष्ट्रांच्या युद्ध कैद्यांना क्रौयनि वागविले हे दर्शविणारे एक सग्रहालय या गावाच्या एका बौद्ध भिक्षूने १९७७ साली बनविले. याचे पहिले नाव 'डेथ म्युझियमच' होते; परतु ते फारच भीषण वाटल्याने बदलून त्याचे जेथ (**JEATH**) करण्यात आले जेथ हे नाव जपान, इग्लड, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, थायलड व हॉलड या देशांच्या नावाच्या आद्याक्षरापासून केले आहे!

बांबूनी बनविलेल्या तट्ट्या लावलेल्या झोपड्यात हे सग्रहालय आहे. हे पहायला वीस बाथचे तिकीट आहे. आम्ही आत गेलो. सैनिकाचे गणवेष, बदुका, बॉब अशा वस्तू तेथे ठेवलेल्या होत्या, पण उघड्या, अर्धपोटी, रोगानी व जखमानी जर्जर झालेल्या सैनिकाची छायाचित्रेच मुख्यत' होती वेदना दर्शविणारे हावभाव व विकल चेहेरे हाच सर्व चित्राचा एकमेव भाव.

आमच्या बरोबरचा एक ब्रिटीश माणूस त्याच्या डच मित्राला म्हणाला, 'जपान्यासारखे क्रूर लोक दुनियेत नसतील!' मला यावर राहवले नाही मी त्याला लगेच ठणकावले, 'भारतात व इडोनेशियात तुम्ही लोकांनी निरपराध लोकावर अत्याचार करून शे-सव्वाशे वर्षे सैतानासारखे राज्य करून त्याना पिळवटून काढले आहे हा इतिहास तुम्ही विसरलात का? हे तर बोलून चालून युद्धच होते पण तुमच्या अघोरी कृत्यांना जगात खरोखरच तोड नाही!' लगेच 'क्षमा करा, विसरून जा; कृपा करून मनावर घेऊ नका,' असे म्हणून ते पुढे निघून गेले सग्रहालयाच्या थायी व्यवस्थापकालाही परत मी हेच सुनावले यावर तोही, 'तुम्ही म्हणता ते खरे आहे, पण आम्हाला फक्त जपानी लोकाचाच अनुभव आला म्हणून आम्ही हे उभारले या जपानी लोकानी भारतीयाना मात्र मुळीच त्रास दिला नाही ही वस्तुस्थिती मला माहिती आहे ' हे सग्रहालय पाहून मला खास असे काही वाटले नाही. खरे म्हणजे आत पहाण्यासारखे काहीच नाही. केवळ जपान्याविरूद्ध प्रचाराचा एकतर्फी प्रयत्न आणि विदेशी लोकाकडून चलनप्राप्तीचा एक मार्ग

या जेथ सग्रहालयाशेजारीच वात चैचपूल नावाचे बुद्ध मदीर आहे कलाकुसरीची धमाल उडविलेले प्रवेशद्वार, प्रशस्त आवार आणि गाभारा, रेखीव बुद्धमूर्ती, डोळ्यात भरणारी सोनेरी नाग चिन्हांकित धुळीचा कण नसणारी छपरे आणि हजारो लोक तेथे जमलेले असतानाही दिसणारी कमालीची स्वच्छता आणि सार्वजनिक शिस्त हे पाहून मी भारावून गेले.

आता नवीन काळात मदिरे हवीत ती अशी हजार माणसे व्यवस्थित बसू शकतील अशी पावित्र्य आणि मागल्य जतन करणारी, सस्कार घडविणारी, माणसातला माणूस जागविणारी.

आम्ही तेथे गेलो तो दिवस २८ जुलै, १९८८ म्हणजे आषाढी पौर्णिमेचा होता सकाळी अकराची वेळ होती सर्वत्र बारीक विणीच्या गालिच्यासारख्या दिसणाऱ्या चटया अथरल्या होत्या. आत सात-आठशे भाविक लोक व अन्नदाते त्यावर बसले होते त्याच्या जवळच्या पिशवीत पादत्राणे नव्हती। मदिराबाहेरच त्यानी ती निश्चित मनाने काढून ठेवली होती एका बाजूला भगवी वस्त्रे धारण केलेल्या सुमारे शभर भिक्षूचे जेवण चालू होते. आपल्याकडे जसा आषाढी एकादशीपासून चातुर्मास सुरू होतो तसा थोडासा प्रकार इकडेही आहे आषाढी पौर्णिमेपासून तीन महिने निरनिराळी व्रत वैकल्ये सुरू करून हे भिक्षू प्रवचन, ग्रथाभ्यास करणार होते मला जाणवली ती लोकाची अढळ श्रद्धा आणि निष्ठा. येथे जमलेले सर्व लोक त्याच्या कपड्यावरून खालच्या व मध्यम वर्गातीलच दिसत होते भिक्षूही तरुण, तुकतुकीत आणि तेजस्वी होते हे दृश्य पाहून मला सात्विक आनद झाला. याच भिक्षूनी या देशात बौद्धधर्माची पाळेमुळे खोल रुजविली आहेत. याचे मुख्य कार्य असते, शिकवणुकीने समाजावर सुसस्कार करणे

आपल्याकडे धार्मिक विद्याभ्यासाचे आश्रयदातेही कमी झाले आहेत आणि वेदाभ्यासी लोकही दुर्मिळ झाले आहेत. उलट, वेदाभ्यासाच्या नावाखाली फड गोळा करून स्वतःला पडित म्हणून मिरविणारे दोन-तीन ढोंगीच माझ्या पहाण्यात आले

या स्थळानतर प्रवासात पुढे **कांचनबुरी** नावाचे गाव लागले. टुमदार, स्वच्छ व सधन असे वाटले ते ओलाडून पुढे निघालो क्वाय नदी पूल नावाच्या स्टेशनकडे

प्रत्यक्ष पुलाच्या अलीकडेच हे स्टेशन आहे याला स्टेशन म्हणण्यापेक्षा थाबाच म्हणणे योग्य ठरेल कारण येथे फलाट वगैरे काही नाही रेल्वेची कार्यालये नाहीत, किंवा लोखडी कपाऊडही नाही, पण गाडी थाबते, माणसाची बरीच चढ उतार होते व पुन्हा गाडी चालू लागते.

या थाब्यावर खाण्यापिण्याच्या वस्तूपासून रत्नमाणकांपर्यंत सर्व तऱ्हेचा माल हातगाडीवर व छोट्या दुकानात मिळत होता शेकडो विदेशी पर्यटक आपआपल्या मोटारीनी किवा बसने येत जात होते. त्यामुळे वर्दळ बरीच होती

शेजारीच क्वाय नदी वहात होती. त्यावर अर्धगोलाकृती लोखडी कमानींचा पूल होता (चित्र ३८) लोक त्यावरून पायी ये-जा करीत होते. मीही त्यांच्यात सामील झाले

या पुलाचा आणखी थोडा इतिहास असा की, हा सर्व प्रथम लाकडी बांधला गेला. पण महायुद्धात दोस्त राष्ट्रांनी केलेल्या बाँब हल्ल्यात याचा काही भाग उध्वस्त झाला. जो पुन्हा बांधला गेला तेवढाच फक्त लोखडी व भक्कम आहे. बाकीचा पूल तसाच जुना पण अजून टिकून आहे त्यावरून आगगाडी जाते. सुरवातीला सांगितल्याप्रमाणे लोहमार्ग बांधताना झालेल्या लाखो लोकांच्या मृत्युमुळे या रेल्वेचे **'डेथ रेल्वे'** हेच नाव प्रचलित आहे हा लोहमार्ग ४१५ किलोमीटर लांब असून त्यापैकी २६३ किलोमीटर थायलडमध्ये व १५२ किलोमीटर बर्मामध्ये आहे पण ही आगगाडी या देशातून त्या देशात सध्या जात नाही.

या पुलाच्या घटनेवर Pierre Boulle याने एक कादबरी लिहिली व नतर Bridge on the river Kwai नावाचा **चित्रपटही** निघाला. याचे चित्रण श्रीलकेत झाले होते आता ध्वनी-प्रकाशाने सर्व इतिहास दाखवितात.

या युद्धात जी गोरी माणसे कामी आली फक्त तेवढ्याचेच स्मारक काचनबुरीमध्ये बाधण्यात आले आहे! सुमारे ४५ x ३० सेंटीमीटर आकाराच्या व १० सेंटीमीटर उचीच्या एका शिलेवर मृत सैनिकाचे नाव, वय, हुद्दा, पलटणीचा क्रमाक व त्याच्या मृत्यूची तारीख कोरली आहे. प्रत्येक शिलेशेजारी एक लहानसे रोपटे लावले आहे. अशा **६,९६२ शिला** या ठिकाणी ओळीने दिसल्या. ब्रिटीश दूतावास या स्मारकाची व्यवस्था पहाते.

या युद्धात भारतीय, मलेशियन, थायी असे इतर देशांचे लोकही खांद्याला खादा लावून लढले. त्यानीही आपले प्राण गमावले; पण त्यांचा मात्र कोठेही नामनिर्देशसुद्धा नसावा याचे आश्चर्य व खत वाटली वास्तविक स्वतःच्या देशापेक्षा दुसऱ्या देशासाठी प्राणार्पण करणारा महावीर म्हणायला हवा।

या स्थळानतर पुढचा प्रवास सुरू झाला क्वाय नदी परिसर नावाच्या एका खेड्यातील **जगल व्ह्यू हॉटेलमध्ये** आम्ही दुपारी एक वाजता पोहोचलो. अतिशय रम्य ठिकाणी हे हॉटेल बांधले आहे. चारी बाजूनी उतरते हिरवेगार डोंगर, त्यावर विविध तऱ्हेची वृक्षराजी आणि मध्ये हे हॉटेल पाचूच्या कोंदणात हिरा बसवावा तसे हे भासले. वर बांबूचा प्रचड मडप, पण खाली मात्र आधुनिक सुविधांनी सुसज्ज असे हे हॉटेल आहे.

या हॉटेलमध्ये आम्हा सर्व पर्यटकांना थायी जेवण देण्यात आले फोडणीच्या पाण्यात टाकलेले उकडलेले सॅलड, सूप म्हणून होते. निरनिराळ्या मासाचे कांदा टोमॅटो घालून एकत्र शिजविलेले तुकडे भाजी म्हणून होते व जोडीला भात असे जेवणाचे स्वरूप शेवटी चहा किंवा कॉफी. या थायी जेवणात 'स्वीट डिश' ला चॅट होती कोणत्याही प्रकारची साधी फळेसुद्धा जेवणात नव्हती. जेवण मात्र पोटभर होते पाहिजे तो पदार्थ हवा तेवढा मिळत होता.

जेवणानतर लगेच हॉटेलच्या मागच्या बाजूने पायऱ्या उतरून क्वाय नदीवर गेले. सहल सस्थेने काहीना क्वाय नदीतून मोटार लॉंचने अर्धातास हिंडवून आणले काही जणांना बाबूच्या तराफ्यावरून फिरवून आणले. तराफ्यावरून जाताना एकदम दोन हजार वर्षापूर्वीचा काळ मला आठवला. दोन्ही बाजूला मानव स्पर्श रहित दाट जगल होते

नदीच्या दुसऱ्या किनाऱ्याला एका ठिकाणी दोन म्हशी डुबत होत्या. सर्व विदेशी लोकांनी लगेच कॅमेऱ्यावर त्याचे फटाफट फोटो घेतले. **म्हशींचे** एवढे **कौतुक** पाहून मला गमत वाटली. म्हैस हा प्राणी पूर्वी त्यांनी कधी न पाहिल्याने त्यांच्या रग, शिग व आकार यावरून हा प्राणी गेंड्याच्या जातीतला हिंस्त्र असावा असे त्याना वाटत होते 'हा गाय बैलाच्या जातीतला प्राणी आहे; आणि भारतात सकसतेमुळे म्हशीचेच दूध अधिक लोकप्रिय आहे,' ही गाईडने न सागितलेली माहिती मी सागितल्यावर त्यांना नवल वाटले!

या कार्यक्रमानतर आमचा परतीचा प्रवास सुरू झाला प्रथम डेथ रेल्वेच्या लाकडी पुलापाशी आम्ही गेलो. त्यावरून आगगाडी जाताना पाहिली बॅंकॉकपासून नामटाकपर्यंत अशी ही आगगाडी आहे.

जवळच **सायी योक नावाचा धबधबा** होता तो पहायला आम्ही गेलो. सुमारे वीस मीटर रुदीत चार प्रवाहातून पाणी येऊन ते सुमारे तीस मीटर खाली टप्प्याटप्प्याने कोसळत असल्याने हा धबधबा फारच सुदर दिसतो तसे म्हटले तर यात पाणी फारसे नव्हते, प्रवाहांना विशेष जोर नव्हता, पण पायऱ्या पायऱ्यासारख्या खडकावरून हे पडत असल्याने पाण्याला दुधाळ रंग येऊन एक आगळीच शोभा निर्माण झाली होती. सुमारे दहा मीटर अतरापर्यंत त्याचे तुषारही उडत होते. अनेक लहानमुले त्यात बागडत होती या ठिकाणी बरीच थायी कुटुबे बरोबर शिदोरी घेऊन सहलीला आली होती शिवाय खाण्यापिण्याची दुकानेही येथे होती. सर्वत्र आनदी आनद भरलेला दिसत होता

परतताना आणखी एका ठिकाणी बस थाबली येथे होती ओळीने निरनिराळ्या फळांची दुकाने विदेशी प्रवाशाना **थायलडची फळे** पहाण्याची ही सुसधी असल्याने अनेकजण कुतुहलाने फळे खरेदी करीत होते.

शेवटी सहलसस्थेने प्रत्येकाला आपआपल्या हॉटेलमध्ये सोडले. सध्याकाळचे सात वाजले होते. वातानुकुलित बस, खाचखळगे नसलेले गुळगुळीत रस्ते आणि विशेष म्हणजे धीमेपणाने, काळजीपूर्वक गाडी नेणारा आमचा बसचालक. यामुळे बारा तासांचा प्रवास झाला होता तरीसुद्धा यत्किंचितही शीण जाणवत नव्हता

काचनबुरी, अयुथया, सुखथायी, चागमयी, आणि सरहद्दीवरील मे साय अशी देशाच्या उत्तर टोकापर्यंत गावे फिरल्याने **थायलंड पाहिल्याचे समाधान** मला मिळाले. या देशाचा ग्रामीण भाग शहराइतकाच सुखसोयीनी समृद्ध असेल असे वाटले नव्हते त्यामुळे या बुद्धमय, विकसनशील देशाबद्दल अधिकच कौतुक वाटू लागले भारतातील प्रत्येक गाव किमान या आर्थिक पातळीवर यायला हवे जेव्हा येईल तो दिवस सोन्याचा।

## पटाया

**पटाया** हे बॅकॉकच्या दक्षिणेला सुमारे ७५ किलोमीटर अतरावर समुद्रकाठचे रम्य स्थळ आहे केवळ चैन आणि मौज करण्यासाठीच हे ठिकाण असल्याने याला 'Capital of pleasure'म्हणतात पटाया गाव तसे अगदीच लहान. केवळ पर्यटकासाठीच म्हटले तरी चालेल. येथे जाण्यासाठी अनेक वातानुकुलित बसगाड्या असल्याने जाणेयेणे सोपे आहे. जाऊन येऊन ९० बाथचे तिकीट पडते येथील निवासस्थाने व उपाहारगृहे बॅकॉकपेक्षाही स्वस्त आहेत. या ठिकाणचा आनंद लुटण्यासाठी पूर्ण एक दिवस तरी मुक्काम हवा. आपल्या पर्यटनसस्था या ठिकाणी नेतात (चित्र ४६).

पटाया मुख्यत· **जलक्रीडेसाठी** प्रसिद्ध आहे समुद्र किनारी Water skiing, Para-sailing, Scooter riding, Wind surfing, Speed boating, Scuba-diving वगैरे खेळाच्या सुविधा होत्या व अनेक लोक त्याचा आनद लुटीत होते. या शिवाय गावात Bowling, Badmington, Golf, Horse riding, Car racing असे दहा बारा प्रकारचे खेळ दिसले

समुद्र किनारी अगर जेथे पाणी पुबलक आहे अशा ठिकाणी आपल्याकडे

अशा सुविधा अद्याप नाहीत त्याकडेही लक्ष द्यायला हवे आपल्याकडे जलक्रीडेसाठी खास प्रसिद्ध असलेले कोणतेही ठिकाण माझ्या ऐकिवात नाही भारतात वेळेचा अपव्यय करणाऱ्या क्रिकेटचे स्तोम इतके वाढले आहे की, त्यापुढे इतर वैयक्तिक व सांघिक खेळ दुर्लक्षिले अगर कमी लेखले जातात; अन् शेवटी क्रिकेट हा तर जुगार सर्वात बिनभरवशाचा खेळ इतर खेळांकडे दुर्लक्ष करून क्रिकेटला एवढे महत्व देणे आणि वेळ व पैसा खर्च करणे कितपत योग्य आहे? नुसती वर्तमानपत्रेच नव्हे तर नभोवाणी, दूरदर्शनसारखी सरकारी माध्यमेही ठरलेले कार्यक्रम रद्द करुन क्रिकेटला भाव देतात हे पाहून सखेदाश्चर्य वाटते. ब्रिटीश साम्राज्यातील काही देश सोडून, अमेरिका, युरोप, चीन, जपान, थायलड, इडोनेशिया अशा एकाही देशात हा खेळ नाही आणि ऑलेंपिकमध्येसुद्धा नाही।

पटायाजवळ असलेल्या कोलान बेटावर आम्ही **प्रवाळ फुले** (Coral flowers) पहायला गेलो निसर्गाची ही निरनिराळ्या आकाराची, रगीबेरगी किमया पाहून थक्क व्हायला होते। हे पहायला बोटींना खास काचेचा तळ होता

किनाऱ्यावरच शखशिंपले व त्यापासून केलेल्या सुबक वस्तूंचा बाजार होता दुपारच्या जेवणासाठी येथेच एका उपाहारगृहात गेलो विविध प्रकारच्या जलचरांनी पानात इतकी गर्दी केली की त्यांचा समाचार घेता घेता पुरेवाट झाली।

पर्यटक म्हटले की रात्रीची करमणूक आलीच बँकॉकसारखीच येथे निशागारे आहेत याशिवाय **अल् कझार व टिफानी** या दोन नृत्य नाट्य सगीत सादर करणाऱ्या सस्था आहेत. आम्ही अल् कझारमध्ये गेलो सुमारे १०० तरुणी रगमचावर येऊन नृत्यगायन करुन गेल्या. काही गमतीदार चुटकेही त्यानी सादर केले नतर कळले की या सर्व स्त्रिया नसून पुरुष होते! त्याच्या चेहेऱ्यावरील नाजुकपणा, अभिनय, वेषभूषा इतकी बेमालूम होती की ते पुरुष आहेत हे सागूनही खरे वाटले नाही। आपल्याकडे एकच बालगंधर्व होऊन गेले पण येथे रगमचावर **बालगधर्वसेनाच** पहायला मिळाली। त्या दृष्टीने चुकवू नये असा हा कार्यक्रम आहे. असे नृत्यगायनाचे कार्यक्रम दाखविणाऱ्या आणखीही काही सस्था आहेत. त्याच्या जाहिराती होत्या, 'आमच्याकडील मुली खरोखरच्या आहेत बर का!'

# ८ - बँकॉकच्या बाजारी

परदेश म्हटला की भारतीयाच्या दृष्टीने **खरेदी** हे मुख्य आकर्षण बँकॉकमध्ये खरेदीलाही भरपूर वाव आहे भारतापेक्षा सर्व गोष्टी स्वस्त आहेत फक्त पुढे सिंगापूर-हाँगकाँगला जायचे नसेल तरच येथे खरेदी करावी, नाहीतर ते ओझे सर्व प्रवासात जवळ बाळगावे लागेल शिवाय सिंगापूर आणि हाँगकाँग ही शहरे खरेदीला बँकॉकपेक्षाही स्वस्त आहेत

येथे मिळणाऱ्या खास स्वस्त वस्तू म्हणजे **कापड व तयार कपडे** लहान मुलापासून मोठ्यांपर्यंतचे सर्व तऱ्हेचे कपडे भारतापेक्षा साधारण निम्म्या किंमतीत मिळतील चोवीस तासात हव्या त्या मापाचा सपूर्ण सूट शिवून देणाऱ्या शिंप्याच्या अनेक जाहिराती दिसल्या

एका कापडाच्या दुकानावर पाटी होती - चार सूट (कोट व पॅन्ट) शिवाय सहा पँटी, सहा रेशमी सदरे, एक रेशमी किमोनो, तीन रेशमी टाय व शिवाय चार मीटर रेशमी कापड फक्त २५० अमेरिकन डॉलर याचे सुमारे ३२०० रुपये होतात. आपल्याला पाहिजे त्या रगाचे आपल्या मापाचे हे कपडे एक दिवसात

देण्याची हमी सूट व इतर पॅन्टी नायलॉन अधिक कापूस अशा मिश्र सुतांच्या होत्या यावरून कपडे किती स्वस्त आहेत याची कल्पना येईल. आपल्याला याच्या निम्मेच पाहिजे असल्यास निम्मे पैसे. शिवाय घासाघाशीत ५-१०% कमी होऊ शकतात. आपल्या मापाच्या - अगदी अगाबरोबर - शिवून मिळणाऱ्या या कपड्यांच्या किंमती मला खूपच स्वस्त वाटल्या. आयते तयार कपडे घेतले की कधी बाही लाब असते तर कधी रुद, कधी खांदा लहान तर कधी गळा मोठा सर्व जमले तर कॉलरची फॅशन आडवी येते, नाही तर कापडाचा रग, डिझाईन अगर पोत

अशा तयार कपडे शिवून मिळणाच्या दुकानांच्या अनेक पाट्या पाहिल्या. त्यातील आश्वासने मात्र ततोतत पाळली जातात आपल्या हॉटेलमार्फत व्यवहार ठरविल्यास पैसे शेवटी हॉटेल सोडताना सुद्धा देता येतात. हे सर्व पाहून आपल्या भारतीय शिंप्यांना आठ आठ दिवस का लागावेत व वायदे करूनही ते काम का पूर्ण करता येऊ नये याचे कोडे पडते

• येथील रेशीम तागी रेशमासारखे दिसते हे प्रतीला आपल्यापेक्षा खालचे असते, पण किमतीला अतिशय स्वस्त असते

तयार कपड्यांच्या खरेदीसाठी प्रटुनाम मार्केट, इद्र मार्केट किंवा फहुरात मार्केटमध्ये जावे येथे लहान लहान मुलांचे कपडे इतक्या सुदर व आकर्षक फॅशनचे आणि स्वस्त असतात की आपल्यालाही हे कपडे घालण्याइतके लहान व्हावेसे वाटते! कधी सहा महिन्याचे तर कधी वर्षाचे, कधी चार वर्षाचे तर कधी आठ असे सर्व वयांचे बालपण मी येथे अनुभवून आले! शिवाय दर मिनिटाला मी नवा नवा फ्रॉक चढवीत होते. या सर्व ठिकाणी घासाघिशीला वाव आहे

खरेदीची मला काहीच आवश्यकता नव्हती तरीपण मी तीन-चार प्रकारचे कपडे - झबली, फ्रॉक, कोट घेण्याच्या मोहात पडले. म्हटले, यथाकाली कोणाला तरी देता येतील

या बाजारात हिंडताना दृष्टीसुखाची जी मेजवानी मिळाली तिची गोडी अवीट व अपूर्व होती। कपड्याचा निम्मा बाजार तर रस्त्यावरच आहे.

फहुरात मार्केट थानन फहुरातवर आहे याला **इंडियन मार्केट** म्हणूनच ओळखतात. भारतीयांची कापडाची, विशेषत साड्याची अनेक दुकाने येथे आहेत तयार कपड्यांच्या विक्रीची ही सर्वात मोठी पेठ

बँकॉकमध्ये बांबूच्या वस्तूही अनेक. टोपल्या परड्यापासून खुर्च्याटेबलापर्यंत. भिंतीवर लावायच्या चित्रापासून दिवाणखान्यातील दिव्यापर्यंत पाटल्या, बागड्या, खेळण्याचे लहान मुलाचे चेडू अशाही बाबूच्या वस्तू होत्या आपल्याकडेही या वस्तू असतात पण त्या जरा ओबडधोबड व अनाकर्षक वाटतात एकदम डोळ्यात भरत नाहीत आपल्या बुरुडांना उत्तेजन दिल्यास व मार्गदर्शन केल्यास ते यापेक्षाही सुबक व स्वस्त वस्तू बनवू शकतील

येथील चटया तर जणू गालिचेच अतिशय नाजुक आणि बारीक वीण, त्यातून सप्तरग, त्यामुळे आकर्षक

इतर स्वस्त असणाऱ्या येथील वस्तू आहेत प्लॅस्टिकची फुले, चिनी मातीचे अगर मेलॅमीनचे चहा, कॉफी अगर जेवणाचे सच, स्वयपाकघरातील नानाविध उपकरणे पूर्वी झाऱ्या, उलथणे व लाटणे एवढीच आयुधे स्वयपाकघरात असत आता सोलण्याच्या, कापण्याच्या यत्रापासून दही लावायच्या यत्रापर्यंत प्रगती झालेली आहे. एका हाताने पीठ चाळता येईल अशी चाळणीही मी येथे पाहिली

लहान मुलांची साधी व विजेरीवर चालणारी सुबक खेळणी, तसेच फोटो फिल्म व कॅमेरे, तऱ्हेतऱ्हेचे टेलिफोन या सर्व वस्तू मनोवेधक वाटल्या. रेडिओ, टी व्ही , फ्रीज, वॉशिंग मशीन या गोष्टी होत्याच प्रवासासाठी घडी होणाऱ्या बॅगा व हातगाड्याही येथे मिळतात.

थायलड निरनिराळ्या रत्नमाणकांसाठीही प्रसिद्ध आहे Supphire, Ruby, Pearl, Diamond, Amethyst, Blue topaz, Zircon, Garnet, Emerald या प्रकारचे अनेक खडे बाजारात दिसतात. (चित्र ५३). या देशात वर्षातून अनेकदा निरनिराळ्या पचताराकित हॉटेलात रत्नांचे खास बाजार व प्रदर्शने भरत असतात. देशोदेशीचे, विशेषतः सिंगापूर, जपान आणि स्वित्झर्लंड येथील अनेक जवाहिरे येथे खरेदीसाठी येत असतात

हॉटेलमधील खास समारभाच्या शृगारलेल्या दिवाणखान्याना रूबी हॉल, टोपाझ हॉल, झिरकॉन रूम अशी रत्नाची नावे असतात.

रॉयल हॉटेलमध्येच एक सराफी दुकान होते. तेथे चमचमणाऱ्या एका कुडी जोडाची किंमत मी विचारली. दुकानदाराने ७४०० बाथ सांगितली. मी त्या क्षणभर हातात घेऊन खालीवर पाहिल्या व ठेवून दिल्या. लगेच तो आपणहून म्हणाला, 'खास सवलत म्हणून मी तुम्हाला या ४५०० बाथला देतो!' एकदम तो एवढा धाडकन्

खा.।। आलेला पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. मुख्य म्हणजे मालाचीच शका येऊन मी त्या खरेदीचा नाद सोडला प्लॅस्टिक आवरणाच्या नकली खड्याच्या वस्तू आज इतक्या बेमालूम मिळू शकतात की, भले भले सुद्धा त्यात फसू शकतात

सर्वत्र दिसणारी व मालाने खचाखच भरलेली दुकाने पाहूनच आपण तृप्त होतो! असे ठिकठिकाणी दिसणारे बाजार हेच देशाची सुबत्ता दर्शविणारे आरसे असतात व देशातील नागरिकाच्या रहाणीमानाचे ते द्योतक असतात कुठल्याही गावची कल्पना चटकन् यावी असे वाटत असेल तर रस्त्याने पायी चालत भाजी मडईत जावे व लोकाच्या कपड्यापासून भाजी खरेदीपर्यंतचे व्यवहार बारकाईने पहावेत त्या ठिकाणी रहाणीमानाची कल्पना ताबडतोब येईल. बँकॉकची समृद्धता याच माझ्या मापकावरून मला कळून आली.

खरेदीचा आनद लुटण्याची आणखी ठिकाणे म्हणजे सात आठ मजली, सर्व तऱ्हेचा माल असणारी विविध वस्तू भांडारे. बँकॉकमध्ये तीही अनेक आहेत करमणूक म्हणूनही ती पहाण्यासारखी असतात. अशा दुकानात उघड्यावर सर्व तऱ्हेचा माल पडलेला असतो. ते पाहून भारतीयापेक्षा हे लोक जास्त प्रामाणिक आहेत याची खात्री पटली

असा आहे एकदरीत बँकॉकचा बाजार समृध्द आणि स्वस्त त्यामुळे तेथे गेले की खरेदीच्या मोहात पाडणारा !

विविध वस्तू भाडार पहाण्यासाठी एकच नाव सुचवायचे झाले तर क्राँग शॉपिग सेटर मला हे सर्वात सुदर वाटले शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी, सयाम सेंटर इमारतीसमोर, राम पहिला व फायाथायी या नावाच्या दोन रस्त्याच्या कोपऱ्यावर हे आहे सात मजली, वातानुकुलीत, महाप्रचंड, आकर्षक सजावट. स्वच्छ अशी विशेषणे याला लावता येतील आत सर्व तऱ्हेच्या वस्तूचो व खाद्यपदार्थांची दुकाने आहेत हजारो माणसे या केंद्रात असली तरी ऐसपैसपणामुळे धक्काबुक्की सोडाच पण गर्दीसुध्दा वाटत नाही रहाण्यासाठी एक निवासस्थानही आत आहे सहाव्या मजल्यावर आग्नेय आशियातील सर्व देशाचे अनेक तऱ्हेचे खाद्यपदार्थ मिळू शकतात सातव्या मजल्यावर जानेवारी, १९८९ मध्ये मी एक चिनी सर्कस पाहिली. खरेदी करायची नसली तरी हे केंद्र पहायला जरूर जावे. बँकॉकच्या समृध्द लोकजीवनाचे दर्शन येथे घडू शकेल !

# ९ - गोड आठवणीसह पुढे

**असे दिसले एकूण बँकॉक.** विविध रगांनी नटलेले पानी तेरा रग कैसा? जिसमे मिलावे वैसा। या उक्तीप्रमाणे आपण कोणत्या भागात रहाता, काय काय पहाता व किती बारकाईने न्याहाळता यावरून आपल्याला बहुरगी बँकॉकचे दर्शन होईल

मला ते दिसले पूर्व आणि पश्चिम, नवे आणि जुने याचा सगम झालेले. पुण्या-मुबईपेक्षा सुरक्षित आणि स्वच्छ. अनेक प्रेक्षणीय स्थळानी गजबजलेले, साध्या सरळवृत्तीच्या कष्टाळू लोकाचे, रूढी परपरेचे बौद्धधर्माधिष्टीत शहर

जागतिक उलाढालीत बँकॉक दुसऱ्या वर्ग. मोडेल डोळे दिपविणारे नसले तरी डोळ्यात भरणारे अवाढव्य आणि सथ सावकाशीच्या गडबडीचे आणि शांत धावपळीचे श्रीमतीचे वैभव नसले तरी बकालपणा नसलेले निसर्गाचा वरदहस्त असल्याने सदाहरित वनश्रीने बहरलेले समृद्ध सुबत्तेचे, आनदी आणि समाधानी शहर. राहण्यासवरण्याला, खाण्यापिण्याला, बाजारहाटाला स्वस्त पण राहणीमानाला भारतापेक्षा उच्च आणि एकूण कमी ताणतणावाचे शहर.

थायी लोकाना बँकॉक देवदूताचे नगर आणि रत्नाचे आगर वाटते, रगेल पर्यटकाना कामनगर वाटते, युरोपियन आणि विशेषत· जपान्याना व्यापारासाठी सुवर्ण सधीचे शहर वाटते; अमेरिकनाना लष्करी ठाण्यासाठी मोक्याचे ठिकाण वाटते. पण मला **हे जनसामान्यांचे नगर** वाटले येथे माणूस काबाडकष्ट करून योग्य मोबदला मिळवू शकतो, चार घास सुखाने खाऊ शकतो आणि समाधानाने राहू शकतो.

पच पच उषःकाली बौद्धमठातून भिक्षूचे गभीर आणि मगल मत्रघोष कानी येतील तर दुपारच्या वेळेला सर्वांची पोटापाण्यासाठीधावपळ चाललेली दिसेल, रस्त्यात असख्य लॉटरीतिकीट विक्रेते गिऱ्हाईकाना उज्वल भवितव्याच्या आशा दाखविताना दिसतील व पर्यटकाचे लोंढे पायी, तुकतुक किंवा टॅक्सीने फिरताना दिसतील सध्याकाळ झाली की सर्व वातावरण बदलून बँकॉक ही एक नखरेल मोहक विलासिनी वाटेल येथे जितकी बुद्धमदिरे तितकीच निशागारे चगीभगी पर्यटकासाठी तर हे रगेल नगर! त्याग आणि भोग येथे हातात हात घालून जीवनयात्रा करताना दिसतील. यामुळे या शहरात एकसुरीपणा अजिबात जाणवत नाही बँकॉक बहुरगी आहे. त्यामुळेच आज हे बहारीचे नगर झाले असून रोज हजारोंच्या सख्येने पर्यटक आकर्षित करीत आहे.

इ. स १९८४ ते ८९ या काळात आम्ही चार वेळेला बँकॉकला गेलो अनेक दिवस राहिलोही. तरीसुद्धा पुन्हा पुन्हा जाऊन पहावीशी वाटतात ती नेत्रदीपक बुद्धमदिरे आणि हसरे चेहेरे अशी आहे बँकॉकची मोहिनी. अविस्मरणीय आणि आनददायी!



७९२
२५९४२०
२०७८९

# परिशिष्ट १ - अंदाजपत्रक

### (अ) विमानप्रवास

नुसत्या बँकॉकच्या प्रवासाला विमानाने जाणे तसे महागात पडते त्याच्या जोडीला हाँगकाँग, फिलीपाईन्स, सिंगापूर, चीन, जपान, कोरिया असे देश घेतल्यास बँकॉक वाटेवर आहे. त्यामुळे जाताना अगर येताना एकदाच सोयीस्करपणे थांबता येते फिलीपाईन्समध्ये विशेष काही नाही

मुबईहून विमान न बदलता थेट पूर्वेकडे जाणाऱ्या विमान कपन्या आहेत एअर इडिया, कॅथे पॅसिफिक, ब्रिटीश एअरवेज इत्यादी कुठल्याही प्रवासात परतीचे तिकीट भारतातच काढणे सोयीस्कर पडते, इतकेच नव्हे तर ते पर्यटकाना व्हिसा मिळण्यासाठी काढावेच लागते

मुबई-बँकॉक-हाँगकाँग-मुबई या प्रवासाचा अधिकृत पर्यटन तिकिटाचा सवलत दर ६७००/- रुपये आहे हे तिकीट ९० दिवस चालते. तसेच मुबई-बँकॉक-सिगापूर या प्रवासाला ५४००/- रुपये पडतात हे तिकीट ३५ दिवस चालते हे १९८९ चे दर आहेत पण या विमानभाड्यावर निरनिराळ्या कपन्या आणखी भरपूर सूट देऊ शकतात. तेव्हा ती चौकशी जरूर करावी

चीन-जपान असे इतर देश पहायचे असल्यास हाँगकाँगहून बोटीने अगर विमानाने जाता येते यावर तर ६० ते ८०% पर्यंत सूट मिळू शकते। तेव्हा शक्य असल्यास पुढची परतीची तिकिटे तिकडे काढावीत

सहलसस्थेमार्फतचा प्रवास ७ ते १५ दिवसापर्यंत साधारणपणे असतो अशा वेळी त्यांच्या बरोबर सर्व प्रवास करून शेवटच्या ठिकाणी आपल्याला मुक्काम वाढविता येतो किती वाढविता येईल हे तिकिटाच्या प्रकारावर व खिशातल्या शिलकेवर अवलबून आहे. शक्य असल्यास अशा सधीचा फायदा जरूर घ्यावा बँकॉक हा शेवटचा टप्पा असल्यास येथे चार-आठ दिवस राहून जास्तीत जास्त देश पहाता येईल

## (ब) प्रेक्षणीय स्थळासाठी मार्गदर्शन

बँकॉकमधील प्रेक्षणीय स्थळे शांतपणे बारकाईने पहाण्यास कमीत कमी आठ दिवस हवेत  एवढा मुक्काम सर्वच पर्यटकांना करणे शक्य नसते. चार दिवस म्हणजे सुद्धा शिकस्त। तेव्हा चार दिवसांचा कार्यक्रम खाली सुचविला आहे त्यावरून येथील महत्वाची स्थळे कोणती हेही लक्षात येईल

| दिवस | सकाळ | दुपार / संध्याकाळ |
|---|---|---|
| १ | बुद्धमंदिरे / शहर दर्शन<br>वात फ्रा किओ<br>(जुना राजवाडा व पाचूचा बुद्ध),<br>राष्ट्रीय संग्रहालय,<br>वात पो (पहुडलेला बुद्ध),<br>वात त्रिमित,(सुवर्णबुद्ध),<br>वात बेंचामाबोपिट (संगमरवरी बुद्ध), | सिलॉम  व्हिलेज<br>सांस्कृतिक कार्यक्रम,<br>सिलॉम पथावर<br>फेरफटका व खरेदी, |
| २ | तरंगता बाजार, वात सुथाट,<br>झोक्याची कमान, खरेदी, | गुलाबोद्यान कार्यक्रम,<br>खरेदी, रात्रीचे बँकॉक |
| ३ | वात अरुण, मुआँग बोरान, | सुसर संवर्धन केंद्र,<br>रात्रीचे बँकॉक, |
| ४ | पटाया - जलक्रीडा / समुद्रतीर, | पटाया - टिफानी/अल्कझार<br>संगीत नृत्यनाट्य कार्यक्रम |

यापेक्षा जास्त मुक्काम असेल तर विमानमेक, सर्पोद्यान व आसमंतातील स्थळे पहाता येतील. मॅजिकलँड व जिम थॉम्पसनचे घर यात मला तरी रस वाटला नाही.

ही सर्व ठिकाणे पहायला आपण स्थानिक पर्यटन संस्थेच्या शहरदर्शनाच्या सहलीबरोबर जाऊ शकतो  पर्यटन संस्थेचे शहर दर्शनाचे साधारण दर पुढील प्रमाणे आहेत

| क्रमांक | ठिकाणाचे नाव | लागणारा वेळ (तास) | माणशी दर (बाथ) |
|---|---|---|---|
| १ | राजवाडा परिसर | ३ | २५० |
| २ | गुलाबोद्यान व सांस्कृतिक कार्यक्रम | ४ | २५० |
| ३ | थायी भोजन आणि नृत्य (सिलॉम ग्रामोद्योग केंद्र) | ३ | २५० |
| ४ | बुद्ध मंदिरे | ३ | २०० |
| ५ | तरंगता बाजार | ४ | २०० |
| ६ | सुसर पालन केंद्र | ३ | २५० |
| ७ | रात्रीचे बँकॉक दर्शन | ४ | ३५० |
| ८ | पटाया सहल | ९ | ५०० |
| ९ | क्वाय नदीवर | ९ | ५५० |

यावेळी आपल्याबरोबर तिघे-चौघे असल्यास स्वतत्रपणे गेल्यास हा खर्च १/४ ते १/३ एवढाच येतो शिवाय सर्व ठिकाणे शांतपणे पहाता येतात. मात्र अशा वेळी याकरता हातात एखादे मार्गदर्शनाचे पुस्तक हवे. म्हणजे थोडक्या वेळात जास्तीत जास्त काय पहाता येईल हे ठरवता येते

बँकॉक सोडताना विमानतळावर १५० बाथ (१९८९) कर भरावा लागतो तेव्हा तेवढे पैसे बाजूला ठेवून बाकीचे पुन्हा बदलून घेता येतात. सुरवातीला विमानतळावरील बँकेत पैसे बदललेले असले तर त्याची पावती दाखवून उरलेल्या बाथचे डॉलर मिळू शकतात



# परिशिष्ट २ - उपयुक्त पत्ते

स्वतत्रपणे जाणाऱ्यासाठी काही उपयुक्त कार्यालये, भारतीय उपाहारगृहे, निरनिराळ्या दराची निवासस्थाने व मोठाली खरेदीकेंद्रे याची नावे व पत्ते यापुढे मुद्दाम इग्रजीत दिले आहेत ते शब्द दाखविले की थायी नागरिकालाही चटकन् समजू शकेल शेवटी असलेल्या बँकॉकच्या नकाशातही हो स्थळे दाखविली आहेत खाली थायी कॉन्सुलेटचा पत्ता मुबईचा आहे • बाकीचे सर्व बँकॉकचे पत्ते आहेत

**(A) OFFICES :**

**Royal Thai Consulate**-Krishnabad Building. II floor, 43, Pedar Road, Bombay - 400026

**Air India** - 16, Amarin Tower, 500 Ploenchit Rd Tel 265 - 9614-20.

**Indian Embassy** 46, Soi Prasanmit, Sukhumvit Road, Tel 258- 0300-6.

**Tourist Authority of Thailand** - Ratchadamnoen Nok Avenue, Bangkok 1,Tel 282 - 1143 9

**(B) INDIAN EATING PLACES**

**Akbar Mahal Restaurant** Behind Indra Hotel, Pratunam, Rajprarop Road, Tel 253-6039 (Non Veg ).

**Delhi Darbar Restaurant** - 120/390 Soi Somprasong, Petchburi Road, Behind Indra Hotel (Non veg.) Tel 252-46 40-9

**Moghul Room Restaurant** 1/16 Soi 11, Sukhumvit Road, Tel 253 - 4465 (Non veg ).

**New Kashmir Restaurant** - 3/11-12 Decho Road, Near Narai Hotel, Tel 235 9645.

**Simla Cafe** - 382 Soi Tatmai (Near Victory Hotel), Silom Road, Tel 234 6225 (Veg and Non Veg.).

**South Indian Food** 92/1 Vaithi lane, Silom Road, Opposite Narai Hotel, Tel 235 6761 (South Indian).

**Himali Chacha** 1229 New Rd , Tel 235 1569

## (C) SHOPPING CENTRES :

**Amarin Plaza** - Crossing of Rachadamri Rd. and Phloenchit Rd

**Central Departmental Stores** - Silom Road

**Mahboonkroug** - Crossing of Phya Thai Rd and Rama I Rd

**Mall Shopping Centre** - Rajdamri Rd

**Naraphan** - Larnluang Rd Opposite Boxing Stadium.

**Oriental Plaza** - Near Phra Chao Taksin Bridge

**Ratchadamri Arcade** - Near crossing of Ratchadamri Rd and Phloenchit Rd.

**Robinson Departmental Stores** - Three Branches One on Rajdamri Rd, The second near Victory Monument and the third in Siam Square.

**Siam Square** - Crossing of Phya Thai Rd. and Rama I Rd

**Thai Daimaru** - Two branches One in Rajdamri Arcade on Rajdamri Rd and the second at Phra Kanong on Sukhumvit Rd.

## (D) HOTELS FOR RESIDENTIAL PURPOSES :

These are some of the Hotels classified as per approximate rates for a room for two persons

### LUXURY CLASS HOTELS (Baht 1500 - 3000)

AIRPORT 333 Chert Wudthakas Rd Tel 566 1020-1 แอร์พอร์ต

AMBASSADOR 8 SOI 11 Sukhumvit Rd Tel 255 0444 แอมบาสซาเดอร์

ASIA 296 Phyathai Rd Tel 215-0813 เอเชีย

BANGKOK PALACE 1091/336 New Petchburi Rd Tel 253-0510 5 บางกอกพาเลส

HILTON INTERNATIONAL BANGKOK, Nai Lert Park 2 Wireless Rd Ploenchit Tel 253-0123 ฮิลตันอินเตอร์เนชันแนล บางกอก

HYATT CENTRAL PLAZA 1695 Paholyothin Rd, Bangkhen, Tel 541-1234 (70 lines) ไฮแอท เซ็นทรัล พลาซ่า

INDRA REGENT Rajprarob Rd Tel 252 1111 252-0111 Ext 441 อินทรา รีเจนท์

LE MERIDIEN PRESIDENT 135/26 Gaysorn Rd Tel 253-0444 เพรสซิเด้นท์

MANDARIN, 662 Rama IV Rd Tel 233-5370 แมนดาริน

MANHATTAN, 12 Soi 15 Sukumvit Rd Tel 252-7141-9 แมนฮัตตัน

MONTIEN, 54 Suriwongse Rd Tel 234-8060 มณเฑียร

NARAI 222 Silom Rd Tel 233-3350 นารายณ์

NEW IMPERIAL, 6 SOI Ruamrudi Ploenchit Rd Tel 254-0111 นิวอิมพีเรียล

RAMA GARDEN 9/9 Viphavadi-Rangsit Rd Tel 579-5400 รามาการ์เด้นส์

ROYAL ORCHID SHERATON 2 Captain Bush Lane, Siphya Rd Tel 234-5599 โรแยลออร์คิด

SHANGRILA HOTEL, 89 Soi Wat Suan Plu, New Rd, Tel 236-7777 เชียงการีล่า

SIAM INTER CONTINENTAL Rama I Road, Tel 253-0355-7 สยามอินเตอร์คอนติเนนตัล

TAWANA RAMADA, 80 Suriwongse Rd Tel 233-5160 ตะวันนารามาดา

THE ORIENTAL 48 Oriental Ave Tel 236-0400-2 โอเรียนเต็ล

THE REGAL LANDMARK BANGKOK 138 Sukhumvit Road Tel 254-0404 254-0424 รีกล แลนด์มาร์ค

THE REGENT BANGKOK INTERNATIONAL, 155 Rajdamri, Tel.251-6127 เดอะรีเจ้นท์ บางกอก

THE SILOM PLAZA HOTEL 320 Silom Rd Tel 236-0333 236-8441 50 สีลมพลาซา

WINDSOR 8 Sukhumvit Soi 20 Tel 258-0160 วินเซอร์

## FIRST CLASS HOTELS (Baht 800 - 1500)

FLORIDA 43 Phyathai Rd Tel 245 3221-4 ฟลอริด้า

GOLDEN HORSE 5/1 2 Damrongrak Rd Tel 280-1920 โกลเด้นฮอส

IMPALA 9 Sukhumvit Soi 24 Tel 258-8612-6 อิมพาล่า

MANOHRA 412 Suriwongse Rd 234-5070 มโนราห์

NEW FUJI, 299 301 Suriwongse Rd Tel.234-5364-6 นิวฟูจิ

NEW NANA 4 Soi Nana Tai, Sukhumvit Rd Tel 252-0121 นิวนานา

NEW PENINSULA 295/3 Suriwongse Rd Tel 234-3910-7 นิวเพนนินซูลา

THE PLAZA 178 Suriwongse Rd Tel 235-1760 79 พลาซ่า

RAJAH, 18 Sukhumvit Soi 4 Tel 252-5102 9 ราชา

ROYAL HOTEL, 2 Rajdamnoen Rd Tel 222 9111-29 รอยัล

SIAM 1777 New Petchburi Rd Tel 252-4967-8 สยาม

THE SUDA PALACE HOTEL 24 Suthisarn Rd Saphan Kwai Tel 270-0585-87 สุดาพาเลซ

TOWER INN 533 Silom Rd opp Narai Hotel Tel 234 4051 234 4053 ทาวเวอร์ อินน์

TROCADERO 343 Suriwongse Rd Tel 234-8920-9 โทรกาเดโร่

VICTORY, 322 Silom Rd Tel 233-9060-9 วิคตอรี่

## ECONOMY CLASS HOTELS (Baht 300 - 800)

BARON HOTEL 544 Soi Huaykwang, Ratchadapisek Rd Tel 246-4525 39, 246-0250 บารอน

COMFORT INN CO.,LTD, 153/11 4 SUKHUMVIT Soi 11 Tel 251 9250 251-0745 คอมฟอร์ตอินน์

GOLDEN GATE HOTEL, 22/3 Soi 2 Sukhumvit Rd Tel 251-5353 252 8126 โกลเด้นเกท

GRACE, 12 Soi 3 Sukhumvit Rd Tel 253 0651 เกรซ

KANITA GUEST HOUSE, 542/428 Mu Ban Chatkaew Soi 14 Klongchan Bangkapi, Tel 374 0173 ext 426 กรรณิการ์ เกสท์เฮาส์

LIBERTY, 215 Pradipat Rd Tel 271-0880-1 ลิเบอร์ตี้

MAJESTIC HOTEL 97 Rajdamnern Avenue Tel 281 5000 66 Rms (B300-600) แมเจชติค

METRO 1902 New Petchburi Rd Tel 314 4741-3 เมโทร

MIDO 222 Pradipat Rd Tel 270-0447 มิโด

MIRAMAR 777 Mahachai Rd China town Area Tel 221-1711 มิราม่าร์

MORAKOT 2802 New Petchburi Rd Tel 314-0761 มรกต

PRADIPAT, 173/1 Pradipat Rd Sapan kwai Tel 278-1470-8, ประดิพัทธ์

PRINCE 1537/1 New Petchburi Rd Tel 252-1344 ปริ๊นซ

RA-JAH PALACE 234 Rachadapisek Rd, Huaykhwang Tel 277-8931 ราชาพาเลซ

RAMADA, 1169 Charoenkrung Rd Tel 234-8971-5 รามาดา

RENO, 40 Soi Kasemsarn 1 Rama 1 Rd Tel 215-0026-7 รีโน


REX 762/1 Sukhumvit Rd 259-0106-15 เร็กซ

ROSE 118 Suriwongse Rd 233 7695 โรส

ROYAL PLAZA Naret Rd 234 7650 234-7019 โรแยลพลาซ่า

Besides, there are numerous Guest Houses spread all over the city, costing between Baht 50 - 300 per day

ส


South Air Conditioned
Bus Station
N
TAKSIN RD
PHRACHAO TAKSIN
STATUE
ITSARAPHAP RD
WAT
ARUN
ARUN AMARIN RD
PHRAYA
WAT
MAHATAT
PHRAPINKLAO
BRIDGE

GOLDEN GATE HOTEL 22/3 Soi 2 Sukhumvit Rd Tel 251-5353 252-8126 โกลเด้นเกท

GRACE 12 Soi 3 Sukhumvit Rd Tel 253-0651 เกรซ

KANITA GUEST HOUSE 542/428 Mu Ban Chatkaew Soi 14, Klongchan Bangkapi, Tel 374 0173 ext 426 กรรณิการ์ เกสท์เฮาส์

LIBERTY 215 Pradipat Rd Tel 271-0880-1 ลิเบอร์ตี้

MAJESTIC HOTEL 97 Rajdamnern Avenue Tel 281-5000 66 Rms (B300-600) แมเจซติก

METRO 1902 New Petchburi Rd Tel 314-4741-3 เมโทร

MIDO 222 Pradipat Rd Tel 270-0447 มิโด

MIRAMAR 777 Mahachai Rd China-town Area Tel 221-1711 มิรามาร์

MORAKOT, 2802 New Petchburi Rd Tel 314-0761 มรกต

PRADIPAT, 173/1 Pradipat Rd Sapan-kwai Tel.278-1470-8, ประดิพัทธ์

PRINCE, 1537/1 New Petchburi Rd Tel 252-1344 ปริ้นซ

RA-JAH PALACE 234 Rachadapisek Rd, Huaykhwang Tel 277-8931 ราชาพาเลซ

RAMADA 1169 Charoenkrung Tel 234-8971-5 รามาดา


RENO, 40 Soi Kasemsarn 1 Rama I Rd Tel 215-0026-7 รีโน

REX 762/1 Sukhumvit Rd 259-0106-15 เร็กซ

ROSE 118 Suriwongse Rd 233-7695 โรส

ROYAL PLAZA Naret Rd 234-7650, 234-7019 โรแยลพลาซ่า

Besides, there are numerous Guest Houses spread all over the city, costing between Baht 50 300 per day


BANGKOK CITY MAP
River
Canals
Roads
Highway
Railway
Important Places
Hotels
Statues
Temples
A/c Bus Routes
N
CHAO PHRAYA RIVER
South Air Conditioned Bus Station
SUKHOTHAI RD
NAKHONCHAISRI
SAMSEN RD
PHAHOLYOTHIN RD
MITTAPHAP RD
KING RAMA V
DUSIT ZOO
RAMA V RD
CHITLATDA PALACE
RAMA VI RD
VICTORY MONUMENT
RATCH WITHI RD
SRI AYUTTHAYA RD
RATCHA PRAROP RD
DINDAENG-ASOKE RD
TAM NAK THAI
Rachadaphisek Rd
PHETCHBURI RD
NEW PHETCHBURI RD
RATCHADAMNOEN NOK RD
DEMOCRACY MONUMENT
CHAKRAPONGSE RD
PHRA ATHIT RD
PHRAPINKLAO BRIDGE
WAT MAHATAT
WAT PHRAKEO
WAT PO
WAT ARUN
ARUN AMARIN RD
ATSADANG RD
MAHACHAI RD
WORACHAK RD
BAMRUNG MUANG RD
LANLUANG RD
PHISSANULOK RD
KRUNG KASEM RD
RONGMUANG RD
RAMA I RD
PHAYATHAI RD
SIAM SQUARE
HENRY DUNANT RD
RATCHADAMRI RD
LUMPHINI PARK
KING RAMA VI
WIRELESS RD
PLOENCHIT RD
SUKHUMVIT ROAD
RAMA IV RD
CHAROEN KRUNG RD
YAOWARAT RD
CHAKRAPHET RD
PAHURAT RD
THE MEMORIAL BRIDGE
WAT TRIMITR
SIPHAYA RD
SURAWONG RD
SILOM RD
SATHORN RD
PATPONG RD
CONVENT RD
SALADAENG RD
SURASAK RD
PRACHATIPOK RD
SOMDEJ CHAOPHAYA RD
LADYA RD
PHRACHAO TAKSIN STATUE
PHRACHAO TAKSIN BRIDGE
TAKSIN RD
ITSARAPHAP RD
Y.M.C.A
Lumphini Boxing Stadium
Indian Embassy
Expressway
Labour Dept